
डॉ. स्मिता दामले
सल्तनत-ए-दिल्ली

# सल्तनत-ए-दिल्ली

**डॉ. स्मिता दामले.**

ई साहित्य प्रतिष्ठान

# सल्तनत-ए-दिल्ली

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सल्तनत-ए-दिल्ली

डॉ. स्मिता दामले

३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,

कोथरूड, पुणे, ४११०३८.

मोबाईल :- ९८६७३६४६३४.

smitasuhas67@rediffmail.com

suhasdamle341@hotmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity.

www. esahitybooks

**प्रकाशन  : ३१ डिसेंबर २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे सहावे पुस्तक, “सल्तनत-ए-दिल्ली” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत.

डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळया अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण

होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही.

डॉ स्मिता दामले यांना  राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा  पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला  त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून

मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय आणि व्यक्तिगत चरित्र नुकतंच प्रसिध्द झालं आहे.

त्यांनी आजवर लिहीलेल्या इतिहासावरील पुस्तकांना नामवंत प्रकाशकांनी मानधनासहित प्रसिद्धी दिली. वाचकांची उदंड पसंती त्यांना मिळाली. अशा वेळी ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली सहा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य द्यावीत यातच त्यांची खरी ओळख होते.

ई साहित्य डॉ. स्मिता दामले यांची कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

या पुस्तकातील चित्रे गुगलवरून घेतली आहेत. ती अपलोड करणाऱ्यांचे आभार.

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली डॉ. स्मिता दामले यांची इतर पुस्तके.







1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kalatani_smita_damle.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/lokmanya_-_final.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/raksha_smita.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manasokta_smita_damle.pdf
5. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/itihasachi_vilag_paane_smita_damle.pdf

# प्रस्तावना.

समुद्राला भरती आणि ओहोटी असते. राजकारणालाही असते. मग घराणी उदयाला येतात. विलयाला जातात. नियतीच राष्ट्रपुरुष जन्माला घालते असे म्हणतात. प्रचंड मानसिक उर्जा आणि शारीरिक उर्जा असलेले वीर पुरुष राष्ट्र निर्माण करतात. सम्राट पदाला पोचतात. आपल्या घराण्याचा उद्धार करतात. पण नंतरचे वारस कमकुवत निघतात. आणि ते घराणे लयाला नेतात. तोपर्यंत नवीन योद्ध्याची नवीन लाट आलेली असते. हे समर्थ पुरुष इतिहास निर्माण करतात. समृद्धीच्या शोधात हे धाडसी वीर सप्त सागर ओलांडून, पर्वत ओलांडून दौलतीच्या शोधात सत्ता गाजवायला बाहेर पडतात. महत्वाकांक्षा त्यांना खेचत असते.

भारत हा असाच एक नैसर्गिक संपत्तीने नटलेला देश. इथे साहसी दौलत लोभींच्या झुंडीच्या झुंडी आल्या. शक-हूण-ग्रीक-अफगाणी-तुर्की-दुराणी-इराणी-फ्रेंच-डच-इंग्रज आले. युध्द, सत्तेच्या राजकारणात शिरले. काही परत गेले. जातांना हिरे, मोती, सोनं, रेशमी वस्त्रे भरभरून घेऊन गेले. काही इथेच रमले. या मातीतले झाले.

भारतीय इतिहासाला दीर्घायुष्य आहे. जगातील पुरातन भारतीय संस्कृती ही एकच संस्कृती आहे जी अजून टिकून आहे, नव्हे बहरतेच आहे. रोम, ग्रीस, या सर्व देशांचा सर्व भूतकाळ गाडला गेला. त्यांच्या ऐतिहासिक राजधान्या, संस्कृती, इतिहासजमा झाल्या. मात्र भारतीय वेद, संगीत, योगशास्त्र इत्यादि सर्व शाखांना आता जागतिक कीर्तीचं लेणं चढलं आहे. हस्तिनापुर-इंद्रप्रस्थ ही पुरातन कौरव-पांडवाची राजधानी अजूनही दिल्ली या नावाने अखंड भारताची मध्यवर्ती राजधानी म्हणून गाजते आहे, आणि राजकीय घडामोडीने अजूनही वर्दळलेली आहे.

महाभारताच्या युद्धानंतर भारतात गाजलेली पहिली ऐतिहासिक लढाई म्हणजे परकीय सिकंदरशी भारतीय पोरसची झालेली झुंज. पण सिकंदरने इथे

सत्ता स्थापन केली नाही. इसवी सनाच्या अकराव्या शतकापासून अफगाणी टोळधाडी खुष्कीच्या मार्गाने भारतात शिरल्या. सुलेमान पर्वत रांगांमधून खैबरखिंड पार करून येतांना, तिथल्या जमातींनी प्रतिकार केल्यावर त्यांनी नवीन मार्ग शोधला आणि खैबरखिंडीऐवजी, गोमल खिंडीतून ते येऊ लागले. त्यांचा पहिला मुक्काम मुलतानवर पडे. आणि मग लाहोर-पंजाब-कुरुक्षेत्र.. शेवटी संपन्न यमुनेचा तीर. हा भारताचा ग्रहणकाळ ठरला.

गांधारी ज्या गांधार देशातून आली, तो कंदाहार एकेकाळी हिंदू अधिपत्याखाली होता. महाभारत घडवणारा शकुनी हा आताच्या अफगाणिस्थानातलाच. एकेकाळी, १० व्या शतकात अफगाणिस्थान हा हिंदूंचा देश होता. काबुलीस्थान, झाबुलीस्थान हे दोन भाग हिंदूंच्या हाती होते. उत्तरेकडे काबूलमध्ये लालीया नावच्या ब्राह्मणाचं राज्य होतं आणि झाबूलमध्ये राजपूतांची सत्ता होती. ११ व्या शतकात याकूब-ई-लाईस नावाच्या यवनाने दोन्ही राज्यं जिंकली आणि आपली सत्ता स्थापन केली तिथे गझनी नावाचा किल्लाही बांधला. आणि त्याच नावाची नगरी निर्माण केली. गझनी म्हणजे रत्न-जवाहीर. याच गझनी या नावाशी भारताचा फार मोठा इतिहास जोडलेला आहे. भूकंपाचं केंद्र एके ठिकाणी असावं आणि वित्तहानी, मनुष्य हानी, इमारती कोसळणं दुसरीकडेच व्हावं तसंच हे होतं. तुर्कांच्या या स्वाऱ्या भारतातील हिंदूंची राज्यं डळमळीत करून गेल्या.

भारतीयांना माहीत आहे तो गझनीचा महंमद. त्याने सोमनाथावर १७ वेळा स्वारी केली. गझनीवर अलप्तगीन नावाचा तुर्की राज्य करत होता. त्यानंतर त्याचा गुलाम सुबुक्तगीन प्रमुख झाला. त्याने भारतावर पहिली स्वारी केली. दौलत मिळवणं एवढाच त्याचा उद्देश होता. त्याचा मुलगा महंमद. अत्यंत उग्र स्वभावाचा. मारपीट, जीव घेणं त्याला सोपं होतं. हिमालयाच्या रांगा ओलांडून, सिंधचं वाळवंट पार करत, पर्वत, जंगलं, नद्या पार करून भारतावर हल्ला करायचा. त्याचे अनेक सैनिक प्रवासात हाल होऊन मरत. पण त्याला त्याची फिकीर नव्हती. सोमनाथ म्हणजे आजचं तिरुपतीच्या बालाजीसारखं अमाप संपत्तीचं तीर्थस्थळ. हा महंमद

अमाप लूट घेऊन गेला. शिवलिंग आणि इतर मूर्ती फोडून गेला. गंगेच्या काठावरची संपन्न राज्यं आणि राजे यांना उजाड करून गेला. पण त्याने या देशात राज्य केलं नाही.

गझनीच्या महंमदानंतर घोरी राजवट गझनीत सुरू  झाली. आणि त्यातील महंमद घोरी हा भारतावर राज्य करणारा पहिला तुर्की. अजमेरचा राजा पृथ्वीराज चौहान याचा इ. स. ११९१ मध्ये पराभव करून त्याने दिल्लीतल्या सल्तनतीचा पाया घातला. त्याने कुतुबुद्दीन ऐबक या आपल्या गुलामाला दिल्लीचा कारभार सांभाळायला ठेवलं आणि तो गझनीला निघून गेला. त्यानंतर गुलाम वंश, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी अशी  सत्ताधाऱ्यांची लाट भारतात पसरली. त्यांना संपवलं बाबर या मुघलाने. मग आले इंग्रज. भारताची साडेसातशे वर्षांची गुलामीची साडेसाती घोरीपासून सुरु झाली. ते ग्रहण १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी संपलं.

भारतातील राजा-महाराजांना या परकीय हल्लेखोरांचं युद्धतंत्र नवीन होतं. चपळ, थोराड सशक्त घोडे, खड्ग, तलवार, तोफा, हे त्याचं बलस्थान होतं. हे तुर्की जातिवंत योद्धे होते. नवीन युध्दसामग्रीही त्यांच्या एकमुखी युध्दनीतीला पोषक होती. क्रौर्य हा त्यांचा सहजभाव होता. त्याउलट प्रचंड सैन्यसंख्या आणि हत्ती घोडे ही भारतीय राजांची शक्ती होती.

सल्तनतीच्या या काळात भारतात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत अनेक राजघराणी नांदत होती, राज्यविस्तार करत होती. राजपूत हे शूर, पराक्रमी राजे उत्तर भारतात सत्ता गाजवत होते. अजमेर सांबरचे चाहमान म्हणजे चौहान, माळव्याचे परमार, बुंदेलखंडाचे चंडेला, चेदीचे कलचुरी, गुजराथचे चालुक्य, मगधचे पलाश, कनोजाचे राठोड, अशी अनेक घराणी सत्ता गाजवत होती. दिल्लीवर आलेल्या अफगाणी, तुर्किंशी झुंजत होती.

१३ व्या शतकात अल्लाउद्दिन खिलजीपासून दक्षिणेच्या राजसत्तांचा दिल्लीच्या सुलतानांना परिचय झाला. उत्तरेकडून वादळाचे ढग भूमी व्यापत पुढे

पुढे सरकावेत, त्याप्रमाणे अल्लाउद्दिन खिलजीमुळे विंध्य पर्वतरांगांच्या दक्षिणेचा भारतही या इस्लामी परकीय आक्रमणांनी झाकोळला. तुघलक सरदार हसन गंगू बहामनीमुळे इस्लाम धर्म दक्षिण गिळायला लागला. त्यामुळे दक्षिणेत राजकीय चक्राला जोरात गती मिळाली. निजामशाहीची स्थापना झाली. या मुस्लिम धर्मसत्तांना टक्कर देण्यासाठी विजयनगराची स्थापना, स्वराज्याची स्थापना, अशा एकेका शतकात एकेक राजसत्ता उदयाला आल्या. दक्षिणेची रणभूमी या झंझावातात अस्तित्वासाठी लढत राहिली. या काळात भारतीय समाज, संस्कृती, युद्धशास्त्र, युद्धनीती, युद्धसामग्री, सारंच ढवळून निघालं. इस्लामी जेत्यांच्या सक्तीच्या धर्मांतरामुळे अर्ध रक्त हिंदू, अर्ध रक्त इस्लामी अशी नवीन प्रजा निर्माण झाली. त्यातच दक्षिण भारताच्या किनाऱ्यावर १६ व्या शतकापासून नवीन युरोपियन व्यापारी उतरायला लागले होते, पण त्यांचा परिणाम अजून दिसायचा होता.

दिल्लीच्या सुलतानांचं राजकारण मुख्यत्वेकरून दिल्लीपासून राजपूत, बंगाल, आणि मुलतानपर्यंतचा प्रांत, यातच फिरत राहिलं. महंमद घोरीच्या विजयापासून बाबरने इब्राहिम लोदीचा पराभव करून आग्रा जिंकण्यापर्यंत,११९२ ते १५२६ या वर्षांच्या बदलत गेलेल्या घराण्यांच्या काळाचा समावेश या पुस्तकात आहे. दिल्लीच्या सर्व सुलतानांचा व्यक्तिगत परिचय आहे. तसेच त्यांच्या स्वाऱ्या-लढाया-बंड या राजकारणाचा धावता उल्लेख आहे.

बाबराने पानिपतावर २० एप्रिल १५२६ मध्ये सुलतान इब्राहिम लोदीला जिंकलं आणि दिल्लीचा ताबा मिळवला. आपला शहजादा हुमायूँ आग्र्याचा खजिना आणि किल्ल्याचा ताबा घेण्यासाठी पाठवलं आणि बाबरची पातशाही सुरु झाली. हिंदू-अफगाणी-तुराणी-इराणी-फौजेमधल्या लढायांबरोबर यमुनेचं पाणी आता मुघलांच्या रक्तानेही लाल व्हायला लागलं.

इ. स. १५२६ला आपली सत्ता कायम केल्यावर पुढे १८५७ सालापर्यंत, बाबरचाच फक्त मुघल वंश ३३० वर्षे दिल्लीत चालला. त्या काळात घराणी बदलली

नाहीत. बाबरपासून बहादूरशहा जाफरपर्यंत एकच घराणं दिल्लीवर सत्ता गाजवत राहिलं. त्यामुळे बाबरच्या कुलाचा या पुस्तकात समावेश नाही.

डॉ. स्मिता दामले.

Email;- suhasdamle341@hotmail. com

## दिल्ली सल्तनत क्रम

- महंमद घोरी. दिल्ली सल्तनतीचा संस्थापक. जन्म-११४९. मृत्यू १५ मार्च १२०६
- कुतुबुद्दीन ऐबक. दिल्लीमध्ये गुलाम रियासतीचा संस्थापक. इ. स. ११५० ते १२१०
- सुलतान शमसुद्दीन अल्तमश. मृत्यू- २८ एप्रिल १२३६
- रझिया सुलतान. जन्म-१२०५- मृत्यू १४ ऑक्टोबर १२४०
- गियासुद्दीन बलबन जन्म-१२०० मृत्यू-१२८७.
- जलालुद्दीन खिलजी. जन्म १४ ऑक्टोबर १२२० मृत्यू १२ जुलै १२९६.
- अल्लाउद्दीन खिलजी. जन्म १२५० . मृत्यू ४ जाने. १३१६. कुतुबुद्दीन खिलजी.
- जन्म १३००. मृत्यू जून १३२०. घियासुद्दीन तुघलक मृत्यू फेब्रुवारी १३२५.
- महंमद बिन तुघलक. इ. स. १३०० – २० मार्च १३५१.
- फिरोजशहा तुघलक. १३०९ – २० सप्टेंबर १३८८.
- तुघलक खान-घीयासुद्दिन तुघलक. मृत्यू – १४ मार्च १३८९.
- खिज्रखान सय्यद. मृत्यू २० मे १४२१.
- लोदी राजसत्ता बहलोलखान लोदी जन्म १४०६. मृत्यू १२ जुलै १४८९.
- सिकंदर लोदी. मृत्यू २१ नोव्हेंबर १५१७.
- इब्राहिमखान लोदी. मृत्यू २१ एप्रिल १५२६.


# महंमद घोरी.
# दिल्ली सल्तनतीचा संस्थापक.
# जन्म-११४९. मृत्यू १५ मार्च १२०६

लढाऊ टोळ्या घेऊन, घोडदळ घेऊन जायचं, कोणत्यातरी जमातीवर हल्ला करायचा, धनुष्यबाणाने ते जिंकायचं आणि सत्ताबदल घडवायचा हे अफगाणिस्थानातील राजवटीचं कायम लक्षण होतं. अनेक लढाऊ टोळ्या आपली सत्ता गाजवायला दुसऱ्या वस्त्यांवर हल्ला करत. या देशात राजा आणि प्रजा अशी राज्य व्यवस्था नव्हती. त्यामुळे प्रत्येकजण स्वत:ला मलिक म्हणवून घेई. अशाच अनेक टोळ्यांपैकी एक होती घुर प्रांतातील घुरी टोळी. गझनीच्या महमंदची सत्ता एके दिवशी शहाबुद्दीन महंमद घोरीने तलवारीच्या जोरावर उलथवली आणि गझनीमध्ये आता घोरी घराणं सत्तेवर आलं.



घुर हा अफगाणिस्थानच्या पश्चिमेकडचा मध्यवर्ती भाग. ५ पर्वतांच्या रांगांनी वेढलेला. या ठिकाणी राहणारी जमात शांतपणे आपल आयुष्य जगत होती. अक्रोड, जर्दाळू, तुती, यांची पिकं घ्यायची शेती आणि गुरं  पाळण्याचा उद्योग करायचा हा त्यांचा व्यवसाय. अवतीभोवतीच्या पर्वतांमध्ये धातूच्या खाणी खूप. त्यामुळे लढाईला लागणारी आयुधं हे लोक बनवत आणि आजूबाजूच्या प्रदेशात विकून येत. गुलामांचा पुरवठा करण्यात ही जमात प्रसिध्द होती. गझनीच्या महंमदपासून या प्रांतात इस्लामचा प्रसार झाला.

इ. स. ११४९ साली मुझाउद्दीन – महंमद घोरीचा जन्म झाला. याला एक मोठा भाऊ होता, त्याचं नाव गियासुद्दीन महंमद. याचा बाप बहालुद्दिन हा गावचा मुखिया होता. दोन्ही मुलगे लहान असतांना यांच्या काकाने, सैफीउद्दीन याने या दोन्ही भावांना तुरुंगात टाकलं. पण सैफीउद्दीनचा खून झाल्यावर त्याच्या मुलाने आपल्या दोन्ही चुलत भावांची सुटका केली. मग गावातील लोकांनी गियासुद्दीनला गावचा प्रमुख केलं. आणि सेनापती बनला महंमद घोरी..




दोघांनी मिळून गावातील आपल्या विरोधकांना पराभूत करण्याचा उद्योग सुरु केला. त्यात त्यांचे दोन्ही काकाही होते. या स्पर्धकांना ठिकाणी लावल्यावर

दोघांनी जवळपासची सर्व ठाणीही जिंकायला सुरवात केली, आणि आपली सत्ता वाढवली. त्यानंतर त्यांनी हल्ला केला तो थेट गझनीवर. गझनी हे फार मोठं सामर्थ्यवान सत्तेचं केंद्र. गझनी हाती येणं म्हणजे राज्य हाती येणं. या काळातील त्यांचे प्रमुख शत्रू होते सेल्ज्युक राजवंशी. या वंशजालाही त्यांनी कमजोर करून टाकलं. दोघांनी मिळून अफगाणिस्थानात सत्तेच्या सींमा विस्तारल्या. आता त्यांची नजर वळली ती भारताकडे.

नद्या-पर्वत-पाणी-फुलं-भाज्या-धान्य-पिकं यांनी समृध्द असलेला भारत श्रीमंत देश. त्याच्या पश्चिम-उत्तर दिशांच्या सीमा हिंदुकुश,सुलेमान, हिमालय पर्वत रांगांनी वेढलेल्या होत्या. या पर्वतरांगांमध्ये खैबर, बोलन, कुर्रम, तोची, आणि गोमूल खिंडी होत्या. त्या पार करून भारतात शिरावं लागत असे. अफगाणिस्थानमधून भारतात यायला सुलेमान पर्वतरांगा ओलांडून यावं लागे. खैबरखिंडीतून यायचं तर तिथल्या पायथ्याशी असलेल्या शूर जमाती कडवा विरोध करत. त्यामुळे गोमूल खिंडीतून येण्याचा मार्ग व्यापारी, प्रवासी तांड्याना सोपं होत असे. या गोमुल खिंडीच्या बाहेर पहिला तळ ठोकावा लागे तो डेरा इस्माईलखान या जागी. आणि पुढचा तळ पडे तो मुलतान या गावी.

महंमद घोरी भारत उपखंडावर पोचण्याआधी त्याचं प्रवेशद्वार असलेल्या मुलतानवर आधी पोचला. या भूमीवर त्याने साहसी स्वाऱ्या चालू केल्या. इ. स. ११७५ साली त्याने तिथल्या राजाचा पराभव केला. पाठोपाठ उच्छ हे राज्य, तिथल्या राणीला फितवून जिंकलं. त्यानंतर तो सोमनाथला गेला. या दोन विजयानंतर महंमद घोरी मुलतानवर आला.

२ वर्षांनी तो अनहलवाडा, ( आताचं पाटण ) गुजराथवर, इ. स. ११७८ मध्ये स्वारी करायला परत आला. इथे सोळंकी वंशाचा वारस, राजा भीमदेव द्वितीय राज्य करत होता. मुलतानवरून वाळवंट ओलांडून तो अपार हाल सोसत गुजराथवर आला. यावेळी अजमेरच्याजवळ हे राज्य असूनही अजमेरचा राजा पृथ्वीराज चौहान आपल्या प्रधानाच्या सल्ल्यावरून या राजाच्या मदतीला गेला नाही. ते

कमजोर झाले तर पृथ्वीराज चौहानचा फायदा होता हा सल्ला पृथ्वीराज चौहानच्या वजिराने राजाला दिला, म्हणून तो गप्प बसला. पण या राजाने अबूजवळ कायदरा इथे घोरीला पार हुसकावून लावलं. भारी पराजय पावून घोरी माघारी गेला.

वाळवंटात झालेले फौजेचे अनन्वित हाल पाहून, भारतात येण्यासाठी त्याने आता पंजाबचा मार्ग शोधला. पेशावर ११७९, सियालकोट ११८५, आणि ११८६ साली लाहोर जिंकून त्याने भारतावरच्या आक्रमणाचा पाया भक्कम केला. भारतासारखा समृध्द देश पाहिल्यावर इथे वरचेवर स्वारी करायची तर जवळच्या भागात एखादं भक्कम ठिकाण हवंच, त्या दृष्टीने लाहोर उत्तम ठिकाण होतं. इ. स. ११८६ मध्ये गझनीचा शासक, खुस्रो मलिकला महंमद घोरीने दगाबाजीने पकडलं आणि लाहोर हे आपलं भक्कम ठिकाण बनवलं.

आता महंमद घोरीला हिंदुस्थान जवळ आला. त्याच्या पराक्रमाला आता दिल्लीचं वैभव खुणावू लागलं. यावेळी अजमेरच्या पृथ्वीराज चौहानच्या हाती दिल्ली होती. दिल्लीचा राजा अनंगपाल याला दोन मुली होत्या. मोठी कमलादेवी अजमेरच्या सोमेश्वरला दिली. त्यांचा मुलगा पृथ्वीराज. आपली दुसरी मुलगी रूपसुंदरी ही अनंगपालने कनोजच्या राठोड घराण्यात दिली. त्यांचा मुलगा जयचंद. पृथ्वीराज आणि जयचंद हे मावसभाऊ. दोघांच्यात मोठी चुरस होती.



पृथ्वीराज ११ वर्षाचा होता, तेव्हा सोमेश्वर वारला. मग आईने आणि प्रधानमंत्री कदंबस यांनी पृथ्वीराजला राजकारणाचे धडे दिले. पृथ्वीराज मुळातच शूर होता.. वयाच्या १५ व्या वर्षी गादीवर येताच त्याने जवळपासच्या सर्व संस्थानिकांना मंडलिक करून घेतलं. त्याचं बालवय पाहून जवळपासच्या राजांनी डोकं वर काढायला सुरुवात केली.

पृथ्वीराजाने पहिली स्वारी केली ती आपल्या चुलत भावावर, नागार्जुनवर. इतरांना दहशत बसावी म्हणून त्याने मृत सैनिकांची मुंडकी अजमेरच्या वेशीवर टांगली. पाठोपाठ भडनकास, चंडेल राजेही त्याला शरण आले. पृथ्वीराजच्या या पराक्रमावर खूष होऊन आजोबा अनंगपालने दिल्लीचं राज्यही पृथ्वीराजाच्या हाती सोपवलं. जयचंद आणि पृथ्वीराजमध्ये मत्सराची पहिली ठिणगी पडली. ही ठिणगी चेतवली गेली ती पृथ्वीराजने जयचंदच्या मुलीला, संयोगिताला, स्वयंवराच्या मांडवातून पळवून नेलं तेव्हा.

यावेळीच घोरीच्या भारताच्या जवळपासच्या प्रदेशात स्वाऱ्या चालू झाल्या होत्या. इ. स. ११९१ मध्ये दिल्लीजवळ १०० मैलांवर असलेल्या भटिंडा किल्ल्यावर घोरीने स्वारी केली. तो किल्ला जिंकून त्याने आपल्या काझी झियाउद्दीनची तिथे नेमणूक केली आणि तो गझनीला परत जायला निघाला. या झियाउद्दीनने हिंदूंचा छळ चालवला. ते ऐकून पृथ्वीराज २ लाख घोडदळ आणि ३०,००० हत्ती घेऊन भटिंडा जिंकायला निघाला. घोरीला गझनीच्या वाटेवर ही बातमी कळल्यावर तो तसाच भटिंडा वाचवायला परत फिरला.

दिल्लीजवळच्या, कर्नालजवळच्या तराईन गावावर उतरला. दोन्ही फौजांची गाठ पडली. पृथ्वीराजच्या सैन्याने घोरीची फौज दोन्ही बाजूंनी चिमटीत धरून मोडली. घोरीचं घोडदळ रणांगण सोडून पळायला लागलं. हाताशी असलेले उरलेले सैनिक घेऊन घोरी लढत राहिला. इतक्यात पृथ्वीराजचा भाऊ गोविंदराय घोरीच्या समोर आला. दोघांनी एकमेकांवर भाले फेकले. गोविंदरायचा भाला घोरीच्या खांद्यात अडकला आणि घोरीच्या भाल्याने गोविंद रायाचे पुढचे दोन दात पडले. जखमी घोरीला त्याच्या खिलजी नावाच्या सैनिकाने आपल्या घोड्यावर घातलं आणि रण सोडून तो तळावर घेऊन आला. काही दिवस लाहोरला राहून बरा झाल्यावर गझनीला परतला. आता त्याला पराभवाचा बदला घ्यायचा होता.

गझनीला पोचल्यावर त्याने पळून गेलेल्या सर्व फौजेला घरी बसवलं. कडक शिक्षा दिल्या. अफगाण, तुर्की तरुणांची नवीन भरती केली. त्यांना प्रशिक्षण दिलं. १

लाख २० हजार घोडदळ नव्याने तयार केलं, आणि आता नवीन रणनीती घेऊन तो भारताच्या मार्गावर निघाला. दिल्ली जिंकणं हे एकच वेड  घेऊन. लाहोरच्या मैदानावर त्याच्या फौजेचा तळ पडला. लाहोरहून दिल्ली लांब. जवळ जवळ ४०० मैलांवर. लाहोरहून त्याने आपला माणूस, कोवम-उल-मुल्क- हमझवी याला, पृथ्वीराजकडे निरोप देऊन पाठवलं, मुसलमान व्हायचं नसेल तर लढायला तयार हो.. पृथ्वीराजनेही उलटा जबाब दिला की, माझे शूर सैनिक गोळा होत आहेत, आयुष्याचा कंटाळा आला असला तरी जगण्याची मजा घ्यायला परत जा. तुझ्या सुखरूप जाण्याची जबाबदारी आम्ही घेतो.

शेवटी युध्द अटळ होतंच. पृथ्वीराजाच्या मदतीला सर्व राजे आपापली फौज घेऊन गोळा झाले. पृथ्वीराजची फौज पाहून घोरीने दगाबाजीचा मार्ग स्वीकारला. “ मी केवळ सेनापती म्हणून आलो आहे. माझ्या भावाच्या सांगण्यावरून मी ही मोहीम काढली आहे. मी त्याच्याकडे उत्तर मागवतो, आणि तोपर्यंत शस्त्रसंधी करतो, असा त्याने दुसरा निरोप पाठवला..

घोरी घाबरून परत जातोय या उत्तराने हुरळून जाऊन पृथ्वीराज आणि त्याची फौज गाफील राहिली. मौजमजेत बुडाली. घोरी या त्यांच्या अपेक्षित अविचारीपणाची वाटच पाहत होता. त्याने लगेच आपल्या सैन्याच्या २ तुकड्या केल्या. जड सामान लाहोरला ठेवलं, अतिचपळ घोडदळ घेऊन मोठ्या मोठ्या मजला मारत तो अचानक पहाटे पृथ्वीराजच्या छावणीकडे छापा घालायला आला. बेसावध असलेल्या राजपूत फौजेची मोठीच तारांबळ उडाली. पहाटे पहाटे झालेल्या या हल्ल्याने गोंधळलेले, कसेबसे घोड्यांवर स्वार होत, पृथ्वीराजचे सैनिक लढायला उतरले.. बघता बघता त्यांनी युद्धावर नियंत्रण मिळवलं. त्याबरोबर घोरीने आपली चाल बदलली.

घोरीकडे चिलखतधारी फौज आणि चिलखत घातलेले घोडे होते. घोरीने रजपूत फौजेला आपल्या अंगावर पाठलागावर येऊ दिलं आणि मग पुढे आलेल्या शत्रूच्या फौजेला दोन्ही बगलेतून बाणांच्या वर्षावाने आपल्या फौजेने रजपुतांच्या

फौजेभोवती वेढ्याचा फास आवळला. त्यांना पाठशिवणीच्या खेळाने दमवलं आणि दुपारी १२००० सैनिकांची नवीन फौज रणांगणात उतरवली. त्यात राजपूतांची दिवसभर लढून थकलेली फौज पार पराभूत झाली. खूप मोठा नरसंहार झाला. लाखभर सैन्य संपलं. पृथ्वीराज मारला गेला की पकडला गेला ते स्पष्ट नाही. काहींच्या मते त्याला घोरी गझनीला घेऊन गेला.

महंमद घोरी जिंकला. तो का आणि कसा जिंकला याचं सविस्तर विवेचन सर जदुनाथ सरकार यांनी करून ठेवलं आहे. आजवर या खंडप्राय भारतात ज्या लढाया चालत त्या एत्तदेशीय राजांमध्ये होत असत. महंमद घोरीचं आक्रमण हे पहिलं परकीय आक्रमण होतं. ते मुसलमानांचं होतं. त्यांच्या आणि आपल्या संस्कृतीत प्रचंड फरक होता.

**१**. पहिलं म्हणजे वर्ण पद्धतीने आपल्या समाजाला जे लपेटलेलं होतं, त्यात लढणे हा एका जमातीचा – क्षत्रियांचा व्यवसाय होता. ते घोरीच्या फौजेत नव्हतं. त्याचे सर्वच पुरुष शस्त्र चालवण्यात तरबेज होते. पण आपल्या देशातील ब्राह्मण-वैश्य-शूद्र हा तीन चतुर्थांश समाज शस्त्र हाताळणे जाणतच नव्हता. त्यामुळे गाव,खेडी, शहर यावर हल्ला झाला तर आपोआप शत्रूला विजय मिळाला.

**२**. आपल्या फौजेत हत्ती आणि उंट यांचा भरणा जास्त होता, आणि सैनिकांची संख्या प्रचंड मोठी होती, ज्यामुळे हालचालींवर बंधने पडली. मोठा फरक आणखी एक होता तो म्हणजे घोरीच्या अरबी आणि भारतीय घोड्यांची ताकद. त्याचे सशक्त, थोराड, कातडी चिलखत घातलेले अरबी घोडे. घोरीच्या पळून जाणाऱ्या सैन्याचा पाठलाग पृथ्वीराजाकडचे घोडे करू शकले नाहीत. ते थकले.

**३**. शिवाय शत्रूच्या पिछाडीला जाऊन मागच्या बाजूने शत्रूवर हल्ला करण्याची रणनीती त्यांना यश देऊन गेली. या पद्धतीला तुलुगामा असा उझबेकी शब्द होता. घोरीची फौज खड्ग, तलवार, धनुष्य बाणाने लढत होती. मध्य

आशियात रिकिबीचा शोध लागल्याने योद्ध्याचे हात मोकळे झालेले होते आणि तो दोन्ही हातांनी शरसंधान करू शकत होता.

४. संध्याकाळी युध्द थांबवायची आपल्याकडची प्रथा जी या शत्रुमध्ये नव्हती. त्यामुळे  रात्री छापे घालणं आणि बेसावध शत्रूला कापून काढणं या तुर्की लोकांच्या विजयाला कारण ठरलं.

५. भारतीय फौजेला रसद मिळवायला लमाण जमातीवर अवलंबून राहावं लागायचं, ज्यांची गती अत्यंत संथ होती. त्याउलट घोरीच्या फौजेचा दाणागोटा घोड्यांच्या पाठीवर लादलेला असायचा. घोडे कुठेही चरायला मोकळे सोडले जात. हा एक मोठा फायदा या घोरीच्या फौजेचा होता.

६. आणखी एक मोठा भेद म्हणजे यांच्या धर्मात मद्य निषिद्ध होतं, त्या उलट संध्याकाळी लढाई संपल्यावर भारतीय फौज मद्य सेवनात बुडालेली होती. पृथ्वीराज चौहानच्या राजपूत फौजेला या कारणांमुळे पराभव पत्करावा लागला.

अजमेरला पृथ्वीराजच्या मुलाला मांडलिक बनवून, गादीवर बसवून सर्व व्यवस्था लावून घोरी परत गेला. भारतावर सत्ता गाजवायची तर लाहोरपेक्षा त्याला दिल्ली राजधानी करणं योग्य वाटलं कारण परत रजपूतांशीच त्याला लढायचं होतं त्यासाठी दिल्ली ठिकाण मध्यवर्ती होतं.

११९२ साल हे भारतातील सिंहासन पर्व संपून सल्तनत पर्व सुरु झाल्याच्या कलाटणीचं वर्ष ठरलं. ज्या दरवाजाने घोरी दिल्लीच्या किल्ल्यात शिरला त्याचं नाव गझनी दरवाजा कायम झालं. दिल्ली आता अफगाण्यांची झाली. घोरीच्या मदतीला गेलेला जयचंद खूष झाला. दिल्लीला अमाप लूट मिळाली. घोरी मालामाल झाला.

पृथ्वीराजाच्या पाठोपाठ महंमद घोरीने कनोज जिंकलं. यमुनेच्या काठी इटाव्याजवळ, चांदवड इथे जयचंद मारला गेला. मग घोरी काशीवर गेला. पवित्र देवळांचा त्याने नाश केला. ती फोडली. बनारसला घोरीला पांढरा हत्ती मिळाला. हा फार दुर्मिळ हत्ती होता. आपल्या हत्तीखान्यात पांढरे हत्ती  असणं हे त्याकाळी

वैभवाचं लक्षण होतं. अशा हत्तींसाठी, या दुर्मिळ जातीच्या हत्तींच्या शोधात राजेमहाराजे सतत असत. महंमद घोरीने तो पांढरा हत्ती त्याचा विश्वासू गुलाम सेवक कुतुबुद्दीन ऐबक याला देऊन टाकला. ( सम्राट अकबर अशा हत्तीच्या शोधात होता, पण त्याला कधी तो मिळाला नाही. मात्र शहाजहानकडे असा हत्ती होता. )

महंमद घोरीचं हे वादळ बंगालपर्यंतचा प्रदेश उध्वस्त करून गेलं. सर्व हिंदू राज्यं पत्त्यासारखी कोसळली. घोरीचा दुसरा सरदार बख्तियार खिलजीने लखनौती (बंगाल) जिंकलं. त्याचं नाव आपल्या नेत्याच्या अभिमानापायी घोरीबंगाल ठेवलं. त्याचाच पुढे नाव गौडबंगाल हा अपभ्रंश तयार झाला. ११९५-९६ साली घोरी परत आला आणि ग्वाल्हेर परिहार घराण्याने त्याचं मांडलिकत्व स्वीकारलं. पुढे अनहलवाडा हातात आलं. इ. स. ११९९ मध्ये बदायु जिंकलं. ही ठिकाणं त्याच्या सरदारांनी जिंकली. इ. स. १२०२ मध्ये महंमद घोरीचा भाऊ गियासुद्दीन मरण पावला त्याच्या जागी महंमद आता सुलतान बनला.


घोरीने आपल्या सत्तेचा भारतात प्रथम तुर्की झेंडा रोवला. महंमद घोरी गझनीचं आपलं साम्राज्य सांभाळायला निघून गेला. आपला विश्वासू गुलाम सेवक कुतुबुद्दीन ऐबकला त्याने दिल्ली, लाहोर आणि जवळपासच्या भागाचा सुभेदार केलं. ऐबक उत्तम रितीने दिल्लीची सल्तनत सांभाळायला लागला. महंमद घोरी परत एकदा पाकिस्तानमधील पंजाबच्या स्वारीवर आला तेव्हा कुतुबुद्दीन ऐबक आपली फौज घेऊन त्याच्या मदतीला पंजाबला गेला. दोन्हीकडील हजारो सैनिक मारले गेले पण या लढाईत घोरीचा विजय झाला.

या लढाईनंतर महंमद घोरी आपल्या तंबूत संध्याकाळी आराम करत होता, तेव्हा अचानक शत्रूकडचे काही लोक अचानक त्याच्या तंबूत घुसले आणि त्यांनी महंमद घोरीला ठार केलं. सिंधू नदीच्या काठावर दमयाक गावी, घोरीचा अंतकाळ झाला तो दिवस होता १५ मार्च, १२०६. त्याचं शव गझनीला नेलं आणि मग १० एप्रिल या दिवशी दफन विधी केला गेला.

महंमद घोरीच्या या आकस्मिक मृत्यूमुळे छावणीमध्ये मोठाच कोलाहल माजला. कुतुबुद्दीन ऐबकाने परिस्थिती नीट हाताळली. घोरीला स्वत:चा मुलगा नव्हता. गझनीमध्ये गादीसाठी स्पर्धा सुरु झाली आणि शेवटी महंमद घोरीचा पुतण्या सत्तेवर आला. आपण असमर्थ आहोत हे जाणून त्याने काही दरबारी लोकांबरोबर शाही शिक्के, शाही छत्री, जरीपटका, नौबत-नगारे दिल्लीला कुतुबुद्दीनकडे ऐबककडे पाठवून त्याला दिल्लीचा बादशहा म्हणून घोषित केलं आणि दिल्लीचं राज्य सांभाळायची जबाबदारी कुतुबुद्दीन ऐबकवर टाकली. कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा सुलतान बनला. महंमद घोरीमुळे दिल्ली जिंकून मुसलमानी सत्तेचा इ. स. ११९१ मध्ये प्रारंभ झाला.

शतकानुशतकांचं दिल्लीतील सिंहासन मोडून पडलं. सल्तनत सुरु झाली.

भारताच्या देदीप्यमान सुवर्णकाळाने कूस बदलली.



# कुतुबुद्दीन ऐबक.

# दिल्लीमध्ये गुलाम रियासतीचा संस्थापक.


# इ. स. ११५० ते १२१०

नियतीचा खेळ अजब असतो. अनाकलनीय असतो. कुतुबुद्दीन ऐबक हे त्याचंच उत्तम उदाहरण. भारतातही गुलामांचा, दासी-बटकी-दासांचा बाजार भरत असे, पण त्यातलं कुणी सत्ता काबीज करून सिंहासनावर बसलं नाही. तुर्कस्थानातील गुलामांनी मात्र हा चमत्कार घडवला. गुलामांची खरेदी, सामान्य ते अमीर, सर्वच करत असत. घरकामापासून राजवाड्यात अंगरक्षकाच्या कामापर्यंत यांची गरज असे. एक प्रकारचं ते employment एक्सचेंजच होतं.

गुलामांच्या बाजारातून विकत घेतलेला नसरुद्दिन सबक्तगीन हा असाच एक गुलाम. अंगात पाणी होतं, हातात तलवार होती, जातिभेदाचं जोखड कर्त्तृत्वाच्या आड येत नसे. कारण जातीभेद नव्हतेच त्यांच्या धर्मात. आयुष्यावर त्याचं जोखड नव्हतं. गझनीचा सुभेदार अलप्तगीन मेला आणि सुबक्तगीन तख्तावर  बसला. जेव्हा लाहोरचा राजा जयपाल याने गझनीवर स्वारी केली, तेव्हा त्याला पराभूत करून सुबक्तगीनने जयपालाचा मोठा खजिना मिळवला. पण सुबक्तगीन मोठा दयाळू होता. त्याने युध्दकैद्यांना मोठ्या मनाने सोडून दिलं. त्याच्या मुलामध्ये, महंमदमध्ये या विशाल अंत:करणाचा लवलेशही नव्हता. हाच तो पुत्र गझनीचा महंमद, जो १७ वेळा सोमनाथावर स्वारी करून गेला.

गुलामांच्या यादीत इतिहासात आपलं नाव रोशन करणारा दुसरा गुलाम म्हणजे कुतुबुद्दीन ऐबक. ऐ म्हणजे चंद्र आणि बक म्हणजे बेग, अमीर. त्याचा जन्म इ. स. ११५० सालचा काझागीस्तांमध्ये झाला. कुतुबुद्दीन ऐबक बालवयातच

गुलामांच्या बाजारात उभा राहिला. नेशापूरच्या बाजारात फक्रुद्दीन अब्दुल अजीज कुफी नावाच्या एका काझीने त्याला विकत घेतलं आणि आपल्या मुलांबरोबर वाढवलं. आपल्या मुलांच्याबरोबरीने कुतुबुद्दीनलाही लष्करी आणि साक्षरतेचे धडे दिले. उत्तम संस्कार केले. कुराण म्हणण्यात कुतुबुद्दीन नावाजला गेला, त्यामुळे त्याला कुरानखान या नावाने लोक ओळखत असत. काझीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांनी त्याला परत एकदा गुलामांच्या बाजारात उभं केलं. एका आमिरने त्याला विकत घेतलं आणि महंमद घोरीला भेट म्हणून पाठवलं. घोरीच्या राजमहालातील त्याचा गृहप्रवेश, त्याच्या भावी सिंहासन मार्गाकडे नेणारं पहिलं पाऊल ठरलं.



कुतुबुद्दीनला दौलतीचा हव्यास नव्हता. एकदिवस सुलतान महंमद घोरी आपल्या महालात बसून मुठी भरभरून अश्रफी उधळत होता, आणि सारा सेवक वर्ग त्या गोळ्या करण्यात दंग झाला होता. पण कुतुबुद्दीन मात्र त्याच्याजवळ पडलेल्या अश्राफिया गोळा करून इतर गुलामांना वाटत होता. महंमद घोरीला त्याचं मोठं आश्चर्य वाटलं. त्याने कुतुबुद्दीनला आपल्याजवळ पकडून आणलं आणि

रागावून म्हणाला, मी दिलेलं इनाम नाकारून परत इतरांना वाटतो आहेस, हा माझा अपमान करतो आहेस.. तुला काय दंड देऊ सांग. तेव्हा नम्रपणे कुतुबुद्दीन उत्तरला, हुजूर, तुमच्या कृपेशिवाय मला काहीही नको. घोरी चकित झाला आणि खूषही झाला. त्याने त्या क्षणी, कुतुबुद्दीनला हुजरातीच्या पागेचा मुख्य करून टाकलं. त्यानंतर सतत आपल्याबरोबर कुतुबुद्दीन ऐबकला घ्यायला लागला. त्या नंतरच्या प्रत्येक लढाईत कुतुबुद्दीन ऐबक लढतांना सुलतानाच्याजवळ अंगरक्षक बनून रक्षण करायचा.

कुतुबुद्दीन ऐबक सुलतानाचा इतका लाडका झाला की खिवा प्रांतावर केलेल्या स्वारीच्या वेळी शत्रूंनी अनेक बंदी पकडून नेले त्यात कुतुबुद्दीनसुद्धा होता, तेव्हा सुलतानाला त्याच्याशिवाय चैन पडेना. परत दुसरे वर्षी घोरीने खिव्यावर स्वारी केली आणि लढाई जिंकली. मग ऐबकला शोधून काढण्यासाठी सारी माणसं कामाला लावली, पण कुतुबुद्दीन ऐबक सापडला नाही. सुलतान उदास होऊन आपल्या महालात बसला होता एवढ्यात वर्दी आली की ऐबक येत आहे. सुलतान अक्षरश: धावत सुटला आणि स्वत: कुतुबुद्दीन ऐबकाच्या उंटाचे लगाम पकडून त्याला आत घेऊन आला. त्यानंतर ऐबक परतला म्हणून कित्येक दिवस आनंदोत्सव चालू होता.

महंमद घोरीच्या पृथ्वीराजावरील स्वारीच्या वेळी ऐबक त्याच्याबरोबर हजर होता. कनोज आणि बनारस राज्यं लुटताना महंमद घोरीला अगणित सोनं, चांदी, हत्ती, घोडे मिळाले. त्यात एक पांढरा हत्तीही मिळाला. तो गझनीला न नेता घोरीने कुतुबुद्दीन ऐबकला भेट देऊन टाकला. ऐबक कायम त्या हत्तीवरच स्वार होत असे. त्याला त्या हत्तीचा जेवढा लळा तेवढंच प्रेम त्या हत्तीला आपल्या मालकाबद्दल होतं. असं सांगितलं जातं की ऐबकचा मृत्यू झाला तेव्हा बरेच दिवस मालक आपल्यावर स्वार झाला नाही हे लक्षात येऊन तो हत्तीही उदास राहू लागला आणि एक दिवस त्याने प्राण सोडला.

दिल्ली जिंकल्यावर महंमद घोरी गझनीला निघून गेला, आणि त्याचं उरलेलं काम कुतुबुद्दीन ऐबकाने पुढे चालू ठेवलं. त्याने ग्वाल्हेर जिंकलं. गुजरात जिंकलं. त्याच्या या यशाची वाढती कमान पाहून अनेक दरबारी त्याचा मत्सर करायला लागले आणि सुलतानाचे कान भरायला लागले. ऐबक आता तुम्हाला तख्तावरून खाली ओढणार आणि स्वत: सुलतान होणार अशी त्यांनी सुलतानाच्या मनात भरवलं. कुतुबुद्दीन ऐबकाच्या कानावर ही बातमी पोचल्याबरोबर, हातातील कामं सोडून तो गझनीला धावला. सुलतानाला भेटला. त्याच्या इमानदारपणाची शपथ घेतली. महंमद घोरीचा दिल साफ झाला.

दुसरे दिवशी सुलतनाने सर्व दरबारी लोकांना आपल्या महालात बोलावलं, आणि त्यावेळी कुतुबुद्दीनला पलंगाच्या खाली लपवलं. दरबारी आले, घोरीने मुद्दाम ऐबकचा विषय उकरून काढला. त्याबरोबर सर्व अमीर काहीबाही बोलून कुतुबुद्दीनची बदनामी करायला लागले. त्याबरोबर सुलतानाने पलंगाखाली लपलेल्या ऐबकला बाहेर काढलं आणि ऐबकला पाहून जे जे काही सर्व लोक बोलले होते, त्यांचे चेहरे खर्रकन उतरले. सुलतानाने सर्वांना हाकलून लावलं आणि परत अशी बदनामी कराल तर डोकं उडवण्याची धमकी देऊन ठेवली. महंमद घोरीचं त्याच्यावर पुत्रवत प्रेम होतं. तो स्वत:च म्हणायचा की मला मुलगा नाही, हा ऐबक तर माझा  मुलगाच आहे.

पृथ्वीराजला पराभूत करून घोरीने दिल्लीच्या किल्ल्यात प्रवेश केला. तेथील मंदिर पाडून मशीद बांधायचं काम ऐबकला सांगून तो गझनीला निघून गेला. ऐबक कडे गझनीचे कारागीर नव्हते. म्हणून त्याने दिल्लीतील स्थानिक कारागिरांना घेऊन मशीद पूर्ण केली. त्या मशिदीचं नाव होतं, कुव्वल-उल-इस्लाम.. त्यामुळे त्या मशिदीत हिंदू वेलबुट्टी नक्षीकाम, देवतांची चित्रं काढली गेली. कुतुब मिनारचाही कर्ताही कुतुबुद्दीन ऐबकच.

महंमद घोरीची शेवटची स्वारी खोक्कर लोकांच्या विरुध्द झाली. ऐबकही आपली फौज घेऊन त्याच्या मदतीला गेला. युद्धात जय घोरीचाच झाला फौजेची

अपरिमित हानी झाली. दोन्हीकडचे अनेक शिपाई मारले गेले. युध्द संपल्यावर महंमद घोरी आपल्या तंबूत असतांना संध्याकाळी, १५ मार्च १२०६ या दिवशी, अचानक घोरीच्या तंबूत शिरून हल्लेखोरांनी घोरीला ठार केलं. छावणीमध्ये गोंधळ माजला. महंमद घोरीचं शव घेऊन सर्व गझनीला अंत्यसंस्कारासाठी गेले. कुतुबुद्दीनने सारी परिस्थिती नियंत्रणात आणली.

कुतुबुद्दीन ऐबकला महंमद घोरीच्या मृत्यूनंतर आपल्या हाती सर्व सूत्रं मिळवण्यासाठी खूप धडपडावं लागलं. घोरी मेला तेव्हा त्याची सत्ता भारतात, मुलतान पासून, सियालकोट, लाहोर, भटिंडा, अजमेर, हंसी, मीरत, अलिगढ, दिल्ली, बदायु, ग्वाल्हेर, बनारस, अवध, माळवा, कनोज, कलिंग, बिहार, लखनौती (बंगाल), एवढ्या राज्यांमध्ये पसरली होती. घोरी निपुत्रिक वारला. त्यामुळे गझनीच्या तख्तावर कुणाची स्थापना करायची यावर गझनीतील दरबारातील अमिरांच्यामध्ये वाद सुरु झाले.

यावेळी, ३ मोठे सरदार घोरीचं राज्य सांभाळत होते. कुतुबुद्दीनच्या हाती दिल्ली आणि लाहोर पर्यंतचा प्रदेश होता. गझनीचा प्रदेश, नसरुद्दीन एल्दौजकडे होता.. मुलतान आणि सिंधचा प्रदेश नसरुद्दीन कबाचा नावाच्या सरदाराच्या हाती होता. या तिघांच्यात एकहाती अंमल घेण्यासाठी स्पर्धा सुरु झाली.

घोरीनंतर त्याचा पुतण्या गियासुद्दिन महंमद सुलतान बनला. त्याने एल्दौजला आपला प्रतिनिधी बनवलं. त्यामुळे एल्दौज सरदार ऐबकपेक्षा मोठा झाला, तेव्हा ऐबकला शरण आणण्यासाठी एल्दौजने लाहोरवर हल्ला केला. पण ऐबकने त्याचा पराभव केला आणि स्वत:च गझनीवर चालून गेला. त्यावेळी गझनीच्या बचावासाठी गझनीच्या लोकांनी एल्दौजला मदतीला बोलावलं. एल्दौज येतो आहे हे कळल्यावर कुतुबुद्दीन ऐबक तिथून निघून गेला. नंतर कुतुबुद्दीन ऐबकने लाहोर आपल्या हातात ठेवलं. तिथेच मुख्य वास्तव्य केलं. दिल्लीवर त्याचं लक्ष होतंच. आपल्या विरोधकांना एकत्र करण्यासाठी कुतुबुद्दीन ऐबकने विवाह संबंध जोडण्याचा मार्ग स्वीकारला. गझनीचा प्रमुख ताजुद्दीन एल्दौजच्या मुलीशी

त्याने स्वत: लग्न करून तो त्याचा जावई झालेला होताच. मुलतान आणि सिंधचा शासक नसरुद्दीन कबाचा याला आपली बहीण दिली. ऐबकला लाहोरपासून दिल्लीपर्यंत प्रदेश मिळाला होता. घोरीचा आणखी एक सरदार होता बख्तियार खिलजी, जो लखनौती (बंगाल)चा मुख्य होता. गझनी त्याला दूरच होती.

गझनीला नवीन वारस म्हणून आलेल्या सुलतानाने कुतुबुद्दीन ऐबकचा हिंदुस्थानातील परगण्यांचा अधिकार मान्य करून राजाचे शिक्के, राजेशाही छत्र, मानाची वस्त्रं पाठवून लाहोरचा शासक म्हणून घोषित केलं. ते साल होतं १२०६. कुतुबुद्दीन स्वत:ला सुलतान म्हणवून घेत नसे. स्वत:ला त्याने मलिक एवं सिपहसालार हा किताब स्वीकारला. त्याने आपल्या नावाने नाणीसुद्धा पाडली नाहीत. महंमद घोरीने जरी दिल्लीवर कब्जा करून मुसलमानी सत्तेचा पाया घातला असला तरी दिल्लीवर खरी सत्ता सुरु झाली ती कुतुबुद्दीन ऐबकपासून.

४ वर्षाचा कारभार करून कुतुबुद्दीन ऐबक १ डिसेंबर १२१० या दिवशी लाहोर,मध्ये मरण पावला. लाहोरमध्ये मैदानी खेळ चौगुणा खेळताना (पोलो) त्याला मृत्यू आला. लाहोरच्या अनारकली बाजारातील दफनभूमीत त्याचा दफनविधी पार पडला.


तुर्की इतिहासात तो लाखबक्ष म्हणजे लाखो रुपयांचा दानशूर या नावाने स्मरणात राहिला. कुतुबुद्दीन ऐबकाच्या कारकीर्दीचे ३ भाग पडतात.

1. महंमद घोरीच्या हाताखाली ११९२ ते १२०६ पर्यंत महंमद घोरीच्या राज्य विस्ताराच्यावेळी सेनाधिकारी. त्यामुळे घोरीच्या सर्व मोहिमांमध्ये, अजमेर. हंसी, बनारस, अशा स्वाऱ्यांमध्ये त्याचा सहभाग होता.

२. इ. स. १२०६ ते १२०८ पर्यंत घोरीचा प्रतिनिधी,

३. १२०८ ते १० लाहोरचा स्वतंत्र सुलतान.

महंमद घोरीचा एक सर्वोत्कृष्ट सेनानी हीच त्याची खरी प्रतिमा होती. हिंदुस्थानातील आपली सत्ता मजबूत करण्याच्या त्याच्या प्रयत्नांना त्याच्या अचानक जाण्याने पूर्ण विराम मिळाला. लाहोर ही त्याची राजधानी अचानक पोरकी झाली.




पण एक गुलाम राजकीय क्षितिजावर चमकायला लागला होता, तो होता अल्तमश. कुतुबुद्दीन ऐबकचा उजवा हात. त्याचा जावईसुद्धा. ऐबकला ३ मुली होत्या. पहिल्या मुलीच्या मृत्युनंतर दुसरी मुलगीसुद्धा कबाचा सरदारालाच दिली होती. आणि तिसरी मुलगी अल्तमशला दिली होती.

तख्त रिकामं ठेवायचं नाही म्हणून दरबारातील अमिरांनी कुतुबुद्दीन ऐबकनंतर आरामशहाला तख्तावर बसवलं. हा आराम शहा त्याचा मुलगा होता की नाही याची इतिहासकारांनाही खात्री नाही. पण तख्त रिकामं ठेवायचं नाही म्हणून

आराम शहाला सुलतान बनवलं गेलं. त्याची कारभार करण्याची कुवतही नव्हती. त्यामुळे दरबारातील उमरावानी निर्णय घेतला आणि कुतुबुद्दीन ऐबकचा जावई अल्तमश याला आमंत्रण दिलं. आरामशहा केवळ ८ महिने सुलतान म्हणून राहिला. नंतर दिल्ली तख्त गेलं ते अल्तमशच्या हाती. परत एक गुलामच सत्तेत आला. गुलाम वंशच दिल्लीत कारभार लागला. कुतुबुद्दीन ऐबक मनाने घोरीचा दास म्हणूनच कारभार करत राहिला. पण त्याच्यामुळे गझनीशी दिल्लीचा संबंध संपला आणि दिल्लीच्या स्वतंत्र सल्तनतीला प्रारंभ झाला. सल्तनतीचा पाया रचणारा कुतुबुद्दीन ऐबक हा पहिला शासक, हे श्रेय त्याच्याकडे जातं.

# सुलतान शमसुद्दीन अल्तमश.

# मृत्यू- २८ एप्रिल १२३६

इ. स. १२१० मध्ये लाहोरमध्ये दिल्ली सांभाळणाऱ्या कुतुबुद्दीन ऐबकचा चौगुणा खेळ खेळताना मैदानावर अचानक मृत्यू झाल्यावर गोंधळ माजला. सर्वच सरदारांनी स्वत:ला स्वतंत्र घोषित करायला सुरुवात केली तेव्हा सेनापती अमीरअली इस्माईल याने परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी बदायुचा कारभार सांभाळणाऱ्या अल्तमश याला दिल्लीला येऊन तख्त काबीज करायला सांगितलं. अल्तमश हा कुतुबुद्दीनचा मानसपुत्र होताच. त्याने आव्हान स्वीकारलं आणि लगेच फौज घेऊन आला. आरामशहा त्याला विरोध करायला अमरोह मधून निघाला. दिल्लीमध्ये दोघांची गाठ पडली आणि आरामशहाचा पराभव झाला. त्याला ठार करण्यात आलं.

कोण होता हा अल्तमश?

अल्तमश याच पूर्ण नाव शमसुद्दीन दाउद्दिन अबुल मुझफ्फर इल्तुन्मिष. खरं तर त्याचं नाव म्हणजे वंशाचा गौरव असं होतं, पण अपभ्रंश होऊन अल्तमश झालं. याच्या वंशाला इल्वरी घराणं अशी संज्ञा होती. अल्तमशचे वडील ऐलामखान हे मोठे तुर्की सरदार होते.. घराणं  मोठं, घरात नातेवाईकांचा गोतावळा मोठा. आपल्या देखण्या, हुशार मुलाला ऐलम खानने कधीही आपल्या नजरेआड होऊ दिलं नव्हतं. पण त्याच्याच घराण्यातील काही मुलांनी अल्तमशचा अडथळा दूर करायला लहानग्या अल्तमशला घोड्यांचा बाजार दाखवायला दूर नेलं, आणि एका गुलामांच्या व्यापाऱ्याला विकून टाकलं. त्या व्यापाऱ्याने बुखारा इथे अल्तमशला गुलाम म्हणून विकून टाकलं. पण ज्या सद्र-इ-जान घरात तो गुलाम म्हणून गेला, ते लोक फार चांगले होते. त्यांनी अल्तमशला चांगलं वागवलं. एकदा लहान

अल्तमशला घरातील लोकांनी द्राक्षं आणायला बाजारात पाठवलं. अल्तमशने द्राक्षं घेतली, आणि पैसे द्यायला गेला तर खिसा फाटलेला आणि पैसे हरवल्याचं पाहून तो घाबरून रडायला लागला. तेव्हा एक फकीर त्याच्या जवळ आला आणि म्हणाला, " रडू नकोस, अल्ला तुला खूप दौलत देईल, पण गरिबांना कधी विसरू नकोस.



अल्तमश परत एकदा बुखारा हाजी नावाच्या माणसाला विकला गेला. तिथून परत जमालुद्दीन महंमद चिश्ती काबा नावाच्या माणसाकडे गेला. त्याने अल्तमशला गझनीला आणलं. तोपर्यंत अल्तमश तरुण व्हायला लागला होता. या गुलामांच्या बाजारात अल्तमश उभा राहिला तेव्हा त्याच्या मर्दानी देखण्या रूपाने सारा बाजार त्याच्याकडेच बघत राहिला. ही बातमी महंमद घोरीच्या कानावर गेली. त्याने अल्तमशला आपल्या दरबारी आणायला पाठवलं. घोरीने १००० सुवर्ण मुद्रा जमालुद्दीन चिश्तीला देऊ केल्या, पण एवढं स्वस्त सौदा चिश्तीने नाकारला आणि तो अल्तमशला घेऊन बाहेर पडला. त्याबरोबर घोरीने कुणीही अल्तमशला विकत घ्यायचं नाही असा फतवा गझनीमध्ये काढला. त्यामुळे जमालुद्दीन चिश्ती ३ वर्षे अल्तमशला घेऊन गावोगाव फिरत राहिला. कुतुबुद्दीन ऐबकने गझनीच्या भेटीत त्याला पाहिल्यावर त्यालाही तो खूप आवडला. पण गझनीमध्ये स्वतःच त्याच्या विक्रीवर बंदी आणलेली असल्यामुळे महंमद घोरीने त्याला दिल्लीत जाऊन विकत

घ्यायला सांगितलं. शेवटी कुतुबुद्दीन ऐबकाने जमालुद्दीन चिश्तीकडून दिल्लीत कुतुबुद्दीन ऐबकाने त्याला एक लाख जीतल ( नाण्यांना ) देऊन विकत घेतलं. कुतुबुद्दीन ऐबकने त्याला लगेच अंगरक्षकांच्या खात्याचा मुख्य बनवून टाकलं. नवीन आलेल्या गुलामावर आजवर कधीही कुणी अशी जबाबदारी टाकली नव्हती. अल्तमशने आपली हुशारी दाखवली. ऐबकाने त्याचं पाणी जोखलं आणि ग्वाल्हेर जिंकल्यावर तिथला सुभेदार बनवून टाकलं. प्रत्येक स्वारीत ऐबक सतत त्याला आपल्याबरोबर ठेवायला लागला.

अल्तमशचं शौर्यसुद्धा अवर्णनीय होतं. इ. स. १२०६ मध्ये जेव्हा कुतुबुद्दीन ऐबक महंमद घोरीच्या मदतीला लाहोरला गेला, तेव्हा खोक्कारांच्या विरुद्धच्या लढाईत, अल्तमशने शत्रूला झेलम नदीच्या पाण्यापर्यंत खेचत नेलं आणि तिथे त्यांना जलसमाधी दिली. महंमद घोरी हे सारं पाहत होता. त्याने हा कोण तरुण सुंदर युवक असं ऐबकला विचारलं. कुतुबुद्दीन ऐबकने त्याची गुलामीची कथा त्याला सांगितली. त्याच्या या बहादुरीवर घोरी इतका खूष झाला की त्याने आजवर कोणत्याही सरदाराला दिली नव्हती अशी मानाची वस्त्रे देऊन त्याचा सन्मान केला. हे पहिल्यांदाच घडलं होतं. त्याने ऐबकला बजावलं की याला कधीही सोडू नकोस. कुतुबुद्दीन ऐबकानेही त्याच्यावर पुत्रवत प्रेम केलं. त्याला बदायुचा अमीर केलं.

कुतुबुद्दीन ऐबकचा मृत्यू झाल्यावर एल्दौजने अल्तमशला निरोप पाठवला की आता घोरीच्या सर्व सल्तनतीचा मीच वारस आहे.. म्हणजे अल्तमश त्याचा सरदार होणार होता. पण अल्तमशने उलटा जबाब पाठवला, की आता काळ बदलला. नवीन कायद्याप्रमाणे वारसांचा हक्क उरला नाही. मग आपलं वर्चस्व सिध्द करण्यासाठी दोघांच्यात लढाई झाली. अल्तमश जिंकला. एल्दौज ठार झाला.

गझनीच्या जोखडातून दिल्ली मुक्त झाली. आता हिंदुस्थान आणि गझनीचा संबंध उरला नाही, पण दिल्लीत मात्र गुलाम वंशाची राजवट चालूच राहिली. अल्तमशचा कारभार सुरु झाला.

सुरुवातीचा त्याचा काळ संकटाचा होता कारण घोरीच्या मृत्युनंतर ज्या सरदारांनी बंडाळी केली होती, त्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणण्यासाठी लढाई करणं जरूर होतं. काबाचाबरोबर मात्र त्याला दोन हात करावे लागले, कारण कबाचाने चंगीझखान या तार्तार सरदाराची मदत घेऊन आपल्या फौजेत त्यांची भरती केली. अल्तमशची पहिली १० वर्षे, इ. स. १२१० पासून २० पर्यंत त्याच्या प्रतिस्पर्ध्यांशी लढून त्यांच्यावर विजय मिळवण्यात गेली. १२२१ मध्ये सिंधपर्यंत येऊन धडकलेल्या चंगीजखान नावाच्या क्रूर भयंकर तार्तार सेनापतीच्या आक्रमणाचं संकट निवारण्यात त्याची शक्ती खर्च झाली. चंगीजखानाच्या वादळात कबाचा अडकला. अल्तमश चंगीजखानाशी लढायला न जाता योग्य वेळेची वाट पाहत थांबला. पण तेवढ्यात चंगीजखानालाच त्याच्या राज्यात संकट आल्यामुळे परत जावं लागल्यामुळे अल्तमशला त्याच्याशी लढण्याची वेळ आली नाही.

अल्तमशला आता बंगालकडून आव्हान मिळालं. लखनौतीवर विजय मिळवून अल्तमशने आपला मुलगा नसरुद्दीन महंमद याला तिथे नेमलं. त्यानंतर त्याने आपलं लक्ष रणथंबोरकडे वळवलं. अल्तमशने तेथे यश मिळवून दाखवलं. रणथंबोर जिंकल्यावर राजपुताना अल्तमशच्या कब्जात आला. पाठोपाठ मंद्सोर आणि शिवालिक किल्लेही हातात आले.

मग अल्तमश परत लाहोर—उछ-भटिंडा भागाकडे वळला. कबाचा हा त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी लढाई हरला. अल्तमशने त्याच्याकडे जबरदस्त मागण्या केल्या, आणि शरण यायला सांगितलं. पण कबाचाने सिंधू नदीत आत्मसमर्पण करून आपलं आयुष्य संपवलं. आता अल्तमश निर्विवादपणे हिंदुस्थानचा सुलतान झाला. त्याच्या आनंदात भर टाकणारी आणखी एक घटना इ. स. १२२९ साली घडली. ती म्हणजे बगदादच्या खलीफाने त्याच्या सुलतानपदाला मान्यता दिली. या मान्यतेमुळे एक गुलाम राज्य करू शकत नाही, हा विरोधकांचा आवाज त्याने बंद करून टाकला.

उत्कर्षाच्या परमोच्च बिंदूवर असतांनाच अल्तमशला दुर्दैवाचा एक मोठा फटकार बसला, ज्याने त्याची पायाखालची जमीनच खिसकली. त्याचा आवडता, कर्तृत्ववान मुलगा नसरुद्दीन अचानक आयुष्य संपवून अल्लाला प्यारा झाला. सुलतानाला हा फार मोठा धक्का होता.




या दुःखातून बाहेर पडायला अल्तमशाला फार प्रयत्न करावे लागले. इ. स. १२२९ पासून १२३६ सालापर्यंत अल्तमशच्या ग्वाल्हेर, माळवा मोहिमा चालूच राहिल्या. माळवा मोहीम करून आल्यावर मात्र सुलतान अल्तमश आजारी पडला आणि २८ एप्रिल १२३६ या दिवशी त्याने आपली इहलोकीची यात्रा संपवली.

एक दूरदृष्टीचा, पराक्रमी, दयाळू, दानशूर, मुत्सद्दी, आणि आस्तिक सुलतान म्हणून अल्तमशने भारतीय इतिहासात आपली प्रतिमा तयार केली. तो इतका न्यायी होता आणि प्रजादक्ष होता की कुणावरही अन्याय झाला असेल तर राजाकडे तक्रार करता यावी म्हणून त्याने एक विलक्षण योजना केली. त्या काळात दिल्लीत सर्व लोक पांढरे कपडे घालत. त्याने फर्मान काढलं ज्यांच्यावर अन्याय झाला असेल आणि दाद मागायची असेल, त्याने रंगीत कपडे घालावेत. त्यामुळे सुलतानाची स्वारी जात असेल तर त्याला, किंवा कोतवालाला ते लोक चटकन ओळखता येतील.

विस्कळीत असलेली सर्व राज्यं जिंकून एकसंध रियासत सुरु करण्याचं श्रेय त्यालाच द्यावं लागतं. महंमद घोरीने हिंदुस्थानात मुसलमानी सत्तेचा पाया खणला, कुतुबुद्दीन ऐबकने लाहोरला आपली राजधानी करून दिल्लीला इस्लामिक इमारतीचं जोतं बांधलं आणि अल्तमशने दिल्लीला सुंदर इमारतीचं पूर्ण रूप दिलं. त्याने दिल्लीला स्वतंत्र राज्य बनवलं. राज्यात अनेक मशिदी, मदरसे, सुंदर इमारती बांधल्या. दिल्लीला साहित्य आणि संस्कृतीचं केंद्र बनवलं. गंगा-यमुनेच्या

दुआबातील प्रदेशाचं राजकीय आणि लष्करी महत्व ओळखून तिथे आपली हुकुमत वाढवली. सत्ता गाजवतांना त्याच्या धोरणांमध्ये खंबीरता होती, पण क्रौर्य नव्हतं. अनेक कुटील प्रश्नांवर त्याने अत्यंत चलाखीने, नुकसान होऊ देणारे उपाय शोधले आणि प्रश्न मिटवले. आपल्यानंतर आपली शहजादी रझियाने तख्तावर बसावं अशी त्याची इच्छा होती. पण त्याचा हा निर्णय दरबारी मंडळींना अजिबात आवडला नाही. एका स्त्रीच्या हाताखाली दरबारात उभं राहणं त्यांना खपलं नाही. म्हणून अल्तमशच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा रुक्नुद्दिन फिरोजशहा सुलतान बनला. पण तो सर्वथा नालायक होता. तो लगेच विलासात रमला. दरबारातील लोकांना आता अल्तमशच्या निर्णयाची किंमत कळली. त्यांनी रझियाला सुलतानपदी नियुक्त करण्याचं ठरवलं आणि रझिया दिल्ली तख्ताची पुढची वारस ठरली.




अल्तमशचा दफनविधी दिल्लीत कुतुब-उल मशिदीतच झाला.

अल्तमशने भारतीय इतिहासात आपलं स्वतंत्र महत्वाचं स्थान निर्माण केलं.

# रझिया सुलतान.

## जन्म-१२०५- मृत्यू १४ ऑक्टोबर १२४०.

महाराष्ट्राला जशी झांसीची राणी, अहमदनगराची जशी चांदबीबी, कर्नाटकाची जशी कित्तूरची चिन्नामा तशी दिल्लीच्या सल्तनतीची पराक्रमी, लढाऊ आणि शूर रझिया सुलतान. दिल्लीची सल्तनत चालवणारी हुशार सुंदर, पाणीदार शहजादी. सुलतान अल्तमशची लाडकी कन्या. मुलगे असूनही राज्य चालवण्यासाठी राज्य टिकावं म्हणून रझियाच्या हाती राज्य सोपवणारा शहाणा दूरदर्शी सुलतान.

अल्तमश म्हातारा व्हायला लागला तेव्हा आपल्यामागे कोण राज्याची धुरा समर्थपणे सांभाळेल या चिंतेने काळजीत पडला. त्याचा नसरुद्दीन महंमद हा कर्तबगार, हुशार, मुलगा मरण पावला होता. ग्वाल्हेरच्या मोहिमेसाठी जाताना त्याने रझियाच्या हाती कारभार सोपवला होता. रझियाने तेव्हा उत्तम प्रकारे काम पाहिलं होतं. आपले मुलगे नालायक आहेत आणि रझियाच्या हातीच कारभार सोपवायचं त्याने निश्चित केलं. आपला वारस म्हणून तिचं नाव घालण्यासाठी फर्मान तयार करायला लागला, तेव्हा दरबारातील अमीर आणि अनेक बेगम पैकी शाह्तुर्कान, संतापली. शाहतुरकान आधी एक जनानखान्यातील दासी होती, ती नंतर अल्तमशची बेगम झाली होती. तिचे दोन मुलगे रुकनूद्दिन आणि मौजुद्दिन, कधीपासून बादशहा होण्याची वाट पाहात होते. सुलतान अल्तमशचा हा निर्णय ऐकून चकित झालेले त्याचे दरबारातले अमीर, सुलतानाकडे गेले आणि त्यांनी रझियाला गादीवर बसवण्याच्या निर्णयावर परत विचार करायची अर्जी केली.

सुलतानाने त्यांना विचारलं,

“ तुम्हाला का नको आहे ती? ”

“ हुजूर, रझिया हुशार आहे. धाडसी आहे, चतुर आहे पण स्त्रीची जागा दरबारात नाही. ती शहजादी नसून शहजादा असती तर काहीच हरकत नव्हती. ”

दरबारी आपल्या या कर्तबगार मुलीला गादीवर बसवणार नाहीत हे अल्तमशला  कळून चुकलं. दरबारातील अमीर लोकांनीही ठरवलं की बाईच्या हाताखाली राहण्यापेक्षा कमकुवत युवराज बरे. त्यांनाच गादीवर बसवायचं. हे ऐकल्यावर शाहतुर्कानच्या आशा वाढल्या. लवकरच सुलतान अल्तमश अल्लाला प्यारा झाला. त्याबरोबर दरबारात फूट पडली. तख्तावर कुणाला बसवायचं यावर वाद झाले.

पण अल्तमशची इच्छा मात्र कुणालाच नको होती.

तेव्हा रझियाच पुढे झाली. सर्व दरबारी उमरावांना एकत्र बोलावून म्हणाली,

“ ही वेळ भांडणाची नाही. एक मताने चालायची आहे. तुमच्या इच्छेप्रमाणेच होईल. माझा भाऊच गादीवर बसेल. एवढ्याश्या कारणासाठी वातावरण बिघडणं ठीक नाही. तुम्ही काळजी करू नका. ''

रझियाचं भाषण ऐकून दरबारी गप्प झाले. मग अल्तमशचा मुलगा रुकनूद्दिन सुलतान बनला. काही काळातच आपला निर्णय कसा चुकीचा आहे हे दरबारला लगेच कळलंच. तो अय्याशी शहजादा गादीवर आला तरी सतत नाच-गाण्यात दंग असे. त्याची उधळमाधळही बेसुमार चालू झाली. कारभार तर करतच नव्हता. बेगम शाहतुर्कानसुद्धा कपट कारस्थानात कमी नव्हती. रझियाच्या आईला तिने आपल्याला मारण्याचा कट केल्याच्या आरोपावरून फाशी देऊन ठार मारलं. आपल्या सर्व सावत्र मुलांना ठार केलं किंवा देशोधडीला लावलं. एक रझिया शिल्लक राहिली. तीही या बेगमला सलतच होती. तिचा काटा काढला की शाहतुर्कानच्या मुलाचा, रुकनूद्दीनचा मार्ग निर्वेध होणार होता. मग बेगमने एका गुंडाला बोलावून रझियाला मारण्याचा कट केला. गुंडाने रझियाच्या महालात जाऊन गादीवर झोपलेल्या मुलीचा खून केला. आणि यमुनेच्या पाण्यात फेकून

दिलं. दुसरे दिवशी बातमी शहरात पसरली. लोक दु:खी झाले. रझियाला कुणी मारलं हे कळावं म्हणून राजवाड्यासमोर गलका करायला लागले. तेव्हा रझिया त्यांच्यासमोर प्रकट झाली,



" मी मेले नाही. अजून जिवंत आहे, मला हा कट कळला होता म्हणून मी स्वत:ला वाचवलं आहे " असं जमलेल्या समुदायाला सांगितलं. तिला पाहून जनतेच्या आनंदाला पारावर राहिला नाही. तिच्या नावाने त्यांनी घोषणा द्यायला आणि तिचा जयजयकार करायला सुरुवात केली. बेगम शाहतुर्कानचा धि:कार करायला सुरुवात केली. सर्व लोकांची झुंड मग राजवाड्यावर गेली. शाहतुर्कान पकडली गेली. जमावाला तिला मारून टाकायचं होतं, पण रझियाने लोकांना आवरलं आणि अदालतमध्ये काजी याचा निकाल लावेल असं घोषित केलं. पण ६ महिन्यात शाहतुर्कान मारली गेली.

इ. स. १२३६ मध्ये १० ऑक्टोबरला रझियाच्या मस्तकावर ताज ठेवला गेला. गुलाम वंशातील ती पहिली मलिका बनली. अल्तमशचं म्हणणं नागरिकांना आता पटलं. तिला पहिला विरोध झाला तो अल्तमशचा वझीर निजाम-उल-मुल्ककडून.

ती स्त्री असणं हाच तिच्या अधिकारातील मोठा अडथळा होता. आपल्या नाखूष विरोधकांचा आपल्याला तख्तावरून खाली ओढण्याचा डाव आहे हे सदासावधान रझियाला कळायला वेळ लागला नाही. दरबारातील वयोवृध्द निजाम उल्मुल्क तिच्याविरुध्द होता हेही तिला माहीत होतं. पण तिला साथ देणाऱ्यांची फौजही तयार होतीच. तिला पाठिंबा देणाऱ्यांमध्ये अनेक तरुण अमीर उमराव होते जे तिला बारीकसारिक बातम्या पोचवत होते. त्यांच्यामध्ये तिचे जास्त विश्वासार्ह साथीदार म्हणजे ताजूक-मुल्क, अली इस्माईल, मलिक अल्तुनिया, जमालुद्दीन याकूत हे खास होते.


Razia Sultana

यातील मलिक अल्तोनिया हा लहानपणापासून सुलतानाबरोबर राजवाड्यात वाढला होता, आणि जन्माने तुर्की होता. आपल्या हुशारीवर दरबारातील हुजुरातीच्या पागेचा मुख्य बनला. मग अमीर बनला. त्याची नेमणूक प्रशासक म्हणून भटिंडाला झाल्यावर तो तिथे निघून गेला. दुसरा याकूत हा हबशी गुलाम होता. सदा सर्वदा रझियाच्या सेवेत इमानदारीने हजर असायचा. रझिया घोडेस्वारीत अत्यंत हुशार होती. तिरंदाजीत तरबेज होती. तिच्या मनात आलं की ती लांब लांब रपेटीला जायची तेव्हा अंगरक्षक म्हणून याकूत तिच्याबरोबर असायचा.

रझियाने बंडाळी करणाऱ्यांच्या विरुध्द शस्त्र धरलं आणि लढाईत विजय मिळवला. निजाम-उल-मुल्क जुनैदी पळून गेला. त्याच्याकडचे ऐजुद्दिन कबीरखान ऐयाज आणि इतर काही सरदार रझियाला मिळाले. त्यांनी या सरदारांना ठार करण्याचं ठरवलंय हे कळल्याबरोबर सगळे पळून गेले. या विजयानंतर रझियाने मलिक ऐजुद्दिन कबीरखान ऐयाझला वझीर म्हणून नेमलं आणि निजाम-उल-मुल्क हा किताबही त्याला दिला.

रझिया आता स्वत:ला सुलताना म्हणवून न घेता सुलतान म्हणवून घ्यायला लागली. पुरुषी कपडे परिधान करून चेहऱ्यावर नकाब न घेता दरबारात यायला लागली. हत्तीवरून जाताना पुरुषांच्या नजरेला पडू लागली हे सर्व तुर्कांना सहन न होण्यासारखं होतं. आपल्या विश्वासू साथीदारांसह तिने कारभारावर नियंत्रण ठेवलं. अमिरांना सलणारी आणखी एक गोष्ट म्हणजे महत्वाच्या पदांवर तिने तुर्क लोकांची नेमणूक केली. हे तर दरबारी अमिरांच्या सहनशक्तीच्या पलीकडचं होतं. पण जनता खूष झाली. न्यायनिवाडा चोखपणे होऊ लागला . अल्तमश जसा प्रजेच्या कल्याणाचा कारभार करत होता, तसाच कारभार तीही करायला लागली. दरबारातील अमीर-उमरावांचा सल्ला घ्यायचा पण स्वत:चा निर्णय अंतिम करायचा, अशा रीतीने तिच्या कर्तबगारीची ४ वर्षं संपली. भारतभर तिच्या नावाचा गवगवा व्हायला लागला.

तिच्या या यशाने ज्यांना रझिया नको होती, तो गट दिवसेंदिवस अस्वस्थ व्हायला लागला. तिचा कारभार, तिचं चेहऱ्यावर नकाब न घेता मर्दानी पोशाखात दरबारात बसणं, यावर नाखूष दरबारी गट तिला पदच्युत करण्याचं निमित्त शोधायला लागला. त्यातच तिने हिंदू प्रजेवर लावलेला जिझिया कर काढून टाकण्याची घोषणा केली. असंतुष्टांनी त्यावर नाराजी दर्शवली, तेव्हा तीही माझी प्रजाच आहे, आपणच इथे परकीय आहोत आणि त्यांना जिंकायचा तोच मार्ग आहे, असं म्हणून प्रश्न निकालात काढला. त्यामुळे तर ते आणखीनच बिथरले. त्यातून रस्ते-पाणी अशी लोकोपयोगी काम करतांना त्यांना मिळणारा मलिदा तिच्या चोख

कारभारामुळे बंद झाला होता. शिवाय विरोधकांची शक्ती कमी करण्यासाठी तिने अनेकांना दूरदूरच्या मुलूखात कामासाठी पाठवून दिलं होतं.


तेवढ्यात चौहान राजपुतांनी रणथंबोर किल्ल्यावर हल्ला केला. त्यांना टक्कर देण्यास शाही फौज कमी पडली. आपली फौज नाहक मरू नये म्हणून रझिया सुलतानने आपली फौज माघारी बोलावली. त्यामुळे नाखूष दरबारी लोकांना एक निमित्त मिळालं. सुलताना मुद्दाम हिंदूंना जिंकू देते आहे, असं त्यांनी प्रचार सुरु केला. रझियाने त्यांची समजूत काढत त्यांना सांगितलं की लाखो हिंदूच्यापुढे मूठभर मुसलमानांचा टिकाव लागणार नाही. त्यांना प्रेमाने जिंकणं हाच मार्ग योग्य आहे.

विरोधकांनी याचाच फायदा घेऊन रझियाचे याकुतशी खास संबंध असल्याच्या अफवा पसरवायला सुरुवात केली. अल्तुनिया देखणा तरणाबांड बहादूर जवान होता. रझियाच्या रंगेलपणाच्या बातम्या निजाम उल्मुल्कने पसरवायला सुरुवात केली. दरबारी लोकांचे कान भरणं सुरु झालं. अल्तुनियाच्या कानावर जेव्हा हे आलं तेव्हा त्याचा त्यावर विश्वास बसला नाही. त्याने सरळ रझियाच्या कानावर ही बातमी घातली, त्याबरोबर निजाम उल्मुल्क पळून गेला. दुसरीकडे बलबन नावाच्या आमिरने अल्तुनियाच्या मनात तोच खरं सुलतान व्हायला लायक आहे हे भरवायला सुरुवात केली. मलिक अल्तोनिया त्याच्या बोलण्याला भुलला आणि सुलतान बनण्याचं स्वप्न पाहायला लागला. विरोधकांचा हा निशाणा यश देणारा ठरला.

मलिक अल्तोनियाने रझियाविरुध्द बंडाचं निशाण उभारलं. रझिया हादरली. एवढा विश्वासू मानला गेलेला तिचा साथीदार तिच्याविरुध्द उभा राहिला होता. आपली फौज घेऊन रझिया भटिंडावर चालून गेली. दिल्लीहून भटिंडाला पोचलेल्या फौजेवर मलिक अल्तोनियाची ताज्या दमाची फौज कोसळली. रझिया पकडली गेली. याकुतला ठार केलं गेलं.

इकडे रझियाचे विरोधक खूष झाले. त्यांनी लगेच रझियाच्या सावत्र भावाला- बहरामखानला म्हणजे शाहतुर्कानच्या दुसऱ्या मुलाला सुलतान बनवलं. आता मलिक अल्तोनियाचे डोळे उघडले. आपल्याला या लोकांनी फसवलं आणि रझियाच्या हालाला आपण कारण ठरलो हे लक्षात आल्यावर मलिकने रझियाची मनधरणी केली. तिनेही त्याला क्षमा केली आणि दोघांनी मिळून दिल्लीवर स्वारी केली. त्या आधी या दोघांनी लग्न केलं, त्यामुळे विरोधकांची बाजू लंगडी पडली. दिल्लीजवळ कथियालमध्ये बादशहाच्या मोठ्या फौजेसमोर या लढाईत रझियाची मोठी हार झाली. अल्तोनिया मारला गेला. तीही मारली गेली

पण एक आख्यायिका असंही सांगते की रझिया सुलतान लढता लढता सैन्यापासून दूर गेली. तिला भूक लागली. ती अन्न शोधायला लागली, तेव्हा तिला एक फकीर दिसला. म्हणून तिने त्याच्याकडे रोटी मागितली. फकिराला तिच्या बोटातील हिऱ्याची अंगठी दिसली आणि ती कुणीतरी मोठी आहे हे लक्षात आल्यावर त्याने जवळच्या गावातील दरोग्याला बातमी दिली. दरोग्याने रझियाला बादशाहाकडे सोपवलं. नवीन बादशाहने, बहरामखानाने तिचा कत्ल करून संपवलं.




इ. स. १२०५ मध्ये उत्तर प्रदेशातील बदायुनला जन्मलेली रझिया १२४० च्या १४ ऑक्टोबरला काथियालच्या रणांगणावर हे जग सोडून गेली. तिची ४ वर्षांची सत्ता संपुष्टात आली. तिची कबर तुर्कमान गेटजवळ बांधली गेली. तिच्या कबरीशेजारी तिच्या बहिणीचीही कबर आहे.

# गियासुद्दीन बलबन

# जन्म-१२०० मृत्यू-१२८७.

रझियाच्या मृत्युनंतर मुइजुद्दिन बहरामशहाला अमिरांनी सुलतान बनवलं. रझियाविरुध्द कट करणारा नेता एतगीन याने, आपल्या हाती सत्ता येण्यासाठी आता नवीन मार्ग शोधला. त्याने सुलतानाला सांगितलं की नायब नावाचं नवीन पद निर्माण करण्याची मान्यता देशील तर तुला सुलतान बनवू. त्याप्रमाणे नायब नावाचं नवीन पद तयार झालं. आणि ते पद मिळालं एतगीनला. त्याला कारभाराचे पूर्ण अधिकार मिळाले. सुलतानाला नाममात्र अधिकार राहिले. कमकुवत सुलतानामुळे दरबारी अमीर-उमरावांची ताकद प्रचंड वाढली होती. रझियाने हेच ओळखलं होतं, म्हणूनच त्यांना रझिया नको होती. एतगीनचाही थोड्याच अवधीत खून झाला. हा सुलतान बहरामशाह केवळ दोन वर्षे सत्तेत राहिला आणि त्याच्यानंतर आला तो अल्लाउद्दिन मासूदशहा. तो चार वर्षे गादीवर टिकला. केवळ अल्तमशच्या घराण्यातील एक पुरुष एवढंच त्याला महत्व होतं. तो अल्तमशचा नातू होता. तोही ४ वर्षेच गादीवर राहिला. राजकारण करण्याचे त्याला कोणतेही हक्क नव्हते.

आता वजीर मुहाज्जुबुद्दिन सामर्थ्यवान झाला. तेही तुर्की सरदारांना सहन होईना. शेवटी त्या वजीराचाही वध करण्यात आला. थोडक्यात म्हणजे निर्नायकी राज्य, कमकुवत सुलतान, तुर्की सरदारांची आणि दरबारी प्रतिष्ठितांची एकमेकांच्यामध्ये द्वेष, मत्सर, कटकारस्थान करण्याची वृत्ती यांना ऊत आला. या नवीन सुलतानाने अमिरांच्या सहमतीने आपल्या काका, चुलत भावांना बंदिवासातून मुक्त केलं. आणि गियासुद्दीन बलबन या कर्तबगार सरदाराला कारभार करायला सांगितलं.

बलबन  मोठ्या महत्वाकांक्षेचा, सामर्थ्यवान सरदार होता. लगेच त्याने कारभार सांभाळायला सुरुवात केली आणि त्यात शिस्त आणली. असमर्थ सुलतानाला पदच्युत करण्याचा डावही त्यानेच आखला. आणि एक दिवस सुलतानाचं सारं कुटुंब बंदिवासात पडलं. त्याने अल्तमशचा दुसरा नातू नसरुद्दिन शाह याला गादीवर बसवलं. याचा बापही नसरुद्दिन याच नावाचा होता. पण त्याचा अकाली मृत्यू झाला त्यानंतर हा मुलगा जन्मला होता. अल्तमशने या बाळाचं नाव नसरुद्दीनच ठेवलं. बलबनने त्याला शोधून आणलं आणि सुलतान बनवलं.



१० जून १२४६ ला नसरुद्दिनचा राज्यारोहण समारंभ झाला. पण मुख्य सूत्र आली ती प्रधान बनलेल्या बलबनच्या हाती. बलबनने आपली मुलगी सुलतानाला दिली आणि आपल्या पदाची आणखीनच मजबुती केली.

इ. स. १२६५ मध्ये सुलतान नसरुद्दिन मरण पावला. बलबनने त्याला विष देऊन ठार केलं असा प्रवाद पसरला. एवढंच नव्हे तर अल्तमशच्या वंशातील साऱ्यांनाच बलबनने संपवलं आणि तो सुलतान बनला.

अल्तमशच्या मृत्युनंतर पुढची २० वर्षे अशी अस्थिर राजकारणाची घडली.

आता नवीन गडी – नवीन राज्य.

इल्वरी तुर्की वंशाचा बहाउद्दीन बलबन दिल्लीचा नवीन मानकरी झाला..

कोण होता हा बलबन? अल्तमशच्या कारकीर्दीत बसऱ्याहून एक सौदागर गुलामांना घेऊन दरबारात आला. बादशाहने ९९ गुलाम निवडले आणि एका कुरूप चेहऱ्याच्या गुलामाला वगळून सारे गुलाम विकत घेतले. तेव्हा तो गुलाम ३२ वर्षांचा होता. आपल्याला वगळलं म्हणून दु:खी झालेल्या त्या गुलामाने बादशहाची इतकी मनधरणी केली की नाईलाजाने शेवटी त्यालाही विकत घेतलं. मुळात हा मुलगा एका सरदार घराण्यात जन्माला होता. त्याचा बाप तुर्कस्थानात १०,००० स्वारांचा सरदार होता. तुर्कस्थानात मंगोल लोकांच्या हल्ल्यात हा पकडला गेला आणि गुलाम म्हणून बसराच्या बाजारात ख्वाजा जमालुद्दीन नावाच्या धर्मगुरूला विकला गेला. त्या माणसाने बाहा-उद्दीन असं त्याचा परत नामकरण केलं. परत गुलाम म्हणून दिल्लीला अल्तमशच्या  दरबारात त्याची विक्री झाली.

या गुलामाला काय काम द्यायचं म्हणून सुलतान अल्तमशने त्याला पाणक्याचं काम दिलं. कुरूप असला तरी बलबन तल्लख बुद्धीचा होता. त्याच्याबद्दल एक आख्यायिका अशी आहे, की एकदा एक ज्योतिषी अल्तमशच्या दरबारात आला. त्याने सुलतान अल्तमशला भविष्य सांगितलं की तुझ्या घरातील एक गुलाम तुझ्या  वारसाचा अंत करून तख्त बळकावणार आहे. झालं.. राजवाड्यात गडबड उडाली. जनानखान्यातील बेगमाही कलकलायला लागल्या. शेवटी त्या गुलामाला ओळखून काढण्यासाठी, ज्योतिषासमोरच सर्व गुलामांची रांग लावण्याचा बादशहाचा फतवा निघाला. जनानखान्यातील, मुदपाकखान्यातील, बगीच्यातील, हुजुरांचे, शहज्यादांचे, शहजादीचे, शेकडो गुलाम रांगेत उभे राहिले. गुलामांना रांग सोडता येईना. ज्योतिषी एकेका गुलामाला निरखायचा, आणि नकारार्थी मान हलवायचा. अशाच अनेकांमध्ये बलबनसुद्धा होता. तो एक कनिष्ठ पाणक्या, तो काय राजा बनणार ! खूप वेळ रांगेत तिष्ठत उभ्या राहिलेल्या सगळ्यांनाच भूका लागल्या होत्या. त्या लांबलचक रांगेतील मग काहींनी बलबनला बाजारात जाऊन काहीतरी खायला आणायला पाठवलं. बलबन गेला, पण लगेच आलाच नाही. ज्योतिषाच्या जवळ जायची वेळ तेव्हा रांगेतील इतर गुलामांचा जीव वरखाली व्हायला लागला. मग काहींनी शक्कल काढली आणि एका माणसाला

पकडून त्याच्या खांद्यावर बलबनची पखाल ठेवली. रांग संपली, ज्योतिषाला राजपुत्रांना मारून तख्त काबीज करणारा गुलामही सापडला नाहीच. आपलं भविष्य कसं काय चुकलं याचा विचार ज्योतिषी करत राहिला.

ज्या दिवशी गयासुद्दिन बलबन सिंहासनावर सुलतान म्हणून बसला, त्यावेळच्या गुलामांना बलबन रांगेत नव्हता हे आठवलं. होणारे न चुके ! की बलबनने हुशारीने स्वत:ला वगळून घेतलं? इतिहासाला माहीत नाही.

मुळात बुद्धिमान असलेल्या बलबनने सुलतान अल्तमश आणि सुलतान रझियाची कारकीर्द फार जवळून अनुभवली. अल्तमशच्याच काळात त्याने भराभर मोठे हुद्दे मिळवले होते आणि शेवटी दरबारातील प्रमुख ४० मधला ( चालीसा ) एक झालेलाच होता. रझियाचा शेवट झाल्यावर त्याने स्वत:चा उत्कर्ष करून घेतला. रझियाने अत्यंत विश्वासाने त्याच्यावर अमीर-ई-शिकार म्हणजे लष्करी ( डिफेन्स ) आणि मुलकी कारभार सोपवला होता. तिच्या अंतानंतर नवीन सुलतान बहरामशाहमुळे तो हंसीचा एक मोठा जागिरदार झाला.

रझियानंतर एकाहून एक कमकुवत राजपुत्र बादशहा बनले. शेवटी तख्तावर बसला तो अल्तमशचा नातू नसरुद्दीन. २७ मे इ. स. १२४६ मध्ये हा वजीर बनला. अल्तमशचा  लाडका मुलगा नसरुद्दिन जेव्हा लखनौतीला वारला, त्यानंतर हा मुलगा जन्मला. अल्तमशने त्याला आपली जवळ आणून त्याच्या शिक्षणाची आणि देखभालीची काळजी घेतली. त्याला आपला मुलगा ही ओळख दिली. हा नसरुद्दिन मुळातच अभ्यासाकडे ओढ असलेला विद्वान, सत्शील, परोपकारी, मनाचा माणूस होता. त्याने आपला सर्व वेळ अभ्यासातच घालवला होतं. त्याच अक्षर सुंदर होतं. त्यामुळे त्याने अनेक उत्तम पुस्तकं नकलून ठेवली होती. लोक ही पुस्तकं विकत घेत. जनतेचा पैसा म्हणून बादशाही खजिन्याला त्याने हात लावला नाही. पुस्तकांची विक्री हीच त्याची कमाई होती. बादशहा हे बिरूद असलं तरी तो आणि त्याची पत्नी सलमा दोघंही मध्यमवर्गाच्या दांपत्यासारखं साधं आयुष्य जगत होते. ती घरकाम करायची. राज्यकारभार वझीर असलेला बलबन सांभाळायचा.

इ. स. १२६५ मध्ये नसरुद्दिन सुलतान मेला. बलबनने त्याला विष घालून ठार केलं होतं. १२४९ साली बलबनच्या मुलीचं सुलतानाशी लग्न लावल्यावर ती मालिका जहान बनली आणि सारी लष्करी सत्ता आणि कारभार बलबनच्या हाती आला. त्याने स्वत:ला उलगखान हा किताब घेतला.

नसरुद्दीनच्या मृत्यूनंतर त्याला पुत्र नसल्यामुळे बलबन सुलतान बनला.

बलबन वजीर बनला ते साल होतं इ. स. १२४६. आणि २० वर्षांच्यानंतर सन १२६६ मध्ये जेव्हा तो सुलतान बनला तेव्हा तो ६० वर्षांचा होता. वजीरीवर असतांना दरबारातील काही लोकांनी त्याला वजीर पदावरून हटवून रियान नावाच्या एका व्यक्तीला वझीर बनवलं. बलबन काही दिवस स्वस्थ राहिला, आणि एक दिवस रियानला ठार करून परत सत्तेत आला.

सुलतान म्हणून कामाला लागल्यावर बलबनने सर्वात आधी आपल्या विरोधकांना कंठस्नान घातलं त्यात मुख्य होते ते अल्तमशचे नातेवाईक आणि अल्तमशचे पक्षपाती आणि बलबनचे विरोधक. त्यांना संपवायला त्याने निर्दयीपणे विषप्रयोग आणि तलवार हे दोन मार्ग निवडले.

मग त्याने दुसरं महत्वाचं काम हातात घेतलं ते राज्यात जी बेबंदशाही माजली होती तिचा नि:पात करण्याचं. त्यासाठी कठोर उपाय योजून कारभाराला शिस्त आणली. राज्यात प्रचंड अनाचार वाढला होता. तो निपटून काढायला कडक कायदे केले. राज्यकारभार हाती घेतल्यावर त्याला पाहिलं आव्हान होतं ते दिल्लीतील वाढलेली लोकवस्ती, उपनगरं, अवध, गंगा-यमुनेच्या, दुआबातील भाग, दळणवळणाच्या मार्गावरील भाग आणि रोहिलाखंडात कडक उपायांनी शांतता राखण्याचं. त्यामुळे त्याचा दरारा इतका की त्याकाळात लोक म्हणत की हत्तीसुद्धा मुंगीवर पाय देताना घाबरतो.

बलबन न्यायनिवडा करण्यात चोख होता. गुंड, दरोडेखोरांना त्याने कठोर शिक्षा देऊन त्यांची हिंमत खच्ची करून टाकली. मेवाती लुटेरे जे दिवसा ढवळ्या

दिल्लीत येऊन दरोडे घालत होते, स्त्रियांची अब्रू घेत, व्यापारी आणि वाटसरूंना लुटत, त्यांचा चांगलाच समाचार घेतला. दिल्लीच्या जवळपासची सगळी जंगलं साफ करून त्याने दरोडेखोरांची लपण्याची ठिकाणं नष्ट केली. त्यांच्या येण्याच्या मार्गावर सैनिक ठेवले. रस्ते चांगले करून वाटसरू, व्यापारी यांना लुटणाऱ्या टोळ्यांना संपवून टाकलं. बंडखोरांना चिरडून टाकलं.

एक वर्षभर त्याने राज्यात शिस्त, कायदा पालन आणि कठोर शिक्षा करून शांतता स्थापन केली. मग त्याने लक्ष वळवलं ते सल्तनत उलथून टाकण्यासाठी धडपडणाऱ्या हिंदू संघटनांच्याकडे, आणि सतत हल्ला करणाऱ्या मंगोल आक्रमणांकडे. बलबनने राज्याविस्तारापेक्षा हे महत्वाचं मानलं.

असं सांगतात की मंगोलचा चंगीजखानचा नातू हलाकुखान याने दिल्लीवर जरब बसवण्यासाठी आपल्या वकिलाला बलबनच्या भेटीला पाठवलं तेव्हा आपली गाठ कोणाशी आहे हे त्याला कळावं म्हणून बलबनने वकिलाला सामोरे जाण्यासाठी ३ लाख घोडदळ, २ हजार हत्ती, आणि मोठी पायदळ फौज त्याच्या स्वागतासाठी पाठवली. शिवाय तो वकील जेव्हा दिल्लीत आला तेव्हा भुसा भरलेली खूप प्रेतं दिल्लीच्या वेशीच्या दरवाज्यावर लटकावली. तुर्की सुलतानाने मोघल राजाला पाठवलेली ती ओळख होती आणि राज्यातल्या मोघल जनतेला दिलेला इशारा होता.

बलबनच्या फौजेत सर्व धर्मांच्या शिपायांना चांगली वागणूक मिळत असे. अशी त्याने २ लाख फौज उभारली होती. त्या बळावर त्याने ग्वाल्हेरचा किल्ला राजपुतांकडून जिंकून घेतला. कलींजरच्या चंडेल राजाला जिंकून घेतलं.

अल्तमशच्या काळात प्रतिष्ठित समजले जाणारे दरबारात चाळीस उमराव होते. अल्तमश आणि रझियाच्या काळात हे उमराव सुलतानाला किती आपल्या बोटावर नाचवतात ते त्याने अनुभवलं होतं. म्हणून सुलतान बनल्यावर त्याने या अमिरांचे हक्क काढून घेतले, त्यांची मिजास उतरवली. ज्या अमिरांनी अपराध केले

होते त्यांना कठोर शिक्षा सुनावल्या. बदायुच्या मलिक बकबक सुभेदाराला, नोकराचा खून केला म्हणून चाबकाच्या फटक्यांची शिक्षा सुनावली, अवधच्या सुभेदारालाही भर चौकात ५०० फटक्यांची शिक्षा दिली, अशा रीतीने या उमरावांवर वचक बसवला. या लोकांपेक्षा एक वेगळाच त्यांच्याहून जास्त अधिकार असलेला सेवक वर्ग तयार केला. त्यामध्ये कौशल्याला जास्त प्राधान्य दिलं. त्यामुळे आपोआप अमीर वर्गाचं महत्व संपलं.

उच्च आणि नीच कुलाच्या भेदावर त्याची फार निष्ठा होती. उच्चवर्णीय मुलांनाच तो दरबार कामासाठी निवडत असे. आपल्यावरच गुलामपणाचा शिक्का पुसून टाकण्यासाठी त्याने आपल्या पूर्वजांचा इतिहास शोधून काढला. अफरासियान ह्या प्रसिध्द तुर्की योद्धयाचे आपण वंशज आहोत असं त्याने जाहीर केलं. पर्शियन राजसत्ता हा त्याचा आदर्श होता. म्हणून राजमुकुट धारण केल्यावर झालेल्या मुलांची नावे त्याने पर्शियन राजांची ठेवली. राज दरबारात सजदा म्हणजे राजासमोर गुडघे टेकून नमस्कार करण्याची पर्शियन पद्धत सुरु केली. राज्यात नवरोज हा पारशी सण सुरु केला.

त्याच्या दरबारचा थाटही शाही होता. दरबारी राजशिष्टाचार इराणी पद्धतीवर आधारित होते. ते तो कटाक्षाने पाळी. त्याचा उंच मुकुट, आणि लांब दाढी त्याच्या लांब चेहऱ्यावर रुबाब वाढवणारी होती. दरबारात गंभीर वातावरण असे. त्याला हसणं आणि जनतेशी प्रेमाने वागणं नामंजूर होतं. तख्ताची शान ठेवण्यासाठी हे जरुरीचं आहे असं त्याच मत होतं. ऐष आराम, नाच-गाणं हे माणसाला कमकुवत बनवतं असं त्याचं मत होतं. दरबारी लोकांनीही गंभीरपणे वागण्याच्या बलबनच्या सक्त सूचना होत्या.

सुलतान बनल्यावर बलबनने लष्करात खूप सुधारणा केल्या. त्याचा अत्यंत विश्वासू इमाद-इ-मुल्क याला युद्धमंत्री केलं. हे संरक्षण खातं आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र केलं. त्या खात्याला राजाच्या संमतीची गरज नव्हती. युद्धात प्राण गमावलेल्या सैनिकाला वंश परंपरेने चालत राहणारं वतन मिळत असे, ती प्रथा बंद करून त्या

कुटुंबाला नगद पैशाची मदत सुरू केली. नवीन तरुणांची भरती करून त्यांचे पगार वाढवून त्यांना संतुष्ट ठेवलं. त्यासाठी खजिना उघडला. जे पिढ्यान पिढ्या लष्करी सेवेत होते, त्याच्याकडून वतन काढून घेतलं नाही, पण सारा वसुलीचा हक्क मात्र त्यांच्याकडून काढून घेतला. राज्यभराच्या बातम्या पोचाव्यात म्हणून त्याने एक खास हेरखातं तयार केलं जे फक्त त्यालाच सर्व बातम्या पुरवत असे. त्यामुळे कुठे जर कट कारस्थान, बंडाळी माजणार असेल तर ती चिरडून टाकण्याची तयारी करता येत असे. पण जर कुणी हेर या कर्तव्यात चुकला तर प्राण गमावणे ही एकमेव शिक्षा त्या हेराच्या वाट्याला येत असे. पण उत्कृष्ट कार्यांचं कौतुकही होत असे.

त्याच्या मोहिमांची अत्यंत गुप्तता राखली जात असे. स्वारीच्या आदल्या रात्री तो सर्व सरदारांना बोलावून दुसरे दिवशी कोणत्या दिशेने जायचं आहे हे जाहीर करत असे. अमीर खुस्रोचा आजा इमाद-उल-मुल्क बलबनच्या फौजेचा सेनापती होता. अल्तमशच्या काळापासून तो युध्दमंत्री म्हणून काम पाहत होता. तोही गुलाम म्हणूनच अल्तमशच्या आमदानीत कामाला लागला आणि आपल्या हुशारीवर हुद्दे चढत गेला होता.

लखनौतीचा ( बंगाल ) सुभेदार तुघरीलबरोबर बलबनला सामना करावा लागला. तुघरील सुद्धा एक गुलाम म्हणूनच सुलतान बलबनकडे आला होता. पण लखनौतीचा सुभेदार बनल्यावर त्याने बंडाचा झेंडा उभारला आणि स्वत:ला स्वतंत्र म्हणून घोषित केलं. एखाद्या गुलामाने आपला हुकूम मानला नाही तर आपली काय किंमत राहिली या विचाराने बलबन बेचैन झाला. बलबनने तुघरीलवर आपली फौज पाठवली, पण घोगरा नदीवर तिचा पूर्ण पराभव झाला. ही बातमी बलबनला कळल्यावर त्याला आणखी राग आला. त्याने दुसरा सेनापती पाठवला पण तोही पराभव घेऊन आला. शेवटी बलबन स्वत:च तुघरीलचा विमोड करायच्या मोहिमेवर निघाला आणि लखनौतीला पोचला. बलबन स्वत:च येतोय कळल्यावर तुघारील पळून गेला.

त्याच्या मागावर बलबनचे अधिकारी पोचले, तेव्हा हाजीनगर इथे तुघरील सापडला. बलबनच्या अधिकाऱ्यांनी त्याचं मुंडकं उडवून त्याला ठार केलं. बलबनने आपला मुलगा बुघराखानवर बंगालचा कारभार सोपावला आणि तो परत आला. दिल्लीला परतल्यावर वयोवृध्द बलबनने आपल्या देखत शहजादा महंमद याला तख्तावर बसवायचा निर्णय घेऊन त्याला मुलतानहून यायला सांगितलं.

बलबनला मंगोल स्वाऱ्यांचा सतत सामना करावा लागला. त्यासाठी त्याने आपल्या पश्चिम सीमेवर अनेक किल्ले बांधून, उत्तम शिबंदी ठेऊन भक्कम केले. आपल्या राज्याचे त्याने दोन भाग केले. लाहोर, सिंध, मुलतान भाग आपल्या आवडत्या महंमद या शहजाद्याकडे सोपवला. पूर्वेकडचा भाग धाकट्या मुलाला, बुघराखानला दिला. शहजादा महंमदला मंगोल आक्रमणाशी सतत सामना करावा लागला. सन १२७९ आणि १२८५ पर्यंत अनेक मोठ्या लढाया मंगोलांबरोबर झाल्या. इ. स. १२८६ च्या लढाईत शहजादा महंमद शहीद झाला.

आपल्या अत्यंत आवडत्या पुत्राच्या शोकाने बलबन पार खचला. अंथरुणाला खिळला. दिवसभर तो कामात व्यस्त असलेलं दाखवायचा पण रात्री आपल्या महालात एकांतात तो ढसाढसा रडायचा. आपल्या वंशाचा अंत त्याला कळून चुकला होतं.. आपल्या धाकट्या मुलाला बुघराखानला त्याने बंगालमधून भेटायला यायचा निरोप पाठवला. पण बुघराखान आला नाही तेव्हा मोठ्या नातवाला, महंमदच्या मुलाला काएकाबादला बलबनने गादीवर बसवलं.

लाडक्या मुलाच्या, महंमदच्या, अकाली मृत्यूच्या आघाताने वयोवृध्द होऊन बलबन ८७ व्या वर्षी वारला. दिल्ली सल्तनतच्या गुलाम वंशातील एक समर्थ सुलतान म्हणून इतिहासाच्या पानावर आपलं नाव कोरून गेला.

# जलालुद्दीन खिलजी.

# जन्म १४ ऑक्टोबर १२२० मृत्यू १२ जुलै १२९६.

सुलतान गियासुद्दीन बलबनच्या मृत्यूनंतर दिल्लीवर चालू असलेली गुलाम राजवट संपत आली. बलबनचा मुलगा बुघराखान बंगालमध्येच रमला. त्याला दिल्लीची गादी नकोच होती. बलबननंतर त्याच्याच इच्छेप्रमाणे त्याचा नातू अल्पकालच सुलतान बनला. त्यावेळी जलालुद्दीन फिरोज खिलजी सुभेदार म्हणून बलबनकडे नोकरीत होता. दरबारातील अमिरांना आता हे वारस नकोसे झाले होते. बलबनचा हा कमकुवत वारस पाहून दरबारी अमिरांनी बलबनचा दुसरा नातू, काएकाबादला गादीवर बसवलं. हा नातू बलबनच्या पठडीत तयार झाला होता. आजोबा असेपर्यंत नाच-गाणं-मदिरा यापासून दूर राहिला. पण सुलतान बनल्याबरोबर, महालात नशेचा पूर वाहायला लागला. अनेक रोगांनी तो व्याधीग्रस्त झाला, पक्षाघाताने आजारी पडला, तेव्हा त्यालाही गादीवरून पदच्युत करायचं दिल्ली दरबारातील राजकारण्यांनी ठरवलं. त्यात पुढाकार होता तो मलिक सुरखा आणि काछा यांचा. त्यांनी काएकाबादच्या बालक मुलाला गादीवर बसवून सत्ता हातात घेतली. कैकाबादबद्दल असं सांगतात की मारेकरी जेव्हा कैकाबाद सुलतानाला मारायला गेले तेव्हा त्याला पलंगावरून उतरण्याची शक्ती नव्हती. मारेकऱ्यांच्या दोन चार लाथांमध्येच तो मेला. सुलतानाचं शव मारेकऱ्यांनी त्याच्या महालाच्या खिडकीतूनच बाहेर यमुनेच्या पाण्यात फेकून दिलं.

आता मलिक सुरखा आणि काछां यांना त्यांच्या विरोधकांना संपवायचं होतं. त्या विरोधकांमध्ये जलालुद्दीन खिलजीहीही होता. पण जलालुद्दीनच्या भाच्याने त्याला सावध केलं म्हणून दिल्लीला जाणं जलालुद्दीन टाळत राहिला. शेवटी मलिक काछा स्वत:च फौज घेऊन जलालुद्दीनवर चालून गेला. कनौजला दोघांची गाठ पडली. मलिक काछांला जलालुद्दीन याने जरा आराम कर असा निरोप पाठवला.

आणि मलिक काछां आराम करत असतांना त्याच्या तंबूत शिरून त्याला कापून काढले.

आता जलालुद्दीन दिल्लीचा सर्वाधिकारी झाला.



खिलजी घराण्याचा दिल्लीत आता उदय झाला. १३ जून, १२९० या दिवशी वयाच्या ७० व्या वर्षी, जलालुद्दीन सुलतान बनला. दुसरे दिवशी दरबारात आला आणि नेहमीप्रमाणे इतर अमिरांबरोबर जाऊन बसला अशी त्याच्या भोळेपणाबद्दल आख्यायिका आहे. असं सांगतात की तो इतका दयाळू होता की गुन्हेगारांना शिक्षाच द्यायचा नाही. जलालुद्दीन विरुध्द मलिक छाज्जूने बंड केलं.

सुलतानाने आपल्या मुलाला त्याच्यावर पाठवलं. मलिक छाज्जूचा पराभव झाला. मलिक छाज्जू आणि त्याचे विद्रोही यांना सुलतान जलालुद्दीनच्या दरबारात जेव्हा आणलं गेलं तेव्हा छाज्जुच्या फाटक्या कपड्यांवर मुद्दाम चिखल लावण्यात आला होता. त्याचे हात मागे बांधले होते. सुलतान जलालुद्दीनने हे पाहिलं आणि त्याने बंडखोरांना स्वच्छ करून चांगले कपडे देण्याचं  फर्मावलं. त्या सर्वांना आपल्या महालात बोलावून पाहुण्यांसारखं वागवलं. सुलतानाच्या या वागण्याने विद्रोही खजील झाले, आणि दरबारी मात्र नाराज झाले.

एका आमिराने सुलतानाला आपला राग दाखवत, तुम्ही अशी दया दाखवलीत तर देशात शांतता कशी नांदणार? असं विचारलं तर सुलतान उत्तरला,

" ७० व्या वर्षी मी माझे हात दुसऱ्याच्या रक्ताने रंगवले तर जहन्नूममध्ये आगीत जळून जाईन. आता तर माझे स्वतःचेच पाय कबरीत अडकले आहेत. "

पण सुलतानाच्या या धोरणामुळे आणि क्षमाशील स्वभावामुळे शहरात बदमाशांचा उच्छाद वाढला. जनता हैराण झाली. तेव्हा त्याने सर्व गुन्हेगारांना नावेत बसवून बंगालकडे पाठवून दिलं पण तुरुंगात टाकलं नाहीच. यामुळे गुन्हेगारच नाही तर सज्जन लोकही बेडर झाले आणि गुन्हे करायला लागले. राज्यात अनाचार वाढला. त्यामुळे  दिल्लीतील लोकांना हा सुलतान नकोसा झाला.

त्याच्याबद्दल आणखी एक किस्सा सांगितला जातो. एकदा सर्व अमीर रात्री मद्य पीत बसले असतांना ज्यांना मद्य जास्त झालं, त्यातील एकाने, मी सुलतानाचे तलवारीने तुकडे करीन असं म्हटलं. त्यावर दुसऱ्याने मी सुलतानचं मस्तक छाटीन म्हटलं. पण जो अमीर अजून शुद्धीवर होता, तो धावत सुलतानाकडे आला, आणि त्याने धुंद झालेल्या अमिरांची बोलणी सुलतान जलालुद्दीनला सांगितली. तेव्हा सुलतानाने त्या सर्वांना आपल्यासमोर हजर करायला सांगितलं. त्यांना आणल्यावर जलालुद्दीन हातात तलवार घेऊन उभा होता. ती त्या अमीर लोकांसमोर टाकून त्याने कोण मला मारणार असा विचारलं. सगळे थरथर कापायाला लागले. तेव्हा

एकजण पुढे झाला. सुलतानाचे पाय धरून त्याने क्षमा करा म्हटलं. सुलतानाचा राग शांत झाला. ही घटना घडून गेल्यावर काही दिवसांनी बाजारात एक नकला करणारा तरुण सुलतानाचे पाय धरणाऱ्या माणसाची जशीच्या तशी नक्कल करत होता. सुलतानाला ही बातमी कळल्यावर त्याने त्या कलाकाराला दरबारात बोलावलं आणि नक्कल करून दाखवायला सांगितलं. हादरून गेलेला तो तरुण नक्कल करेना. तेव्हा सुलतानाने त्याला अभय दिलं. त्या नकल्याने इतकी सुंदर नक्कल केली की सुलतान पोट धरून हसत सुटला. एवढंच नव्हे तर त्याने त्या कलाकाराला आपल्या शाही महालात कायम नोकरीत घेतलं.

जलालुद्दीनच्या काळात जे मंगोल हल्ले झाले त्यात जे मंगोल धर्मांतर करून इस्लाम धर्म स्वीकारायला तयार झाले, त्यांना जलालुद्दीनने दिल्लीत आसरा दिला. याच्या काळात गुलाम वंशाच्या पाठीराख्यांनी जोरदार बंड केलं पण जलालुद्दीन याने ते क्रूरपणे मोडून काढलं. त्याच्या कारकीर्दीत दोन मोहिमा निघाल्या. रजपूतांबरोबरची रणथांबोरची लढाई तो हरला. आणि मंगोल लोकांच्या हल्ल्याला, त्यांना सिंध नदीच्या पलीकडे हाकलून लावण्यात तो यशस्वी झाला.

जलालुद्दीनचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी मात्र क्रूर आणि लोभीपणाचं दुसरं टोक होता. त्याला जल्लालुद्दिनने आपली मुलगी दिली होती. हा अल्लाउद्दिन कधीपासून सुलतान बनण्याची स्वप्नं पाहत होता. जलालुद्दीनने सत्ता हातात आल्यावर, आधीचा सुभेदार काढून तिथे अल्लाउद्दीनला अलाहाबादजवळच्या माणिकपूरचा सुभेदार बनवलं. सुलतानापासून दूर गेल्यावर अल्लाउद्दिन दौलत गोळा करायच्या मागे लागला. सुलतान बनण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटला. सिंहासन जिंकायचं तर फौज पाहिजे. फौज उभारायची तर पैसा पाहिजे. म्हणून त्याने समृध्द राज्यांची माहिती काढायला सुरुवात केली. भेलासाच्या स्वारीतून येतांना, त्याला यादवांच्या गच्च भरलेल्या खजिन्याची आणि उत्कृष्ट देवगिरी किल्ल्याची माहिती मिळाली.

आजवर दिल्लीची गादी ज्यांनी ज्यांनी चालवली ते विंध्य ओलांडून दक्षिणेत आले नव्हते. पण अल्लाउद्दिन खिलजी याने नवीन पायंडा घातला. ७०० मैलांचं अंतर ओलांडून तो देवगिरीवर चालून आला. यदुवंशीय राजा रामचंद्रदेव याला हरवून देवगिरी जिंकला. त्याने देवगिरीहून जी लूट नेली, त्यात ६०० मण सोनं, ७ मण मोती  त्याकाळात खरे मोती असट, दोन मण रत्ने , १००० मण चांदी, आणि ४००० रेशमी वस्त्रे होती. एवढा खजिना नेल्यावर त्याने जलालुद्दीनला एक दमडीही न पोचवता उलट त्यालाच तो खजिना पाहायला बोलावलं.



सुलतान जलालुद्दीन खजिना पाहायला माणिकपूरला निघाला तेव्हा दरबारातील सर्व अमिरांनी त्याला रोखायचा प्रयत्न केला. अल्लाउद्दिन घातपाती आहे, तुमच्या जीवाला धोका आहे, हे सांगितलं तरी जलालुद्दीन माणिकपूरला निघाला. नावेतून प्रवास करत तो अलाहाबादला पोचला तेव्हा अल्लाउद्दीनचा भाऊ अलमास बेग सुलतानाच्या स्वागताला समोर गेला. सुलतान जलालुद्दीनची व्यवस्था करून अलमास बेग सुलतानाला म्हणाला की अल्लाउद्दीन सुलतानाला एकट्यालाच भेटायची इच्छा करतो आहे. तुम्ही तुमच्या लवाजम्यासकट जाल तर त्याला भीती वाटेल. पण त्याच्या विजयाचा तो थाटात उत्सव करणार आहे आणि दक्षिणेतून आणलेली सर्व लूट आलमपनाहना देणार आहे.

सुलतान जलालुद्दीनने त्यावर विश्वास ठेवला आणि त्याप्रमाणे सुलतान जलालुद्दीन एकटाच पुतण्याच्या भेटीला गेला. दोघांची गळाभेट झाली. इतक्यात अल्लाउद्दीनने इशारा करताच एक जवान पुढे झाला आणि त्याने जलालुद्दीनच्या पाठीत मागच्या बाजूने तलवार खुपसली. पण ती सुलतानाच्या हाताला जखमी करून गेली. सुलतान धावत लांब जायला लागला तेव्हा दुसऱ्या एका सैनिकाने त्याच्यावर जोरात हल्ला करून त्याचं शीर उडवलं आणि अल्लाउद्दिन खिलजीच्या पायाशी आणून ठेवलं. अल्लाउद्दिनने ते शीर तलवारीच्या टोकावर ठेवून आपल्या तळावर फिरवलं आणि स्वत:ला सुलतान म्हणून घोषित केलं.

१२ जुलै १२९६ या दिवशी जलालुद्दीन अल्लाला प्यारा झाला. जलालुद्दीनच्या बेगमला हे दिल्लीत कळल्याबरोबर तिने आपल्या रुकनूद्दिन इब्राहीम या मुलाला तख्तावर बसवलं आणि अधिकार आपल्या हातात घेतला.

अल्लाउद्दिन खिलजी माणिकपूरचा तळ हलवून मोठी फौज घेऊन दिल्लीत आला. शहजादा रुकनूद्दिन आणि आपल्या सासूला मारून टाकलं. जलालुद्दीनचा दुसरा मुलगा अरकलीखांला पकडलं आणि कैदेत टाकून त्याचे डोळे काढले. मग एका हातात तलवार आणि दुसऱ्या हाताने सोन्या-चांदीची नाणी उधळत तो दिल्लीच्या रस्त्यावरून मिरवत गेला. ज्यांनी विरोध केला ते तत्काळ ठार झाले आणि ज्यांनी जयजयकार केला, त्यांना भरपूर बक्षीस दिलं.

खिलजीच्या घराण्यातील दुसरा अवतार सुरू झाला अल्लाउद्दिन खिलजी.

# अल्लाउद्दीन खिलजी.

## जन्म १२५० . मृत्यू ४ जाने. १३१६.

तमाम भारतीयांच्या मनातून अजूनही पुसला न गेलेला, ऐतिहासिक सुन्नी मुसलमान सुलतान म्हणजे अल्लाउद्दिन खिलजी. राणी पद्मिनी आणि अब्रू रक्षणासाठी तिचा जोहार, राजपूत पुरुषांचाही जिंकू किंवा मारू म्हणून केशरी वस्त्रे नेसून अल्लाउद्दिनवर केलेला हल्ला या कथेमुळे तो अजून घर करून आहे. राणी पद्मिनीची कथा खरी की खोटी ते इतिहासालाच माहीत.. मलिक महंमद याने लिहिलेली ही “पद्मावत” कहाणीही काल्पनिक असण्याची शक्यता जास्त.



कोण होता हा अल्लाउद्दिन?

अल्लाउद्दीनचा जन्म कलत या झाबुलीस्थान म्हणजेच अफगाणिस्थानमधील गावात झाला.

त्याचं पूर्ण मूळ नाव अलीगुरपशाह जुनाखान खिलजी. वडिलांचं नाव शियाबुद्दिन मसूद. जन्म १२५० सालच्या जवळपासचा. वडील लहान वयातच वारले तेव्हा जलालुद्दीन या काकाकडे तो आणि त्याचे भाऊ वाढले. जलालुद्दीन खिलजीचा हा पुतण्या आणि जावईसुद्धा. या समाजात वंशाचं रक्त शुध्द राहावं म्हणून चुलत भाऊ बहिणीचं लग्न लावण्याची रीत होती. अनेकवेळा असा चुलत भाऊ नसला तर मुली कुमारिका राहात. जलालुद्दीन सुलतानाने मलिका ए जहान ही आपली मुलगी या पुतण्याला दिली होती. आणि त्याच्या अलमासबेग या धाकट्या भावाला आपली दुसरी मुलगी दिली. सुलतान जलालुद्दीनने अल्लाउद्दीनला इ. स. १२९१मध्ये अलाहाबादजवळच्या कडामाणिकपूरचा सुभेदार केलं. या ठिकाणी आधीच्या सुलतानाचा मलिक छाजू ह्याच्याशी लढून अल्लाउद्दिनने माणिकपूरचा ताबा घेतला. त्यानंतर अल्लाउद्दिनने इ. स. १२९३ मध्ये माळवा प्रांतातील भेलसावर स्वारी केली आणि तिथून आणलेली सारी लूट सुलतानाला भेट दिली. सुलतान जलालुद्दीन या त्याच्या वागण्याने खूष झाला आणि त्याला अवधचा सुभेदार म्हणून नेमलं. युध्दमंत्री हे पदही दिलं.

तोपर्यंत जलालुद्दीनच्या भोळ्या, कनवाळू कारभाराला लोक कंटाळले होते. त्यामुळे अल्लाउद्दिन आता सत्ता बळकवायची स्वप्नं पाहायला लागला. माणिकपूरच्या अमिरांनी अल्लाउद्दिनचे कान भरले आणि जलालुद्दीनची सल्तनत स्वत:कडे घेण्यासाठी दौलत जमा करण्याचं त्याच्या मनात भरवलं. पण त्यासाठी फौज हवी, आणि फौजेसाठी पैसा हवा. त्यामुळे भेलसाच्या स्वारीतच अल्लाउद्दिनने पुढची आपली मोहीम समृध्द देवगिरीवर काढायचं ठरवलं. त्यासाठी गुप्तपणे तयारी चालू केली.

त्याच्या सत्तेचा पाया देवगिरीच्या लढाईपासून सुरु झाला. आताच्या औरंगाबाद पासून १५ मैलांवर असलेल्या देवगिरीच्या किल्ल्याची ख्याती भारतभर

होती. तिथे यादवांचं राज्य होतं. अल्लाउद्दिनला या राजाकडे प्रचंड दौलत असल्याची गुप्त बातमी लागली होती. आपल्या हाती सत्ता घेण्याआधी तिथला खजिना आणण्याची त्याने तयारी चालवली. दौलताबाद आणि देवगिरी हे दोन वेगळे प्रदेश आहेत.

इ. स. १२९६ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीची स्वारी केली. निवडक उत्तम ८००० घोडदळ घेऊन तो बाहेर पडला. सुलतान जलालुद्दीनला अंधारात ठेवण्यासाठी त्याने आपण चंदेरीला जात आहोत असं घोषित केलं. आपला कारभार आपला विश्वासू सरदार आला-उल्मुल्कच्या हाती सोपवला आणि तो फौज घेऊन बाहेर पडला. त्याकाळात त्याआधी कुणीच विंध्य ओलांडला नव्हता. अफगाणी-तुर्की आक्रमक आले आणि दिल्लीहून परत गेले होते. माणिकपूरहून ७०० मैलांचं अंतर ओलांडून खिलजी अचलपूरला आला. तिथे आपल्या फौजेला २ दिवस विश्रांती देऊन तो लासूरी घाटाने देवगिरीकडे निघाला. या ठिकाणी त्याचा राजा रामदेवचा जहागीरदार कन्हान याच्याबरोबर झगडा झाला. त्याला हरवून खिलजी देवगिरीवर आला.

त्यावेळी राजा रामचंद्र वृध्द झाला होता. आणि त्याचा मुलगा फौज घेऊन स्वारीवर गेला होता, त्यामुळे किल्ल्याचं रक्षण करायला पुरेशी फौज नव्हती. तेव्हा वृध्द राजा किल्ल्याच्या आसऱ्याला गेला. अल्लाउद्दिनच्या फौजेने किल्ल्याच्या खालची गावं लुटली, नागरिकांना ठार केलं. तोपर्यंत महिने लोटले. किल्ल्यातली शिधा सामग्रीही संपत आली, तेव्हा देवगिरीच्या राजाने आपल्या मुलाची वाट न पाहता खिलजीशी तह करण्याची बोलणी सुरु केली.

इतक्यात देवगिरीचा राजपुत्र सिंघम स्वारीवरून परत आला. त्याने अल्लाउद्दिन बरोबर सामना करायचं ठरवलं. या लढाईत राजपुत्र सिंघम हरला. ज्यावेळी सिंघम राजपुत्राने तहाची बोलणी करायचा प्रस्ताव खिलाजीकडे पाठवला

तेव्हा अल्लाउद्दिनने  दंडाची रक्कम दुप्पट केली. ती प्रचंड संपत्ती घेऊन अल्लाउद्दिन आपल्या राज्यात परतला. ती लूट होती, ६०० मण सोनं, १००० मण चांदी, ७ मण मोती, २ मण रत्नं, ४००० रेशमी वस्त्रे. सुलतान जलालुद्दीन खिलजीला दिल्लीत ही बातमी कळताच तो अल्लाउद्दिनची ही लूट पाहायला ग्वाल्हेरपर्यंत आला, पण आपल्या सुलतानाची भेट न घेता, अल्लाउद्दिन कडा माणिकपूरला निघून गेला.

त्यानंतर सुलतानाच्या दुसऱ्या जावयाने, म्हणजे अलमासखान याने सुलतानाचं अल्लाउद्दिनची भेट घ्यायला मन वळवलं. जलालुद्दीन सुलतानाला त्याने एकट्याला भेटीला बोलावलं होतं. सुलतानाच्या बेगमेने आणि दरबारी अमीर लोकांनी एकटे जाऊ नका, अल्लाउद्दिन दगाबाज आहे असं परोपरीने सुलतान जलालुद्दीनला सांगितलं. पण जलालुद्दीनने त्यांचं कुणाचंही ऐकलं नाही. सुलतानाने माणिकपूरला जायचं ठरवलं.

जलमार्गाने यमुना गंगा पार करून सुलतान जलालुद्दीन नावेतून उतरला. अलमास बेगने त्याचं स्वागत केलं. त्याचं स्वागत होऊन त्याला एकट्यालाच अल्लाउद्दिनच्या भेटीला नेलं. सुलतानाचं अल्लाउद्दिनने स्वागत केलं. अल्लाउद्दिन याने सुलतानाला गळा मिठी मारत असतांना आपल्या अंगरक्षकाला इशारा केला. त्याबरोबर अंगरक्षकाने सुलतानाच्या पाठीत तीक्ष्ण खंजीर खुपसला गेला. पण वार चुकला. तेव्हा “ हे तू काय केलंस, “ असं ओरडत सुलतान जलालुद्दीन दूर पळायला लागला. त्याच्या पाठलागावर गेलेल्या एकाने त्याचं मुंडकं कापलं आणि ते अल्लाउद्दिनच्या पायाशी आणून ठेवलं.

ती तारीख होती २० जुलै १२९६.

२० जुलै १२९६. भारताच्या इतिहासातील एक काळाला काळी कलाटणी देणारा  फार महत्वाचा दिवस होता तो. तेव्हापासून सल्तनतीची काळी छाया देशभर पसरली. ती दक्षिण भारताला व्यापून गेली. अनेक राजघराणी नव्याने जन्मली, साम्राज्यांच्या उदय झाला, काही विलयाला गेली. काही प्याद्यांचे वजीर झाले, वझीर काळाच्या पडद्याआड गेले. राजकारणाला, युध्दचक्राला गती मिळाली. भारतीय आचार-विचार-धर्म सारं ढवळून निघालं.

अल्लाउद्दिनने लगेच सुलतान बनल्याची घोषणा केली. सुलतान जलालुद्दीनचं शीर आपल्या छावणीतून फिरवलं. त्यानंतर तो दिल्लीला यायला निघाला. पण पावसाळ्यामुळे गंगा-यमुना दोन्ही नद्यांना प्रचंड पाणी आलं होतं. त्यामुळे अल्लाउद्दिन खिलजी मुक्काम करत करत दिल्लीकडे यायला निघाला. त्याने यावेळी फौजेत प्रचंड भरती केली, त्यामुळे सर्व जनता त्याच्या बाजूने झाली. तो दिल्लीत पोचण्यापूर्वी जलालुद्दीनच्या बेगमेने आपल्या लहान मुलाला रुकनूद्दिन याला गादीवर बसवून नवीन सुलतान म्हणून त्याच्या नावाची घोषणा केली. अल्लाउद्दिनला हे कळताच त्याचा संताप अनावर झाला. दिल्लीत पाय ठेवताच त्याची आणि रुकनूद्दिनची लढाई झाली. पण त्याची फौज अल्लाउद्दिनला फितूर झाली. तेव्हा आपल्या आईला घेऊन रुकनूद्दिन मुलतानला आपल्या भावाकडे, आरकालखानकडे  निघून गेला. दिल्लीला पोचल्यावर अल्लाउद्दिनने दोघांनाही ठार केलं, आरकाल खानला आंधळं करून कैदेत टाकलं आणि मग मारून टाकलं. अशारितीने जलालुद्दीन याचा वंश संपला.

२१ ऑक्टोबरला १२९६ या दिवशी अल्लाउद्दिन स्वत: तख्तनशीन झाला. हातात सत्ता आल्याबरोबर त्याने जलालुद्दीन काळातील जुने सरदार मारून टाकले, आणि जे त्याला वश झाले त्यांच्यावर दौलतीचा पाउस पाडला.

अल्लाउद्दिन खिलजीची सत्ता सुरू झाली. त्याला मंगोल आक्रमणाला सतत तोंड द्यावं लागलं. दिल्लीच्या संपत्तीचा मोह मंगोलांना होताच. आधीच्या शतकातही

त्यांच्या स्वाऱ्या सतत चालू असत. खिलजीलाही यांचा सामना करावा लागला. या युद्धात मंगोल सैन्याचं प्रचंड शिरकाण झालं. २०,००० मंगोल सैनिक मारले गेले.

मग अल्लाउद्दिनने राज्यविस्ताराला सुरुवात केली.

दिल्लीला मुसलमानी सत्तेचा पाया सुरु झाल्यापासून सतत भरडलं गेलेलं राज्य म्हणजे दिल्लीच्या सीमेलगतचं राजपुतांचं राज्य. इ. स. १२९९ साली पहिला हल्ला उलगखाँ आणि नसरतखाँ यांनी गुजरातवर हल्ला केला. तिथला राजा रायकर्ण वाघेला पळून गेला. खूप गावं अल्लाउद्दीनच्या फौजेच्या झंझावातात ओसाड झाली. सारी संपत्ती लुटून हुजारातीच्या फौजा दिल्लीला परतल्या. वाघेला कर्ण राजाची राणी कमलादेवी हिलासुद्धा जनानखान्यात आणलं. अल्लाउद्दीनने तिच्याशी निकाह लावला.

त्यानंतर त्याची दृष्टी वळली ती सौराष्ट्राकडे. गझनीच्या महंमदाने लुटलेल्या सोमनाथ मंदिरावर परत एकदा हल्ला झाला. खंबायत बंदरही लुटलं गेलं. अमाप संपत्ती घेऊन शाही फौजा दिल्लीला परतल्या. या लुटीत खिलजीला एक अनमोल रत्न मिळालं.

होतं तर देखणं पण मळकं कुळकं. १००० दिनारला गुलाम म्हणून विकत घेतलेलं. पण या देखण्या गुलामाचा वकूब वेगळाच होता. त्या गुलामानेही आपलं हुशारीचं पाणी दाखवायला सुरुवात केली. त्याचं नाव मलिक काफूर. सुलतान अल्लाउद्दिनच्या हाताखाली तो सुलतानाचा उजवा हातच बनला.

अल्लाउद्दीनच्या यशाची कमान वाढायला लागली. जिथे स्वारी होईल, तिथे यश त्याचं स्वागत करत होतं. या यशाने गर्वित झालेल्या खिलजीने स्वतःला सिकंदर सानी ( छोटा-दुसरा ) अशी उपाधी लावून घेतली. त्याला स्वतःची बरोबरी सिकंदरशी करून घ्यायची होती. एवढंच करून तो थांबला नाही तर त्याने आपल्या नावाची इतिहासात मोहोर उठावी म्हणून नवीन धर्म स्थापन करण्याची हालचाल सुरू केली. त्याला परखड मत देणार कोण? दरबारातील अमीर गप्प

बसले. पण एक दिल्लीचा कोतवाल होता, ज्याने सुलतानाला असं काही करू नका म्हणून बजावलं.. मग सुलतानाला तो विचार सोडवा लागला.

एकीकडे भारतातील राज्यं जोडत जाणाऱ्या खिलजीला १२९८ साली जलंदर इथे २ लाखांच्या मंगोल सैन्याच्या स्वारीला कडाडून भारी तोंड द्यावं लागलं. खिलजीच्या सेनापतीने हिंमतीने सामना दिला. मंगोल सैन्याच्या शवांचा खच पडला. पाठोपाठ पुढील वर्षीही मंगोल हल्ला झालाच. त्यातील काही मंगोल जवळच्याच रणथंबोर संस्थानाच्या हम्मीर राजाच्या आश्रयाला गेले. त्यातच या रणथंबोरच्या राजाने खिलजीच्या सैन्यात असंतोष पसरवणाऱ्या महंमद शहा नावाच्या सरदाराला आसरा दिला. त्यामुळे अल्लाउद्दिन खिलजी आणखी संतापला.



त्याने आपल्या उलगखाँ सरदाराला रणथांबोरवर पाठवलं. रणथंबोरचा हा मजबूत किल्ला जिंकायला अतिशय अवघड होता. एका उंच टेकडीवर बांधला होता. त्या टेकडीच्या अवतीभोवती संरक्षण करणारे डोंगर होते. किल्ल्याच्या भोवती कोट बांधलेले होते. किल्ल्याच्या आत पाण्याने भरलेले खंदक होते, ज्यात पावसाळ्यातलं पाणी भरपूर साठवून ठेवलं होतं. अवतीभोवतीचे डोंगर ओलांडून

जरी एखादा शत्रू किल्ल्यापर्यंत पोचला तर ते साठवलेलं पाणी मोकळं केलं जात असे, ज्याने पूर यायचा आणि त्यात शत्रू वाहून जाऊन जीव गमवायचा. उलगखान रणथंबोर किल्ल्यावर चालून गेला. आजवर शत्रूला वर येऊ द्यायचं आणि मग त्यांना मोठे मोठे धोंडे वरून ढकलून मारायचं अशी राजपूतांची संरक्षणाची पद्धत होती.

पण या वेळी वेगळंच घडलं. हम्मीर राजाचा एक मंत्री धरमसिंग याने सेनापतीला स्वत: खाली उतरून शत्रूवर हल्ला करण्याचा सल्ला दिला.. सेनापतीही टेकडी उतरून खाली आला. त्याबरोबर तुर्की फौजेने जोरदार हल्ला करून राजपूतांची फौज कापून काढली. स्वत: सेनापतीही त्यात मारला गेला. तरीही शत्रूची फौज या कडव्या शूर राजपुतांनी पळवून लावली. हे वृत्त कळल्याबरोबर हम्मीर राजाने धर्मसिंगला कठोर शिक्षा दिली. त्याचे डोळे काढले. तेव्हा या धरमसिंगने हम्मीर राजाच्या मर्जीतील राजनार्तिका धरा हिला गाठलं आणि तिच्यातर्फे राजाला निरोप पाठवला की तो त्याच्या जवळचे हजारो स्वार आणि सैनिक राजाला देऊ शकतो.

मग राजाने आपल्या भावाला भोजला मंत्री केलं. पण राजा धरमसिंगच्या सल्ल्यानुसार वागायला लागला आणि भोजचा पदोपदी अपमान करायला लागला. तेव्हा अपमानित झालेला भोज, भावाचा बदला घेण्यासाठी किल्ला सोडून निघाला आणि अल्लाउद्दिनच्या दरबारात पोचला. सुलतानाचा आनंद गगनात मावेना. त्याने हम्मीरला जाऊन मिळालेल्या महंमदशहा सरदाराचं वतन भोजाला दिलं.

भोजने मग सुलतानाला रणथंबोरवर हल्ला करण्याचा सल्ला दिला. पण परत सुलतानाच्या फौजेचा राजापूतांकडून दारुण पराभव झाला. एवढंच नाहीतर त्या फौजेबरोबर आलेल्या स्त्रियांची रजपुतांनी डोकी उडवली आणि त्यावर हंडा ठेवून दही घ्या, दूध घ्या असं म्हणत सैन्यात फिरवली अशी आख्यायिका आहे. मग हम्मीरच्या फौजेने भोजच्या वतनावरही हल्ला केला. तेथील वस्तीतील सारी बालकं आणि तरुण पकडले आणि रणथांबोरला आणले. सुलतानाच्या कानावर ही बातमी

गेली आणि त्याचा प्रचंड संताप झाला. त्याने आपली सर्व फौज गोळा केली आणि परत उलगखाँला हम्मीर राजावर पाठवलं.

यावेळी उलगखाँने आपली चाल बदलली. ४ लाख मोहरा आणि त्याची कन्या अल्लाउद्दिनला दिली, किंवा त्याच्या आश्रयाला आलेल्या सुलतानाच्या सरदारांना आपल्या हवाली केलं तर आपली मैत्री होईल असं निरोप पाठवला. राजा हम्मीरने त्याला प्रत्युत्तर पाठवलं की जेवढया  मोहरा तू मागतो आहेस तेवढे तलवारीचे घाव तुला पाठवीन. ह्या उत्तरानंतर उलगखाँने लढाईची तयारी सुरु केली. खंदक भरून काढले, आणि किल्ल्याच्या भिंतीवर चढण्यासाठी शिड्या लावल्या. पण वरून तोफांचे गोळे फौजेवर पडायला लागले आणि खिलजीची फौज घाबरून गेली. त्यांचा सेनापतीच यात ठार झाला. आपल्या सैन्याची हार ऐकून खिलजी स्वत: भारी फौज घेऊन आला. पण त्याच्यावरही हम्मीरने एवढा कडाडून हल्ला केला की तोही विचारात पडला. त्याने हम्मिरच्या सेनापतीला बोलणी करण्यासाठी आमंत्रण पाठवलं.

सेनापती रतीपाल आल्यावर खिलजीने त्याला रणथंबोरच्या तख्तावर बसवण्याचं प्रलोभन दाखवून त्याला फोडलं. रतीपाल हम्मिराला भेटायला आला आणि त्याने खिलजीचा निरोप राजाला दिला की तो राजाच्या मुलीशी लग्न करू इच्छितो आहे. हे ऐकल्यावर राजा संतापला आणि त्याने लढा तीव्र करायचा निर्णय घेतला. लगेच रतीपाल आपल्या साथीदारांबरोबर खिलजीला जाऊन मिळाला. राजा हम्मीर एकटा पडला. त्या युद्धात हम्मीर मारला गेला. त्याच्या आश्रयाला आलेला महंमदशहासुद्धा जखमी अवस्थेत पकडला गेला. खिलजीसमोर त्याला आणलं तेव्हा खिलजीने त्याला विचारलं की मी उपचार करून तुला बरं केलं तर काय करशील? तेव्हा तो सरदार म्हणाला की तुम्हाला मारून मी या राजाच्या मुलाला परत गादीवर बसवून हे रणथंबोरचं राज्य बुडू देणार नाही. या तडफदार उत्तरावर न रागावता अल्लाउद्दिनने हुकूम दिला की जेव्हा हा मरेल तेव्हा त्याचा इतमामाने दफनविधी करा. त्यानंतर देशद्रोही रतीपाल आणि त्याच्याबरोबर

आलेल्या त्याच्या साथीदारांना सुलतानाने ठार केलं आणि रणथंबोरच्या चौहान वंशाचा अंत झाला.

इ. स. १३०१मधे रणथंबोर राज्य अल्लाउद्दीन खिलजीच्या हाती गेलं.

चितोड इ. स. १३०१, माळवा १३०५, देवगिरी आणि शिवानी १३०८, सारा राजस्थान, आणि वारंगळ १३१०, अशा महत्त्वाच्या घराण्यांचा नाश झाला. परमार,चौहान, वाघेला, होयसाल, पंड्या, घराण्यांचा अस्त झाला. चितोडचा राजा रतनसिंग मारला गेला. त्या युद्धात ३०,००० लोकांचं शिरकाण झालं असं इतिहास सांगतो. रणथंबोरच्या मोहिमेच्या काळात अल्लाउद्दिन खिलजीला दिल्लीत बंडाळी करणाऱ्यांना शिक्षा देण्याचं कामही करावं लागलं. या प्रकारातून बोध घेऊन त्याने एक स्वतंत्र गुप्तहेर खातं तयार केलं.

इ. स. १२९७ सालापासून पुढे ९ वर्षे, १३०६ सालापर्यंत मंगोल आक्रमणांना अल्लाउद्दिनच्या फौजांनी सतत लढा दिला. १३०५ सालात मंगोल आले ते वेगळ्याच तयारीने. त्यांनी दिल्लीवर शह न बसवता हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या अमरोहावर हल्ला केला. यातही अल्लाउद्दिन विजयी झाला. ८००० वर मंगोल पकडले गेले. पाठोपाठ पुढील वर्षीही असाच त्यांचा हल्ला झाला, तोही अल्लाउद्दिनच्या सेनापतीने मोडून काढला. मग मात्र त्यानंतर कोणताही मंगोल हल्ला झाला नाही.

त्यानंतर खिलजीने आपली नजर मारवाडकडे वळवली. शिवणीचा किल्ला १३०८ मध्ये जिंकून घेतला. पुढची त्याची मोहीम होती दक्षिणेकडील वारंगळ या समृध्द राज्यावर. तिथे त्याने आपल्या मलिक काफुरला पाठवलं. एक महिन्याच्या वेढ्यानंतर वारंगळचा राजा प्रतापरुद्र शरण आला, प्रचंड दौलत घेऊन मलिक काफूर परतला.

याच मोहिमेत त्याने पुढील स्वारीची आखणी केली. होयसाळ आणि पंड्या ही  ती दोन राज्यं होती. पावसाळ्यानंतर मलिक काफूर परत दक्षिणेच्या मोहिमेवर




निघाला. या वेळी पंड्या भावांमध्ये सत्ताग्रहणावरून भांडण लागलं होतं. त्याचा फायदा घेण्यासाठी होयसाळ राजा बल्लाळ तिथे गेला होता, तेव्हाच मलिक काफुरने  होयसाळ राज्यावर स्वारी करून ते जिंकून घेतलं आणि बल्लाळला

मंडलिक करून घेतलं. बल्लाळ राजा ताब्यात आल्यावर मलिक काफूर पंड्या भावांच्या राज्यावर गेला. पण हे आक्रमण होणार हे कळल्याबरोबर दोन्ही भाऊ पळून गेले. अमाप- अफाट संपत्ती घेऊन काफूर दिल्लीला परतला.

अल्लाउद्दिनला या काळात बातमी कळली की मुसलमान झालेले जे मंगोल सैन्यात होते, त्यांच्या सेनापतीने गुप्तपणे पंडीयान राजाशी हात मिळवणी केली होती. अल्लाउद्दिनने या सेनापतीला ठार करण्याचा हुकूम मलिक काफुरला दिला. पण या शिक्षेने नाराज झालेल्या मंगोल सैनिकांनी अल्लाउद्दिनलाच ठार करण्याचं कारस्थान रचलं. अल्लाउद्दिनच्या गुप्तहेरांनी ही बातमी आणल्यावर २०,००० वर मंगोल सैनिकांना काढण्यात आलं. पाठोपाठ, देवगिरीच्या राजाने अल्लाउद्दिनची राजवट उलथून टाकण्याचं कारस्थान रचलं. हे मलिक काफुरला कळल्याबरोबर त्याने परत दुसऱ्यांदा देवगिरीवर हल्ला केला. राजाचा पराभव केला आणि स्वत: देवगिरीचा सुभेदार बनला. यामुळे देवगिरीची हिंदू सत्ता समाप्त झाली.

अल्लाउद्दिनच्या राज्याची सीमा आता दक्षिणेत मदुराईपर्यंत पोचली.

राज्य व्यवस्थित चालवण्यासाठी अल्लाउद्दिनने बरेच मार्ग निवडले. आतापर्यंतच्या मंगोल हल्ल्यांमुळे सुलतानाने त्यांची आक्रमणं कायमची रोखण्यासाठी दिल्ली ते अफगाणिस्तान या मार्गावरील सर्व किल्ले मजबूत केले. तेथील शिबंदी वाढवली आणि मंगोल दिल्लीपर्यंत येण्याआधीच त्यांना रोखले जाण्याची व्यवस्था केली. राज्यातही त्याने अनेक सुधारणा केल्या. त्यातील मुख्य सुधारणा म्हणजे आजपर्यंत त्याच्याविरूध्द जी बंडाळी झाली होती त्याचं मूळ राज्यातील श्रीमंतांकडे, सरदारांकडे, जमीनदारांकडे असलेला प्रचंड पैसा हे आहे हे त्याच्या लक्षात आलं. म्हणून सर्व श्रीमंतांचा पैसा, जमिनी त्याने जप्त केल्या. सैनिकांनाही त्याने नगद रक्कम द्यायला सुरुवात केली. जमिनीची प्रतवारी करून सारा लागू केला. राज्यातील बाजारही तीन प्रकारात विभागले. 1. दाणाबाजार. २. कपडे, तेलतूपासारख्या लोकांच्या दैनंदिन गरजू वस्तू. ३. घोडे–गुरं–गुलाम. त्या सर्व वस्तूंवर त्याचं नियंत्रण होतं. सरकारी चाकरीतील लोकांना चांगले पगार दिले पण

भ्रष्टाचाराला कडक शिक्षा होती. सरकारी खजिना भरण्यासाठी जनतेवर चार प्रकारचे कर लावले. जिझिया कर, चारा कर,( कुरणांवर ) जमीन कर आणि घरांवरचा कर.

अल्लाउद्दिनचा मलिक काफुरवर अतिशय विश्वास होता. आयुष्याच्या शेवटच्या दिवसांमध्ये तर सगळा कारभार मलिक काफुरच्याच हातात गेला होता. अल्लाउद्दीनचं पहिलं लग्न जलालुद्दीनच्या मुलीशी झालं. पण दोघांचं अजिबात पटत नव्हतं. तेव्हा सुलतानाने दुसरं लग्न केलं ते मेहूर नावाच्या स्त्रीशी. तिसरी बेगम म्हणजे कमलादेवी. आणि चौथी बेगम म्हणजे देवगिरीच्या राजाची मुलगी. त्याला चार मुलगे झाले. मेहरूपासून खिज्रखान आणि सर्वात लहान शियाबुद्दिन. खिज्रखान हा त्याचा आवडता मुलगा होता. त्यालाच सुलतान करण्याची त्याची इच्छा होती. शिवाय शादीखान आणि ( कुतुबुद्दीन ) मुबारकखान हे आणखी दोन मुलगे होते.

ढासळत्या शारीरिक अवस्थेमुळे तो शेवटी ४ जानेवारी १२१६ मध्ये मरण पावला. काहीजणांच्या मते मलिक काफुरने त्याला मारलं. आणि अल्लाउद्दिनच्या ६ वर्षाच्या मुलाला, शियाबुद्दीनला, गादीवर बसवून स्वत:च्या हाती सत्ता हाती घेतली.

अल्लाउद्दिन खिलजीची कबर दिल्लीतच आहे.. त्याच्या मृत्यूने इ. स. १२९६ ते १३१६ पर्यंत धुमसणारं एक झंझावाती पर्व संपलं.

# कुतुबुद्दीन खिलजी.

# जन्म १३००. मृत्यू जून १३२०.

प्रचंड राज्यविस्तार करून अल्लाउद्दीन खिलजी मरण पावला. भारतातील दक्षिणेच्या राज्याचा विस्तार त्याने घडवला. पण अल्लाउद्दिनला, आपण जिंकलेले सारे  परगणे आणि दक्षिणेकडची राज्ये स्वतंत्र होतांना आपल्या शेवटच्या काळात पाहावं लागलं. त्याचे शेवटचे दिवस अतिशय दु:खाचे गेले. अल्लाउद्दिन खिलजीचा शेवट जवळ आला, तो अत्यंत आजारी पडला तेव्हा देवगिरीहून मलिक काफूरला बोलवून घेण्यात आलं. कारण खिलजीचा त्याच्यावर गाढ विश्वास होता. खिलजीच्या खंबायतच्या स्वारीमध्ये ह्या देखण्या, शूर, तरुण, पण नंपुसक गुलामाला खिलजीने १००० दीनार देऊन विकत घेतलं होतं. हाच मलिक काफूर म्हणून गाजला. त्याचं मूळ नाव होतं, ताज-अल-दिन-इज्ज-अल-दवा. मलिक काफूर आपल्या पराक्रमाने खूप चमकला. खिलजीचा उजवा हात बनला. मग देवगिरीचा सुभेदार बनला.

आता खिलजीचा अंत जवळ आला तेव्हा मलिक काफूरला सत्ता हातात घेण्याची लालसा उत्पन्न झाली. त्याने खिलजीचे त्याच्या मुलांविरुध्ह कान भरले आणि जे जे वारस गादीवर हक्क सांगू शकले असते, त्या साऱ्यांना तुरुंगात डांबलं. अल्लाउद्दिनचा अंत झाल्यावर मलिक काफूर अल्लाउद्दिनच्या ६ वर्षाच्या शहजादाला, शियाबुद्दिनला तख्तावर बसवून सत्ताप्रमुख झाला. पण  कुणालाच ते आवडलं नव्हतं.

मलिकच्या या वागण्याने दिल्लीत मोठा असंतोष पसरला. नंतर मलिक काफुरने अल्लाउद्दिनचे मोठे दोन मुलगे, मुबारकखान आणि खिज्रखान यांना आंधळं करायला आपल्या माणसाला किल्ल्यात पाठवलं. पण मुबारकखानाने त्या शिपायाला आपला बहुमोल रत्न हार देऊन स्वत:ची सुटका करून घेतली.

मुबारकखानाने आपल्या अंगरक्षकांना मलिक काफूरचा वध करायला राजवाड्यावर पाठवलं. मलिक काफूरच्या मर्जीतील मुबश्शीर याला मलिक काफूरच्या  महालात शस्त्र घेऊन जाण्याची परवानगी होती. त्यानेच काफूरच्या महालात जाऊन त्याचा खून केला, आणि मुबारकखानच्या इतर अंगरक्षकांनी बाकीच्या लोकांना मारून राजवाड्याचा ताबा मिळवला. मलिक काफुराचा खून होऊन असा शेवट झाला होता.

आता मुबारकखान कैदेतून सुटला आणि तख्तावर बसवल्या गेलेल्या शहजादा शियाबुद्दिनचा नायब बनला. पण दरबारातील अमीर लोकांनी, त्या लहान मुलाच्या नावाने कारभार करण्यापेक्षा त्यालाच सत्तारूढ व्हायला सांगितलं.

अशारितीने जानेवारीत अल्लाउद्दीनचा मृत्यू झाल्यावर १४ एप्रिल १३१६ या दिवशी वयाच्या १६ व्या वर्षी मुबारकखान सुलतान बनला. त्यावेळी कुतुबुद्दीन हे त्याने आपलं नाव धारण केलं.



एकूण, लोकांना आता शांतता नांदेल असं वाटायला लागलं. पण तसं होणार नव्हतं. अल्लाउद्दीनचं राज्य चालवण्याचं सामर्थ्य त्याच्यात नव्हतं. त्याने आपल्या बापाने राज्य चालवण्याचे जे जे मार्ग आणि शिस्त राज्याला लावली होती, ती सर्व मोडीत काढायला सुरुवात केली. ज्या लोकांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगात डांबलं होतं, त्या सर्वांना मोकळं केलं. जमीनदारी पद्धत परत चालू केली. सैनिकांचे पगार प्रचंड वाढवले, मोठी मोठी बक्षिशी त्यांना वाटायला सुरुवात केली. जेवढी जेवढी बंधनं अल्लाउद्दिनच्या काळात होती, ती मोडीत निघाली. गुलाम, दासी बटकी यांच्याही खरेदीच्या किमतीही वाढवल्या. या सर्वांमुळे प्रचंड महागाई निर्माण झाली.

दरबारातील आपल्या लोकांमध्ये त्याने अनेक फेरफार केले. सर्वात आधी त्याने पीलखान्याचा (हत्तीखाना) प्रमुख, मलिक दीनारला झाफरखान हा किताब देऊन त्याच्या मुलीशी निकाह लावला. स्वतःच्या मामाला शेरखान किताब दिला. हसन नावाच्या गुलामाला वझीर बनवलं. त्याउलट ज्या शिपायांनी कुतुबुद्दीन खिलजीला तुरुंगातून सोडवलं होतं, त्यांनी सुलतानाकडे बक्षिशी मागितली, तेव्हा त्यांची डोकी उडवली. त्यामुळे नोकरवर्ग नाराज झाला.

त्याच काळात गुजरातमध्ये बंडाळी माजली होती, तिथे आपल्या सेनापतीला पाठवून बंडाळी मोडून काढली आणि आपल्या सासऱ्याला, झफरखानाला, तिथला सुभेदार बनवलं. काही काळानंतर झफरखानाला ठारही केलं. त्यामागचं कारण कधी बाहेर आलंच नाही. दुसरीकडे देवगिरीच्या यादवांनी आपलं राज्य स्वतंत्र म्हणून घोषित केलं. अल्लाउद्दीनच्या शेवटच्या काळात दिल्ली सोडतांना काफूरने तिथे मुलतानीला ठेवलं. पण कुतुबुद्दीन खिलजीने मुलतानीला गुजरातची बंडाळी मोडायला पाठवल्यावर देवगिरीवर सुलतानाकडून कोणीच अधिकारी देवगिरीवर राहिला नव्हता. ती संधी भिल्लाणा या राजघराण्यातील जावयाने घेतली. कुतुबुद्दीनला ही बातमी कळल्यावर देवगिरी परत जिंकून घेण्यासाठी त्याने स्वतःच ही मोहीम आपल्याकडे घेतली. आणि तो देवगिरीवर प्रचंड फौज घेऊन आला.

त्याची फौज आल्याबरोबर तिथले जमीनदार, व्यापारी, सर्व त्याला शरण गेले. फक्त हरपलदेव आणि राघव यांनी त्याला विरोध केला. खुस्रोखां आणि अलिक तुघलक या दोघांनी त्यांचा पाठलाग करून त्यांची फौज मारून काढली. हरपलदेव पकडला गेला. कुतुबुद्दीन खिलजीच्या समोर आणल्यावर त्याने हरपालदेवचं शीर उडवलं आणि देवगिरीच्या वेशीवर त्याचं धड लटकावलं. देवगिरीच्या राजघराण्याचा असा अंत करून त्याने आपला याकलीख नावाचा अधिकारी तिथे नेमला. कारभाराची व्यवस्था लावून तो वेरूळला तळ करून राहिला. आपल्या सेनापतीला, खुस्रोखानाला आणि मलिक तुघलकला वारंगळला पाठवलं. त्या राज्याच्या प्रतापरुद्र राजाने खानदानी पाठवणं बंद केलं होतं. सुलतानाची फौज आल्यावर त्याने तहाची बोलणी केली, खंडणी भरली आणि पुढे नियमित खंडणी देण्याचं मान्य केलं, तो सारा खजिना घेऊन सेनापती वेरूळला आला. मग सुलतान कुतुबुद्दीन दिल्लीला परतला.

कुतुबुद्दीन खिलजीचा जनानखाना मोठा होता, शिवाय अल्लाउद्दिन खिलजीसारखाच तोही उभयलिंगी होता. अल्लाउद्दिन खिलजीचा आणि मलिक काफूरचा जो संबंध होता तसंच याचंही होतं. आयन उल्मुल्क मुलतानीने माळव्याच्या स्वारीच्या वेळी जे पुरुष गुलाम म्हणून पकडून आणले होते त्यात हसन आणि हसमुद्दिन हे दोन मुलगे पकडले होते. कुतुबुद्दीनने यांच्याशी शरीर संबंध ठेवले होते. हा हसन म्हणजेच खुस्रोखान. यालाच कुतुबुद्दीन याने वझीरही नेमून टाकलं होतं. हसमुद्दिन गुजरातचा सुभेदार झाला. गुजराथमधील लोकांनी त्याला पकडून साखळदंडात दिल्लीला पाठवलं तेव्हा कुतुबुद्दीन खिलजीने त्याला आणखी मोठ्या अधिकारावर नेमलं. दिवसेंदिवस सुलतान खुस्रोखानच्या ताब्यात जायला लागला. खुस्रोखान सुलतानाच्या वधाचा कट करतोय, हे सुलतानाला सांगण्यात आलं, पण त्याचा त्यावर विश्वास बसला नाही.



खुस्रोखान.

२६ एप्रिल १३२० यादिवशी खुस्रोखानचा कट यशस्वी झाला. त्यादिवशी रात्री कुतुबुद्दीन सुलतानाच्या महालात खुस्रोखान स्वत: बसला होता. तेवढ्यात सुलतानाला काहीतरी गलका ऐकू आला. हा कसला गलका असं सुलतानाने विचारल्यावर काही घोडे मोकळे झाले आहेत, त्यांना पकडण्याचा हा आवाज आहे असं खुस्रोखान म्हणाला. पाठोपाठ त्याचे लोक महालात शिरले. सुलतान जनानखान्याकडे धावला. पण खुस्रोने त्याचे केस पकडून त्याला खाली पाडलं. मारेकऱ्यांनी वार केला आणि लगेच खुस्रोखानने सुलतान म्हणून स्वत:ला घोषित केलं. नसरुद्दिन खुस्रो अशी उपाधी स्वत:ला घेतली.

अल्लाउद्दिन खिलजी हा त्याकाळातील संत हजरत निजामुद्दीन औलियाचा मोठा भक्त होता. कुतुबुद्दीन खिलजीचा या संतावर विश्वास नव्हता. सुलतान बनल्यावर त्याने अनेक वेळा हजरत निजामुद्दीन यांना दिल्ली बाहेर घालवायचा प्रयत्न केला, पण दरवेळी तो अपयशी ठरला. एकदा मात्र हजरत निजामुद्दीन यांना आपल्या दरबारात सलाम करायला बोलावलं. पण मी कुणाच्या दरबारात जात नाही असं म्हणून हजरातांनी कुतुबुद्दीन खिलजीची आज्ञा अव्हेरली. रागावलेल्या सुलतानाने त्यांना निरोप पाठवला की तुम्ही आला नाहीत तर तलवारीच्या जोरावर तुम्हाला दरबारात आणलं जाईल. पण त्याच दिवशी खुस्रोखानने सुलतानाचा खून केला आणि खिलजी घराण्याचा अंत केला.

जून १२२० या दिवशी खिलजी घराण्याचा शेवट झाला. ४ वर्षे कुतुबुद्दीन खिलजीने कारभार केला.

आता सत्ता खुसरोखानच्या हातात गेली. हा मूळचा गुजराथी हिंदू होता. खुस्रोखानने कारभार सांभाळून ४ महिनेच झाले होते की, मुलतानचा सुभेदार गाजी मलिक दिल्लीतील या अंदाधुंदीचा फायदा घ्यायला दिल्लीवर चालून आला. घमासान युध्द झालं, त्यात खुस्रोखान जीव घेऊन पळाला आणि तिलपत इथे साधूचा वेष धारण बागेत लपून राहिला. आख्यायिका सांगते की लपून राहिलेल्या खुस्रोखानाला जेव्हा भूक लागली, तेव्हा त्याने आपली बहुमोल अंगठी विकून

काहीतरी खायला आणायला बागेच्या माळ्याला सांगितलं. माळी दुकानात खायचे पदार्थ आणायला गेला आणि त्याने ती अंगठी पुढे केली तेव्हा ती रत्नजडीत अंगठी पाहून हा कुणीतरी मोठा माणूस आहे, हे कळल्यावर जमलेल्या लोकांनी खुस्रोखानला पकडून दरबारात पाठवलं. नवीन सुलतानाने, घीयासुद्दिन तुघलकाने तुझाशी काय न्याय करू असं विचारलं, तेव्हा खुस्रोखान म्हणाला, माझंही तेच उत्तर, जे पोरसने सिकंदरला दिलं होतं. सुलतान त्यावर विचारच करत होता, तेवढ्यात सुलतानाच्या मुलानेच खुस्रोखानाचा दरबारातच वध करून टाकला.

गाजी मलिकने घीयासुद्दिन तुघलक ही उपाधी स्वतःला घेतली व तो सुलतान बनला.

दिल्लीत सत्तांतर झालं. नवीन घराणं सत्तेत आलं.

दिल्लीत आता तुघलक राजसत्तेचा उदय झाला.

# घियासुद्दीन तुघलक
# मृत्यू फेब्रुवारी १३२५.

अल्लाउद्दिन खिलजीचा अंत झाला. त्याचा कमकुवत मुलगा मुबारकशहा सुलतान बनला. पण त्याच्या कारभारावरून असंतोष पसरला तेव्हा वजीर खुस्रोखान याने सत्ता हाती घेतली. राज्यात गोंधळ मजला. तोही दरबारातील अमीर आणि उमरावांना आवडला नाही. तेव्हा वजीर खुस्रोखानही अस्तंगत झाला आणि दरबारी लोकांनी गाझी मलिक तुघलकच्या मस्तकावर राज मुकुट ठेवला. सुरवातीला गाझी उर्फ घीयासुद्दिन याने सुलतान पद स्वीकारायला खळखळ केली पण जेव्हा दरबारी लोकांनी तू सुलतान झाला नाहीस तर तुझ्या मुलाला आम्ही सिंहासनावर बसवू अशी ताकीद दिली, तेव्हा घीयासुद्दिन सुलतान बनला. अशारितीने या नवीन तुर्क तरुणाने दिल्ली सल्तनत मिळवली.

८ सप्टेंबर इ. स. १३२१ साली तो गादीवर आला.

गादीवर आल्यावर सर्व महत्वाच्या खात्यांवर त्याने आपली विश्वासू माणसं नेमली. आपल्या मोठ्या मुलाला फक्रुद्दिनला उलगखान हा किताब दिला.. बाकी चार मुलांना बेहेराम, झफर, महंमद, आणि नसरत खान असे किताब दिले.

तुघलक हे त्याचं स्वत:चं नाव होतं. त्याच्या घराण्याचं, किंवा गावाचं, किंवा समाजाचं नव्हे. त्याच्या पूर्वेतीहासाबद्दल खात्रीलायक बातमी नाही. त्याची आई जाट होती असा उल्लेख सापडतो. तो तुर्कस्तान आणि सिंधमधील डोंगराळ प्रदेशातून तरुण वयात नोकरीच्या शोधात तो कधीतरी भारतात आला. सुलतान अल्लाउद्दिन खिलजीच्या लष्करात भरती झाला. अमीर खुसरोने आपल्या "तुघलकनामा " पुस्तकात त्याचा उल्लेख " आवारा मर्द " म्हणजे साधारण तरुण असा केला आहे.

त्याच्या पराक्रमाकडे अल्लाउद्दिनचं लक्ष गेलं ते रणथंबोरच्या लढाईच्या वेळी. अल्लाउद्दिन खिलजीचा भाऊ उलगखान याच्या हाताखाली तो रणथंबोरच्या लढाईत सामील झाला होता. त्यावेळी त्याने आपल्या पराक्रमाने खिलजीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर गियासुद्दीनचा प्रवास भरभराटीकडे सुरू झाला. सुलतानाचा विश्वास आपल्या कर्तबगारीवर मिळवल्यामुळे घीयासुद्दीन तुघलक लौकरच मुलतानचा सुभेदार आणि नंतर दीपालपुरचा सुभेदार बनला. मुलतानच्या सरहद्दीवर सतत होणारा मंगोल लोकांचा हल्ला रोखण्यात तो कमालीचा यशस्वी झाला.

घीयासुद्दिन सुलतान बनला तेव्हा कारभारात प्रचंड गोंधळ माजला होता. अल्लाउद्दिन खिलजीच्या कारकीर्दीतील महसूल पध्दती साफ कोसळली होती. त्यामुळे खजिना रिता झाला होता. खुस्रोखानाच्या वेळी भ्रष्टाचाराने राज्य पोखरलं होतं. घीयासुद्दीनला ते सारं मार्गी लावायचं होतं. राज्याच्या सीमाही खूप लांबपर्यंत विस्तारल्या होत्या. दिल्लीतील राजवट बदल्याबरोबर सिंध, गुजरात, देवगिरी, वारंगळच्या मूळ राजांनी परत बंड उभारून खंडणी द्यायचं बंद केलं. सर्वच ठिकाणी स्वतंत्र होण्याची बंडाळी माजली. घीयासुद्दीनला ते सारं आवरायचं होतं. बंगालमधेही सत्तेवरून दोन भावांमध्ये झगडा सुरु होतं.. ढासळलेल्या परिस्थितीवर घीयासुद्दिन तुघलकाने आपल्या हुशारीवर राज्यात लौकरच काबू मिळवला आणि शांतता आणली.

मग रिकामा झालेला खजिना भरण्यावर त्याने लक्ष केंद्रित केलं. खुस्रोने ज्यांना ज्यांना मोठ्या मोठ्या देणग्या दिल्या होत्या, ज्या लोकांकडून सरकारी पैसा वसूल झाला नव्हता, त्या सर्वांचा पैसा गोळा केल्यामुळे खजिन्यात मोठी भर पडली. इतकाच काय, पण हजरत निजामुद्दीन औलीयाला खुस्रोखान याने ५००० रू. दिले होते, तेही त्याने मागितले. पण हजरत साहेबांनी ते सर्व गरीबांच्यात वाटून टाकले होते, म्हणून तेवढे पैसे मात्र परत आले नाहीत..

आपल्या राज्याचा गदा सुरळीत चालवा म्हणून त्याने, परगणा अधिकारी, तालुका अधिकारी आणि शेतकरी या ३ पातळ्यांवर लक्ष केंद्रित करून त्यात सुधारणा आणल्या. अल्लाउद्दिन खिलजीची धोरणं आणि स्वत:चा विचार यामधील मार्ग निवडला. महसूल वाढावा पण शेतकऱ्यांना तो जाचाचा वाटू नये म्हणून प्रयत्न केले. पीकपाणी वाढलं पाहिजे यासाठी प्रयत्न केले.

कारभाराची दुसरी बाजू म्हणजे लष्कर. तो स्वत: सैनिक असल्यामुळे त्याने त्यावर जास्त मन घातलं. त्यामागे सैन्याला खूष ठेवणं हा त्याचा मूळ हेतू होता. त्यांचा पगार आणि भत्ते वाढवले. घोड्यांची निगराणी, त्यांची मोजणी यावर भर दिलं. त्यामुळे लष्करात खूप सुधारणा झाल्या आणि बलवान झालं.

त्याने न्यायव्यवस्थासुद्धा सुधारली. डाक सुधारणा केल्या आणि पत्रं लवकर पोचाण्यावर लक्ष केंद्रित केलं.

त्यानंतर त्याने आपलं लक्ष दूरवरच्या मांडलिकांकडे वळवलं. पहिलं लक्ष्य होतं वारंगळ. तेलंगणाच्या राय प्रतापरुद्रने खंडणी देणं बंद केलं होतं म्हणून त्याच्यावर आपला मुलगा उलगखान याला फौज देऊन पाठवलं. इ. स. १३२१ मध्ये उलग खान फौज घेऊन वारंगळ येथे पोचला. दक्षिणेच्या वाटेवर देवगिरीला त्याने मुक्काम केला. प्रचंड फौजेचा वेढा वारंगळ किल्ल्याभोवती पडला. हा वेढा ६ महिने चालला. किल्ल्यातील अन्नधान्याचा साठा संपत आला आणि बाहेरून येणारी रसदही थांबली तेव्हा रुद्रप्रतापने बोलणी सुरु केली आणि खंडणी देण्याचं मान्य केलं. पण उलगखान एवढ्यावर संतुष्ट झाला नाही. त्याला वारंगळ राज्य जिंकूनच घ्यायचं होतं. म्हणून उलगखान तहाला तयार होईना. पण तोपर्यंत एवढ्या दूरवर आलेल्या आणि महिनोंमहिने चालेल्या वेढ्यामुळे मुळे फौज कंटाळली आणि दिल्लीला परत जायची भाषा करू लागली होती.

तेवढ्यात काही बंडखोर सेनाधिकार्यांनी दिल्लीत राजसत्ता उलटली असल्याची बातमी पसरवली. तेव्हा उलगखानला दिल्लीकडे जाण्याचा पर्याय

उरला नाही. त्यामुळे सर्वांनी दिल्लीकडे कूच केलं. वाटेत देवगिरीला थांबल्यावर ती अफवा असल्याची खरी बातमी बाहेर आली. बंड करणाऱ्या सेनाधिकार्यांना ठार मारण्यात आलं. महंमद हा घीयासुद्दिनचा दुसरा मुलगा तेव्हा देवगिरी सुभा सांभाळत होता. तिथून परत फौज वारंगळ जिंकण्यासाठी दक्षिणेला निघाली. परत वारंगळ किल्ल्याभोवती 5 महिने वेढा चालला. परत किल्ल्यातील अन्न साठ संपला त्यामुळे राय रुद्रप्रताप उलगखानला शरण गेला. त्याचं राज्य दिल्ली सल्तनतीला जोडलं गेलं. राजाला कैद करून दिल्लीला नेत असतांना रुद्रप्रताप वाटेत मरण पावला.

दिल्लीच्या वाटेवर असतांना उलगखान ओरिसाच्या स्वारीवर गेला आणि रुद्रप्रतापला मदत करणाऱ्या राजाचा पराभव करून राजमहेंद्री आणि जयनगर हे प्रदेश जिंकून दिल्लीला आला. धियासुद्दिनने खूष होऊन त्याचा सत्कार केला आणि मिळालेल्या विजयाचा उत्सव साजरा केला.

पाठोपाठ मंगोल हल्ला झाल्याची बातमी दिल्लीत येऊन पोचली. सामानच्या गुर्हशस्प या सुभेदाराच्या मदतीसाठी फौज पाठवली गेली. ती फौज यशस्वी होऊन परतली. यानंतरची मोहीम गुजराथमध्ये झाली. सुलतान घीयासुद्दिन याने आपला नायब वजीर मलिक शादी याला गुजराथ जिंकण्यासाठी पाठवलं. पण मलिकचा खून झाला आणि फौज पराभूत होऊन परतली.

घियासुद्दिन तुघलकाची त्यानंतरची स्वारी बंगालवर झाली. सुलतान बलबन याचे तीन नातू, बुघराखान याचे ३ मुलगे यांच्यात वारसा हक्कावरून भांडण लागलं होतं. त्यांनी आपल्या मदतीसाठी घीयासुद्दिन तुघलकाची मदत मागितली. बंगाल काबीज करायची ही मोठी संधी घीयासुद्दिन सुलतानाला मिळाली. म्हणून तो बंगालकडे निघाला. दिल्ली सोडताना घीयासुद्दिन राज्याची व्यवस्था लावून निघाला. आपला वारस म्हणून आपला पुत्र महंमद तुघलक याला त्याने वारस म्हणून जाहीर केलं होतं.

बंगालच्या स्वारीत सुलतानाला मोठा विजय मिळाला. परतीच्या मार्गावर तीर् हटचा प्रदेश जिंकला. दिल्लीकडे परतत असतांना सुलतानाने दिल्लीजवळील तुघलकाबादजवळील अफगाणपूरला मुक्काम करायचं ठरवलं. दिल्लीत प्रवेश करण्यासाठी मुहूर्त चांगला मिळेपर्यंत सुलतानाच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली. सुलतान आपल्या शामियानात विश्रांतीसाठी आला. सर्वांना जेवण देण्यात आलं. त्याच्याबरोबरचे इतर सरदार जेवण झाल्यावर हात धुवायला बाहेर आले तेव्हा अचानक मोठा गडगडाट झाला. ढग भरून आले आणि अचानक वीज पडली. त्या वीजेच्या लोळात सुलतान आणि त्याचा शामियाना जाळून खाक झाला. हात धुवायला बाहेर उभे असलेले सरदारही ठार झाले. याबद्दल इतिहासकारांना शंका आहे. ती म्हणजे गियासुद्दिन तुघलक जानेवारी महिन्यात बंगाल स्वारीवरून परत आला. तेव्हा पाऊस-वादळ-वीज कोसळणं हे अशक्य होतं.

सुलतान घियासुद्दिनची राजवट अचानक संपली. घियासुद्दिनच्या मृत्यूबद्दल आणखी एक प्रवाद आहे. तो म्हणजे त्याचा वारस मुलगा महंमद तुघलक याने घाईघाईने शामियाना उभारला तो लाकडाचा होता. सुलतानाने विश्रांती आणि करमणुकीसाठी हत्तीची झुंज लावण्याचा हुकूम सोडला. त्या झुंजीत हत्तीच्या हालचालींच्या हादरयामुळे शामियाना कोसळला आणि सुलतान ठार झाला. त्याबद्दल महंमद तुघलकाला दोषी मानलं गेलं आहे. कारण सुलतान बंगाल मोहिमेवर असतांना त्याच्या कानावर महंमद तुघलकाबद्दल तक्रारी येत होत्या. म्हणून सुलतान नाराज होता. पण त्याबद्दलही इतिहासकारांना खात्री वाटत नाही..

घीयासुद्दिन सत्तेत असतांना दिल्लीतील फार मोठा सुफी संत हजरत निजामुद्दीन औलिया याला सुलतान फार त्रास देत होता. अल्लाउद्दिन खिलजी, खुस्रोखान यांचा  या हजरत निजामुद्दीन औलीयावर गाढ विश्वास होता. दिल्लीतील मोठे मोठे दरबारी, व्यापारी, हजरत साहेबांचे भक्त होते. तख्तनशीन झाल्याबरोबर हजरत साहेबांकडे तुघलक सुलतानाने खुस्रोखान या आधीच्या सुलतानाने दिलेले पैसे परत मागितले. पण निजामुद्दीन औलीयाने ते गरिबांना वाटून टाकले होते. मग

तुघलकाने नवीन फतवा काढून हजरत निजामुद्दीन साहेबांना दरबारात दर्शनासाठी बोलावलं. हजरतसाहेबांनी मी कुणाच्या दरबारी जात नाही असं उलट निरोप सुलतानाला पाठवला. त्यामुळे सुलतानाचा रोष वाढत गेला. मग पुढची चाल सुलतान खेळला. ती म्हणजे दर्ग्यात चालणारं भक्तीसंगीत बंद करण्याचा हुकूम दिला. तोही हजरत साहेबांनी ऐकला नाही. शेवटी गियासुद्दीन तुघलकाने हजरत साहेबांना दिल्ली सोडून जाण्याबद्दल सारखी फर्मानं देत राहिला. बंगालच्या स्वारीवर जातांनाही त्याने हजरत निजामुद्दीनला मी परत येण्यापूर्वी दिल्ली सोडून जाण्याचा हुकूम दिला होता.. दरवेळी हजरत साहेब “ हनोज दिल्ली दुरस्त ” म्हणजे अब दिल्ली दूर है असा निरोप पाठवत. शेवटी बंगाल मोहिमेवरून परत येऊन दिल्लीजवळ पोचल्यावर यमुनेच्या तीरावरून शेवटचा निरोप सुलतानाने हजरत साहेबांना पाठवला, तेव्हाही हजरत साहेब “ दिल्ली अब दूर है ” म्हणाले. आणि खरंच सुलतान दिल्लीला पोचण्यापूर्वीच ठार झाला.

गियासुद्दिन सुलतानाची राजवट अवघी ५ वर्षांची झाली. ८ सप्टेंबर १३२१ ला



सुलतान बनलेला घीयासुद्दिन तुघलक फेब्रुवारी १३२५ ला काळाच्या पडद्यामागे निघून गेला.

त्यानंतर त्याचा मुलगा महंमद तुघलकाने तख्त संभाळलं.

# महंमद बिन तुघलक.

# इ. स. १३०० – २० मार्च १३५१.

गियासुद्दीन तुघलकाने आपला वारस आधीच घोषित करून ठेवला असल्याने गियासुद्दीन सुलतानाच्या अचानक मृत्युनंतर महंमद तुघलक सुलतान बनला. गियासुद्दीन सुलतान असेपर्यंत महंमद तुघलकाबाद मध्ये रहात असे. सिंहासनावर बसण्यासाठी तो दिल्लीत आला तेव्हा मोठ्या भव्य मिरवणुकीने त्याने राजधानीत प्रवेश केला. दिल्ली फुलांनी पताकांनी सजवली होती. सोन्याचांदीची नाणी जनतेवर उधळली जात होती. मिरवणूक बघायला आलेली प्रजा खिसे भरभरून नाणी गोळा करत होती. त्याच्या आईबद्दल अशी आख्यायिका आहे की राजधानीत शिरल्यावर राजमाता म्हणून ती सोन्याच्या, रत्नं जडवलेल्या, सिंहासनावर बसली. सरदारांच्या, अमिरांच्या स्त्रिया तिला मुजरा करायला आल्या आणि तिथेच अचानक तिला अंधत्व आलं. नागरिकांनी सुलतानाचं मनापासून स्वागत केलं. सिंहासनावर बसेपर्यंत महंमद तुघलक जौना या हिंदू नावाने ओळखला जात होता. कारण त्याची आई हिंदू होती.



Muhammad Bin Tuglaq

त्याची कारकीर्द इतिहासात खूप गाजली. अत्यंत बुद्धिमान सुलतान अशी त्याची इतिहासकारांनी नोंद केली आहे. धर्मशास्त्राचा त्याचा मोठा अभ्यास होता. तत्त्वज्ञानही त्याच्या व्यासंगाचा भाग होता. धर्मपंडितांशी त्याच्या नेहमी चर्चा होत, त्यात हिंदू धर्मपंडितही असत. रोज सकाळी तत्वज्ञान या विषयावर त्याची विद्वानांशी चर्चा घडे. दिल्लीच्या होळीच्या सणात तो भाग घेत

असे. गिरनारच्या शत्रुंजय मंदिराला भेट देणारा आणि पुरोहितांच्या सांगण्याप्रमाणे पूजाअर्चा करणारा तो पहिला सुलतान असावा. इतिहासकार बर्नी याने त्याच्या दोन रूपांचं वर्णन केलं आहे. एकात तो म्हणतो की महंमद तुघलक अतिशय देखणा, उमदा, बुद्धिमान, चतुर, दूरदर्शी, पक्का मुसलमान सुलतान होता. पण त्याला इतर धर्माबद्दल आस्था आणि कुतूहल होतं. भातियागढला त्याने गोमातेचं मंदिरही बांधलं. जैन मुनी प्रभा सुरी यांना रात्रभर आपल्याबरोबर ठेऊन घेतलं आणि त्यांच्याकडून जैन धर्म जाणून घेतला. त्यांच्यावर सुलतान एवढं खूष झाला की त्यांना १००० गाई, कांबळी, उदबत्त्या, कपूर चंदन अशी पूजा सामग्री द्यायचं ठरवलं पण मुनींनी ते विनम्रपणे नाकारलं. हिंदू प्रथेप्रमाणे तो रोज त्याच्या आईच्या पाया पडायचा ते मौलवींना आवडायचं नाही. त्याने ज्वालादेवी मंदिरात देवीला चांदीचं छत्र दिलं होतं तेही धर्मपंडिताना आवडलं नाही.

त्याला काव्य-साहित्य, वैद्यक शास्त्राचीही आवड होती. त्याच्या त्या अभ्यासामुळे अनेकांना तो उपचार सांगायचा. त्याच्या या व्यासंगामुळे आणि हुशारीमुळे त्याचे निर्णय रुळलेले मार्ग सोडून वेगळेच असत. सुलतान होऊन कारभार करायला लागल्यावर त्याने एक नवा आदिलाबाद नावाचा किल्ला आणि हजार स्तंभ असलेला मोठा महाल बनवला. त्याचं नाव कसर –ए- हजार सितून होतं.

त्याच्या दरबारात अनेक परदेशी येत. त्यांना तो भरभरून मौल्यवान वस्तू देत असे. त्याच्याकडे एक नामांकित बगदादी अमीर आला. महंमद तुघलक सुलतान त्याच्यावर खूप खूष झाला. तो मीर, बगदादला जाण्यापूर्वी खरेदीला बाजारात गेला आहे हे कळल्यावर सुलतानाने हुकूम दिला की त्याची खरेदी संपेपर्यंत इतर सर्वांची खरेदी थांबवली जावी.. तो इतका दानशूर होता की अनेक प्रवासी त्याच्या भेटीला येऊन काहींना काही बक्षिशी घेऊन जात. अगदी साधू गोसावींनाही भरपूर दान मिळत असे. त्याच्या दानावर रोज ४०,००० गरिबांना अन्नदान होत असे.

त्याचा बुद्धिमत्तेवर विश्वास होता. नीच कुळातील लोकांमध्येही हुशारी असते यावर त्याचा विश्वास होता. म्हणूनच माळी, गुलाम, आचारी, न्हावी, कुळातील हुशार मुलांना त्याने त्यांची हुशारी पारखून मोठ्या मोठ्या हुद्द्यावर नेमलं. नुसत्या मुसलमान नागरिकांना त्याने मोठ्या हुद्द्यांवर घेतलं नाही तर हिंदू प्रजेतील हुशार लोकांनाही मोठ्या नोकऱ्या दिल्या. दोन्ही धर्मातील लेखक, कवी, विद्वानांचा सन्मान ठेवला. त्याच्या या निर्णयामुळे जनता नाराज होई आणि जनता नाराज म्हणून हा सुलतानही नाराज होई. त्यामुळे राजा आणि प्रजा यांच्यातील समन्वय कधी साधलाच गेला नाही. आपल्या कारकीर्दीत राजधानी दिल्लीहून देवगिरीला हलवणं आणि तांब्याची नाणी चलनात आणणं हे त्याचे निर्णय अजूनही लोकांच्या स्मरणात आहेत.. मात्र २६ वर्षांचा त्याचा कारभार सतत बंडाळीचा सामना करण्यात गेला.

सत्तेत आल्यावर दक्षिण आणि उत्तर भारत हे विभाजन त्याला मंजूरच नव्हतं. आधीच्या सुलतानांच्या पराक्रमामुळे तो गादीवर येईपर्यंत त्याच्या राज्याच्या सीमा मुलतानपासून वारंगळपर्यंत आणि गुजरातपासून बंगालपर्यंत पसरल्या होत्या. त्यामुळे साम्राज्य सांभाळण्याचे त्याचे विचार काही वेगळेच चालत. अखंड भारताची संकल्पना प्रत्यक्षात आणणारा तो पहिला राज्यकर्ता असावा. त्याच्या काळात मंगोल देशातही कमकुवत वारस गादीवर आला होता. त्यामुळे त्या देशाकडून स्वारीचा धोका कमी झाला होता. याच्या काळात बाह्य देशातील प्रमुखांशीही त्याने संबंध सुधारले. चीन, इराक, इराण, सिरिया, या देशातील सुलतानांनी आपापले राजदूत मोठे मोठे नजराणे देऊन दिल्लीला पाठवले. महंमद तुघलकानेही आपला खासगी सचिव बिघादान याला इराकच्या सुलतान सैदच्या भेटीला पाठवलं.

महंमद तुघलकाच्या स्वारी आणि मोहिमा याबद्दल सांगायचं तर त्याने कोंडाण्यावर हल्ला केला. नाग नायक नावाचा किल्लेदार कोंडाणा किल्ला सांभाळत होता. ६ महिन्यांच्या वेढ्यानंतर नाग नायक शरण गेला आणि कोंडाणा ( सिंहगड ) तुघलकाला मिळाला. त्यानंतर देवगिरीवर विश्रांती घेत असतांना

असतांना त्याला बेहराम ऐबा किशलूखानच्या मुलतानमधील बंडाळीची बातमी मिळाली. तेव्हा लांब लांब मजला मारत तो दिल्लीला पोचला. तिथे पोचल्यावर त्याने एक मोठा शामियाना उभारला. गावातील सर्वांना बोलावलं आणि त्यांना उद्देशून एक भाषण केलं. नंतर किशलूखानला भेटीला बोलावलं. पण तो आला नाही. मग तुघलक त्याच्यावर चालून गेला. अबुहार जवळ दोन्ही सैन्याची गाठ पडली. सुलतानाने आपल्या शामियानात इमादुद्दीनला झोपवलं आणि स्वतः दूर लपून राहिला. बेहराम ऐबाने तुघलक समजून इमादुद्दीनला ठार केलं आणि आपल्या तालावर जाऊन तो आराम करू लागला. तेव्हा तुघलकाने त्याच्यावर अकस्मात हल्ला करून ठार केलं.

त्याच वेळी घीयासुद्दिन बहादूर उर्फ बुरा याने बंडाळी केली. या बहादुरला घीयासुद्दिन तुघलकाच्या काळात तुरुंगात डांबण्यात आलेलं होतं. महंमद तुघलकाने सुलतान बनल्यावर त्याला मोकळं केलं आणि त्याला आणि त्याच्या भावाला लखनौती म्हणजे बंगाल आणि सोनारगडचे सुभेदार बनवलं. सुलतानाने बहादुरला आपल्या मुलाला दिल्लीला पाठवायला सांगितलं. पण बहादुरने आपला मुलगा आपलं ऐकत नाही असं सांगून मुलाला पाठवलं नाही. सुलतान महंमद तुघलक दीपालपूरवर असतांना त्याला बातमी मिळाली की बुराने बंडाळी केली आहे. तेव्हा सुलतानाने त्याच्यावर स्वारी केली. त्याचा पराभव केला. बुरा उर्फ बहादूर पळून गेला. दुर्दैवाने नदीच्या चिखलात त्याचा घोडा अडकला. तेव्हा तुघलकाच्या फौजेने दोन्ही भावांना पकडून त्याच्या शरीरात पेंढा भरून उंचावर टांगलं. करवंटीच्या दोन वाट्या जशा चिकटतात तशी त्यांची प्रेतं अडकवली होती. सुलतानाने मग विजयोत्सव दिपालपुरात साजरा केला.


यानंतर लगेचच महंमद तुघलकाने देवगिरी आपली राजधानी करायचं ठरवलं. त्याच मुख्य कारण म्हणजे त्याच्या उत्तर-दक्षिण-पूर्व-पश्चिम पर्यंत पसरलेल्या साम्राज्याचा भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती केंद्र देवगिरीत मोडत होतं. दक्षिण भारतावर लक्ष ठेवण्यासाठी भक्कम बळकट देवगिरी योग्य ठिकाण होतं.

त्याच्या सल्लागार मंडळाने उज्जैनला राजधानी करावं असं सुचवलं पण महंमद बिन तुघलक देवगिरीच्या प्रेमात पडला होता. आणि शेवटी ३/4 वर्षांच्या विचारानंतर दिल्ली सोडून देवगिरीला राजधानी हलवण्याचा निर्णय निश्चित झाला.

एकदा राजधानी दौलताबाद-देवगिरीला हलवणं निश्चित झाल्यावर सुलतानाने दर दोन कोसांवर प्रजेच्या प्रवासातील मुक्कामातील सुखासाठी सराया – धर्मशाळा बांधल्या. त्या मार्गावर वाटेत झाडं लावली. जे नागरिक घर सोडून स्थलांतरित होणार होते, त्यांची घरं खजिन्यातील पैशातून विकत घेतली. आणि त्यांच्यासाठी देवगिरीला नवीन वसाहत तयार केली. घरांमधून हे लोक स्थिरावेपर्यंत मोफत अन्नछत्रे चालवली. आपल्या कुटुंबातीलही सर्व नातेवाईकांना तिथे नेलं. तरीसुद्धा पिढ्यान पिढ्या दिल्लीत राहणारे नागरिक आपला गाव, शेतीवाडी, उद्योग सोडून जायला नाराज झाले. केवळ सुलतानी हुकूमामुळे ते गेले. हा प्रवास उन्हाळ्यात झाला. त्या उष्णतेच्या त्रासामुळे अनेक प्रवासी वाटेतच मरण पावले. पण दिल्ली पूर्णपणे रिकामी झाली नाही जैन आणि हिंदू लोकांनी शहर सोडलं नाही. देवगिरी म्हणजे दौलताबाद नव्हे. दौलताबाद हे नाव नव्याने वसवलेल्या कुतुबाबाद या शहराला दिलं गेलं. देवगिरी आणि दिल्ली ह्या दोन राजधान्या महंमद तुघलकाने आपल्या कारभारासाठी निर्माण केल्या होत्या असं त्याच्या नाण्यांवर कोरलेल्या शब्दांवरून दिसतं कारण त्याच्या काळातील नाण्यांवर तख्त-इ-देल्ही आणि तख्त-इ दौलताबाद असं लिहिलेलं आहे.

महंमद बिन तुघलकाचा दुसरा विक्षिप्त निर्णय म्हणजे तांब्याच्या नाण्यांचं चलन सुरु करणं. चांदीच्या नाण्याला टांका ( त्यावरूनच टांकसाळ शब्द आला. ) आणि तांब्याच्या नाण्याला जीतल असं म्हटलं जायचं. सैन्यावरचा खर्च आणि सुलतानाचा दानशूरपणा यामुळे खजिन्यावर ताण पडला, आणि आणि चांदी धातूचा तुटवडा निर्माण  झाला. तेव्हा जीतल नाणी चलनात आणण्याचा निर्णय महंमद तुघलकाने घेतला.

ही जीतल नाण्याची टांकसाळ घरोघर सुरु झाली. कारण नाणी पाडण्यावर वजन, आकार, धातूप्रमाणे याबाबत काटेकोर नियम नव्हते. विशेष यंत्रसामग्री वापरण्याचं बंधनही नव्हतं. त्यामुळे बनावट नाणी बाजारात आली. या नाण्यांचा वापर सुरु झाल्यावर लोकांनी चांदी साठवायला सुरुवात केली. समाज कंटकांनी त्या चांदीच्या वापरातून युद्धसामग्री विकत घ्यायला सुरुवात केली. सरकारी व्यवहार याच नाण्यात सुरु झाले. परदेशी आयात व्यापार थांबला. त्याचा परिणाम परत चक्राकार गतीने खजिन्यावर पडला. शेवटी हा प्रयोग फसला हे लक्षात आल्यावर सुलतानाला बनावट नाणी गोळा करून वितळवण्याचा उद्योग सुरु करावा लागला. या सर्वामुळे सुलतानाला आपली चूक कळून आली. त्याने परत चांदीची नाणी पाडायला सुरुवात केली.



तुघलकाची नाणी आणि देवगिरीचा किल्ला

सुलतान महंमद बिन तुघलकाला दुष्काळ आणि प्लेग या दोन संकटांचा मोठा सामना करावा लागला. तो मलबार मोहिमेवर निघाला. बिदरला पोचला. तिथे असताना प्लेगची साथ सैन्यात जोरात पसरली. अनेक सैनिक मरण पावले. स्वतः सुलतानालाही प्लेगची लागण झाली. पण तो वाचला. एवढं मोठं संकट आल्यामुळे सुलतानाने ती मोहीम सोडून दिली आणि आपल्या सरदारावर सोपवली. तो देवगिरीकडे निघाला. या काळातील दुष्काळामुळे आणि प्लेगमुळे त्याने देवगिरीत स्थलांतरित झालेल्या आपल्या प्रजेला दिल्लीला परत जायची परवानगी दिली. काहीजण परत गेले आणि काही तिथेच राहिले.

महमंद बिन तुघलकाची पुढील वर्षे अनेक बंडाळ्या मोडण्यात गेली. त्यातील पहिला विरोध झाला तो बंगालमध्ये. बहरामखान या त्याच्या सावत्र भावाचा अंत झाल्यावर त्याच्या शिकलगाराने, महंमद फक्रुद्दीन याने बंडाचा झेंडा उभारला. पण या लढाईत सुलतानाच्या हातून बंगाल निसटला. दक्षिण भारतात १३३६ मध्ये हरिहर आणि बुक्क यांनी विजयनगर साम्राज्याचा पाया घातला. वारंगळ सुलतानाच्या हाताखालून गेलं. काम्पिला हातातून निसटलं. मसूदखान या त्याच्या सावत्र भावानेही सुलातानाविरुध्ह बंड केलं. या मसूदखानची आई अल्लाउद्दिन खिलजीची मुलगी होती. सुलतान महंमद तुघलकाने त्याच्या आईला तिच्या गुन्ह्याची शिक्षा म्हणून दगडाने ठेचून ठार केलं होतं. मासूद्खानने तो राग मनात ठेवून बंड केलं, पण सुलतानाने त्याला ठार केलं आणि त्याच शव ३ दिवस तसंच उघड्यावर पडू दिलं. पाठोपाठ शेतकऱ्यांच्या बंडाने आवाज उठवला आणि सारा द्यायचं नाकारलं तेव्हा सुलतानाने त्यांच्या नेत्याला पकडून ठार केलं. इ. स. १३३८ मध्ये हे बंड झालं. काराच्या सुभेदाराने बंड केलं तेही सुलतानाने निपटून काढलं. त्याच शरीर पेंढा भरून दिल्लीला पाठवलं गेलं. तो सुभा मग सुलतानाने आपल्या बहिणीच्या नवऱ्याला सांभाळायला दिला. त्याच्या पुढच्या वर्षी बिदरच्या सुभेदाराने बंड पुकारलं, तेही सुलतानाच्या फौजेने त्याला अटक करून मोडून काढलं.

त्यापुढचा ऐनुल मुल्क्चा विरोध तर सुलतानासाठी फारच त्रासदायक ठरला. खरं तर अवधचा सुभेदार ऐनुल मुल्क हा सुलतानाचा मित्र आणि विश्वासातील कर्तबगार माणूस. पण ऐनुल सुलतानाच्या विरोधात गेला. सुलतानाच्या शिपायांनी त्याला पकडलं. त्याला बैलावर बसवून लाज झाकण्यापुरते कपडे ठेवून त्याची धिंड काढली. हात पाठीमागे बांधलेल्या अवस्थेत त्याला सुलातानासमोर आणलं गेलं. ऐनुलला ज्यांनी मदत केली त्यांना हत्तीच्या पायाखाली चिरडून ठार केलं आणि त्यांचे अवयव ऐनुल मुल्क समोर आणून टाकले. पण ४ दिवसांच्या नंतर सुलतानाने त्याला क्षमा करून त्याला मानाची वस्त्रे दिली आणि परत चाकरीत घेतलं. यावेळी घडलेला एक हृदयस्पर्शी प्रसंग सांगितला जातो.. तो म्हणजे ऐनुल मुल्कला क्षमा केल्यावर दुसरे दिवशी महंमद बिन तुघलकाने दरबार भरवला. सगळे अमीर

उमराव काझी, मुल्ला जमल्यावर त्याने सभेत एक प्रश्न सर्वांना विचारला की एखादं रत्न मातीत पडलेलं दिसलं तर काय करावं? तिथेच पडू द्यावं की उचलावं? सर्वांनी एकमुखाने उत्तर दिलं की ते उचलून घ्यावं. मग ऐनुल मुल्ककडे पाहत त्याने सभेला सांगितलं की ऐनुल हाही असाच एक हिरा आहे.. मातीला मिळत होता, पण मी आता त्याला उचलून घेतो आहे.

मुलतानच्या बंडानंतर सुलतान महंमद बिन तुघलक सततच्या विरोधातून मोकळा झाला. १३४० ते ५२ सालापर्यंत तो या त्रासदायक विरोधाशी झगडत राहिला. त्यानंतरची सुलतानाची एक मोठी चाल म्हणजे सुलतानाला आणि सल्तनतला खलीफाची मान्यता मिळवण्याची जरूर.. ही पद्धत त्याने सुरू केली आणि पार मैसूरच्या टिपू सुलतानपर्यंतच्या सत्ताधीशांनी ती प्रथा पाळली.

महंमद तुघलकाच्या अयशस्वी झालेल्या मोहिमा म्हणजे इराक आणि इराण जिंकायचं त्याचं स्वप्न. मंगोल वंशाचा सुलतान कमजोर होता.. खुरासान जिंकण्यासाठी त्याने प्रचंड मोठी फौज उभारली. वाटेल त्याला फौजेत घेतल्याने ती बाजार बुणग्यांची बनली. त्यासाठी सुलतानाने पैसाही फार ओतला, पण निर्णय लौकर न घेतल्यामुळे  एक वर्षभर फौज रिकामी ठेवली. पण शेवटी ती योजना त्याला रद्द करावी लागली. सुलतान महंमद तुघलकाला चीनवरही स्वारी करायची होती. म्हणून त्याची फौज हिमालयातील कुलू कांगडापर्यंत गेली. पण तिथल्या लोकांच्या विरोधाला सुलतानाची फौज कमी पडली. त्या लोकांनी डोंगराळ वाट बंद केल्याने त्या डोंगराळ प्रदेशात लढाई करणं त्यांना जमलं नाही. सुलतानाचं तेही स्वप्न अपूर्ण राहिलं.

इ. स. १३३६ मध्ये विजयनगर साम्राज्याची स्थापना करून हरिहर-बुक्क यांनी सुलतानाच्या साम्राज्याला छेद दिला. दक्षिण भारत सुलतानाच्या हातून निसटायला लागला. पाठोपाठ इ. स. १३३६ मध्ये वारंगळच्या राजानेही स्वातंत्र्य मिळवलं. सुलतानाच्या राज्याचे तुकडे व्हायला लागले.

इ. स. १३४७ साली तुघलकाच्या कारकीर्दीतील मोठी घटना घडली. दौलताबादेत बंडाळी माजली आहे, हे कळल्यावर सुलतान स्वत: मोठी फौज मदतीला घेऊन तिथे पोचला. बंड मोडून काढलं. अनेकजण ठार झाले, काही पळून गेले. मग सुलतान गुजरात स्वारीवर गेला. बंडखोरांमधला हसन गंगू बहामनी हा बंडखोर मिरजेला पोचला. त्याने तिथे फौज जमवली आणि आपल्या साथीदारांसह लढण्याची तयारी केली.

सुलतान महंमद बिन तुघलकाला दौलताबादेहून बातमी मिळाली की बंडाळी करणाऱ्या आणि लढाईतून पळून गेलेल्या सेनाअधिकाऱ्यांवर पाठवलेल्या इमादुल मुल्क सरताज या सरदाराला ठार करून हसन गंगू या बंडखोराने दौलताबाद जिंकलं आहे आणि स्वत:ला स्वतंत्र सुलतान म्हणून घोषित केलं आहे. ती तारीख होती ३ ऑगस्ट १३४७. बहामनी राज्याची सुरुवात झाली तो हा ऐतिहासिक दिवस. ह्या बातमीने सुलतानाला एवढा मोठा धक्का बसला की त्याच्या छातीत दुखायला लागलं. दोन दिवसांनी तो बरा झाला. बहामनीला हरवणं शक्य नाही हे त्याला कळून चुकलं होतं. दख्खन हातून सुटल्याचं भविष्य त्याने स्वीकारलं.

सुलतानाची शेवटची मोहीम त्याच्या दरबारातील अधिकाऱ्याबरोबर झाली. ताघी  नावाचा गुलाम घीयासुद्दिन तुघलकाने तुर्कस्थानातून विकत आणला होता.. त्याची हुशारी पाहून महंमद बिन तुघलकाने त्याला वझिराच्या सैन्याचा अधिकारी बनवलं. तो दरबारचाही अधिकारी होता. या ताघीने काही चुका केल्या म्हणून सुलतानाने त्याला येमेनवर शिक्षा म्हणून पाठवलं. ताघी खंबायत पर्यंत पोचला तेव्हा त्याला गुजराथमधल्या बंडाळीची बातमी कळली. त्यासाठी तो सुलतानाच्या मदतीला गेला.




पण नंतर बंडखोरांच्या मदतीला गेला. सुलतान महंमद बिन तुघलक त्याच्या अटकेसाठी त्याच्या पाठीवर निघाला. ताघीही सतत जागा बदलत शेवटी सुलतानाला चकवत ठठ्ठाच्या राजाच्या आश्रयाला गेला. सुलतान महंमद तुघलक तिथे पोचला. काठियावाडमध्ये असतांनाच महंमद तुघलक सुलतानाला ताप येऊ लागला. ठठ्ठाच्या वाटेवर असतांनाच त्याचा ताप वाढला. सोंडा या खेड्यात असतांना त्याची प्रकृती खूपच बिघडली. तिथेच त्याला मुक्काम करावा लागला. त्या मुक्कामात आठवडाभरानंतर २० मार्च १३५१ रोजी त्याने शेवटचा श्वास घेतला.

सुलतानाला मुलगा नव्हता आणि त्याने आपला वारस ठरवलाही नव्हता. त्यामुळे दोन दिवस राज्य राजाशिवाय राहिलं. त्याला दोन मुली होत्या.

त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांनी फिरोजशहा तुघलकाला सुलतान म्हणून घोषित केलं. तुघलक वंशाकडेच दिल्लीची सल्तनत राहिली. एका मोठ्या साम्राज्याचा आणि २६ वर्षांच्या मोठ्या काळाचा सत्ताधीश काळाच्या पडद्याआड गेला.

# फिरोजशहा तुघलक.

# १३०९ – २० सप्टेंबर १३८८.

सिंधू नदीच्या उजव्या तीरावर, ठठ्ठापासून १८ कोसावरच्या छावणीत, सोंडा या खेड्यात २० मार्च १३५१ यादिवशी सुलतान महंमद तुघलक निपुत्रिक मेला, आपला वारस कोण हेही त्याने ठरवलं नव्हतं. तख्त रिकामं ठेवायचं नाही तर बसवायचं कुणाला हा प्रश्न अमिरांना, उमरावांना पडला. दुसरा दिवस सुलतानाच्या मृत्यूचा दुखवटा पाळण्यात गेला. त्या एका दिवसात फौजेत गोंधळ माजला. तिसरे दिवशी नवरोज कर्घन नावाच्या सुलतानाच्या सरदाराने, या गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी मंगोल फौजेला हल्ला करायला बोलावलं. ही परिस्थिती सावरणं कठीण झालं कारण खजिना आणि राजघराण्यातील स्त्रिया या दोन्ही गोष्टी सांभाळणं परीक्षाच होती. ती मोठी जबाबदारी पार पडली पण तख्त रिकामं ठेवायचं नाही म्हणून वारस शोधायचं काम त्वरेने हाती घेणं जरुरीचं झालं.


Firoz Shah Tughlaq

या निर्नायकी तुघलक घराण्यात वारस म्हणून महंमद तुघलकाचा चुलत भाऊ, मलिक रजब, आणि बीबी नाला या दांपत्यांचा मुलगा कमालूद्दिन फिरोजशहाच फक्त उरला होता. परिस्थिती मोठी नाजूक झाली. महंमद तुघलकाची बहीण खुदावंदजहाँ हिच्या मनात दावर मलिक या आपल्या मुलाला गादी मिळावी अशी इच्छा होती. पण फिरोजशहालाच सुलतान बनविण्याचं सर्व संमतीने ठरलं. स्वत: फिरोजशहा सुलतान बनायला अतिशय

नाखूष होता. तेव्हा बळजबरीने त्याला तख्तावर बसवण्यात आलं आणि अमीर उमरावांवरची मोठी जबाबदारी संपली.

इ. स. १३५१ मध्ये फिरोजशहा वयाच्या ४२ व्या वर्षी सुलतान बनला. याची आई जाट होती. फिरोजचा जन्म १३०९ सालचा. तो ७ वर्षांचा असतांना त्याचे वडील वारले, तेव्हापासून गियासुद्दिन तुघलकाने त्याला मुलासारखं सांभाळलं. त्याला उत्तम शिक्षण दिलं. महंमद तुघलकाने सुलतान बनल्यावर, या चुलत भावाला, फिरोजलाही वेगवेगळ्या सरकारी खात्यांची माहिती व्हावी म्हणून सर्व खात्यांमधून फिरवलं आणि तयार केलं होतं. एवढंच नव्हे तर अनेक वेळा कठीण जबाबदाऱ्या त्याच्यावर सोपवून त्याच्या वकूबाची परीक्षाही पहिली. फिरोजला दोन सावत्र भाऊ होते.

राज्यारोहणाचा समारंभ पार पडल्यावर सर्व देशभरच्या सरदारांना ही बातमी कळावी म्हणून मानाची वस्त्रे त्याच्या नावाने पाठवण्यात आली. फिरोजशहाच्या  नावाने खुत्बा वाचण्यात आला. महंमद तुघलकाचं शव छत्र चामरासह सजवलेल्या हत्तीवर ठेवून सन्मानाने ठठ्ठाहून दिल्लीला नेण्यात आलं. फिरोजशहाही स्वत: ठठ्ठाहून दिल्लीच्या प्रवासाला लागला.

प्रवासात असतांना त्याला बातमी मिळाली की महंमद सुलतानाच्या ख्वाजा इ जहाँ या वजिराने, एका ९ वर्षाच्या मुलाला घियासुद्दिन या नावाने दिल्लीच्या सिंहासनावर बसवलं. फिरोजशहाला तो वडिलांसारखा होता. पण तो बंडाळी करेल यावर त्याचा विश्वास नव्हता. म्हणून फिरोजशहाने ही बातमी गुप्त ठेवली आणि पुढच्या मुलतानच्या मुक्कामात बरोबरच्या सेनाधिकार्यांना आणि अमिरांना सांगितली. पण महंमद तुघलकाला कुणीही मुलगा नव्हता हे सर्वांना माहीत होतं.

लष्कर दिल्लीला पोचल्यावर त्याचा उलगडा झाला तो असा की ख्वाजाने आपला एक विश्वासू माणूस, मालिह तूतुनला ठठ्ठाला जाऊन बातमी आणायला सुलतानाच्या छावणीत पाठवलं तेव्हा त्याला फिरोजशहा दिसलाच नाही. त्याचा

ठावठिकाणाही लागला नाही. तेव्हा राज्यात तख्त रिकामं ठेवायचं नाही म्हणून ख्वाजाने एक ९ वर्षांचा मुलगा सिंहासनावर बसवला आणि राज्यकारभार हाती घेतला. त्यात त्याच बंडाळीचा हेतू नव्हता. फिरोजशहाला हे कळल्यावर त्याने वजीर ख्वाजा इ जहाँला माफ केलं पण प्रतिष्ठित दरबारी लोकांना हा गुन्हा पचला नाही. त्यावर वाद झाले. शेवटी ८४ वर्षांच्या त्या इमानदार वजिराने हजरत निजामुद्दीन औलीयाचे दोहे म्हणत आपली मान आपल्याच तलवारीने कापून घेतली आणि प्रश्न मिटवला.

फिरोजशहाने त्यानंतर त्याच दिवशी आपला वझीर म्हणून मलिक मकबुल याला नेमलं. हा मलिक मकबूल मूळचा तेलंगणाचा. याचं नाव कन्नू होतं. त्याचा गाव त्याला राय नावाने ओळखत होतं. महंमदशहा तुघलकाच्याच्या दक्षिणेतील स्वारीत हा पकडला गेला. त्याला दिल्लीत आणून सक्तीने धर्मांतर करण्यात आलं. तो कन्नू म्हणजेच मलिक मकबूल आता वजीर बनला.

दिल्लीला महंमद तुघलकाची अंत्ययात्रा पोचली. समारंभाने महंमद तुघलकाचा दफनविधी झाला. त्यानंतर महंमद तुघलकाच्या काळात ज्यांच्यावर अन्याय झाला होता, त्यांच्याकडून सुलतानाला माफ केल्याची माफीपत्रं लिहून घेतली आणि महंमदशहा तुघलकाच्या कबरीत त्याच्या शवाबरोबर दफन करून टाकली. जे लोक शहर सोडून परांगदा झाले होते त्यांना परत बोलावलं. अल्लाउद्दिन खिलजीचं सिर शहर उजाडून टाकलं आणि फिरोजशाहाने आपल्या नावाने फिरोजाबाद हे नवीन शहर वसवलं.

त्याच्या कारभाराची वैशिष्ट्ये म्हणजे सर्वांना मोठे पगार, आणि अन्नधान्याची स्वस्ताई. त्याच्या कारकीर्दीत एकदाही दुष्काळ पडला नाही, की साथीचे रोग पसरले नाहीत. त्याने आपल्या सर्व सरकारी सेवेतील लोकांना नोकरीची हमी दिली. त्यामुळे त्याच्या प्रजेने शांतता आणि मन:शांती अनुभवली.

एकदा खुनाचा प्रयत्न आणि एकदा विषप्रयोग त्याने अनुभवला, पण त्यातून तो सहीसलामत वाचला. त्याच्या आमदानीत बंडाळीचाही कुणी प्रयत्न केला नाही. त्याचं मुख्य कारण म्हणजे त्याला स्वत:ला हातपाय तोडणं, डोळे काढणं, शरीर सोलून पेंढा भरून ठेवणं अशा क्रूर शिक्षा आवडत नव्हत्या. त्यामुळे त्याच्या लोकांना सुरक्षित वाटू लागलं. तो स्वत: क्रूरही नव्हता आणि मवाळसुद्धा नव्हता. आर्थिक क्षेत्रात त्याने नवीन नवीन योजना आणल्या. सारा पद्धत बदलली.

सुलतानाच्या नावाने जो खुत्बा वाचला जायचा त्यावेळी वर्तमान सुलातानाचंच नाव वाचायची प्रथा होती. पण फिरोजशहाने त्यात अल्तमश, बलबन, अल्लाउद्दिन खिलजी या आधीच्या सर्व सुलतानांची नावेही वाचली जावीत असं फर्मान जाहीर केलं. त्यात फक्त कुतुबुद्दीन ऐबकचं नाव वगळलं होतं..

त्याचं पुढचं फर्मान होतं की जेव्हा एखादा सैनिक मरेल तेव्हा त्याच्या मुलाला ते पद मिळेल, मुलगा नसेल तर जावयाला, जावई नसेल तर गुलामाला आणि गुलाम नसेल तर पत्नीला. हाच नियम सरकारी कर्मचाऱ्यांनाही लागू होता. आणि हा निर्णय त्याच्या हयातीत कायम चालू राहिला. काही वर्षांनी त्याने नवीन फर्मान जाहीर केलं की वृद्धत्वामुळे एखाद्या सैनिकाला घोड्यावर बसणं अशक्य झालं असेल तर तो पगार मिळत राहण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून मुलगा, जावई, गुलाम पाठवू शकतो..

फिरोजशहा एक नियम नेमाने पाळायचा. तो दर शुक्रवारी महंमद तुघलकाच्या खुदावंदाजहाँ या बहिणीच्या भेटीला जायचा. बंगाल मोहिमेवर जाण्यापूर्वी एका शुक्रवारी तो तिच्या महालात गेला असतांना त्याच्या जीवाला धोका असल्याचा इशारा शेजारच्या खोलीतून खुदावंदाजच्या खुश्रू मलिक या धाकट्या मुलाने केला. त्याबरोबर सावध झालेल्या सुलतानाने हातात तलवार घेऊन तिचा महाल सोडला आणि मग त्या वाड्याचा शोध घ्यायला सांगितलं. पहारेकर्यांनी शोध घेतला त्यात मारेकरी अपराधी पकडले गेले. त्यांनी आपल्या जबानीत कबूल केलं की खुदावंदाजहाँकडे प्रचंड पैसा आहे. त्यामुळे तिने सुलतानाला ठार करून

आपल्या दावर मलिक या मुलाला तख्तावर बसवण्याचा कट केला. सुलतानाने तिचा पैसा जप्त केला आणि दावर मलिकला राज्याबाहेर घालवलं. तिच्या धाकट्या मुलाला सामान्य नागरिकाचा दर्जा दिला.

फिरोजशहाला राज्य विस्तार करण्यासाठी लढाया करणं, मनुष्य हानी करणं मान्य नव्हतं. त्यामुळे आपल्या हाताखाली असलेल्या प्रदेशाचं रक्षण करणं, सैन्याला काम मिळत राहावं आणि पगार मिळत राहावा एवढ्यासाठीच त्याने स्वाऱ्या मोहिमा काढल्या आणि आपल्या हाती आहे तेवढं राज्य राखलं. यामुळे त्याच्या लढाया ऐतिहासिक दृष्टीने गाजल्या नाहीत. त्याच्या दोन मोहिमा बंगाल आणि ओरिसाच्या हिंदू राज्यावर झाल्या, बंगालवर त्याने विजय मिळवला. ओरिसात दोन्ही बाजूंना फायद्याचा ठरेल असा तह झाला आणि सैन्य परत आलं. गुजराथ आणि ठठ्ठाचा नरसंहार पाहिल्यावर जगज्जेता होण्याचं बिरूद त्याला नकोच होतं.

त्याला आवड होती ती सुंदर वास्तू, प्रासाद बांधण्याची आणि पाण्यासाठी कालवे खोदण्याची ! दिल्लीतील मोडकळीला आलेल्या अनेक जुन्या वास्तू, तलाव त्याने दुरुस्त करून परत वैभवशाली केले. कुतुबमिनारचा कळस वीज पडून कोसळला तेव्हा सुलतानाने त्यावर आणखी दोन मजले चढवून त्याला लाल पत्थराने सजवलं. शिकारीचा शौक असल्यामुळे शिकारगाह - कुशकमहाल बांधला. आजच्या तीन मूर्ती भवनच्या भागात असलेला हा महाल, म्हणून त्या रस्त्याला सध्या तुघलक रोड म्हणतात.

त्याच्या या शौकापायी त्याने फिरुझ किल्ला बांधला तोही दिल्लीपासून १० कोसांवर लरस-ई-बुजुर्ग (आपल्याकडे अपभ्रंश बुद्रुक) आणि लरस-ई-खुर्द अशा, पाण्याचं दुर्भिक्ष्य असलेल्या दोन उजाड खेड्यांच्या ठिकाणी. त्याची एक रोचक कथा सांगितली जाते. फिरोजशहा सुलतानाला शिकारीचा मोठा शौक होता. एकदा दिल्लीबाहेर शिकार खेळता खेळता हरियाणाच्या जंगलात तो वाट चुकला. मार्ग शोधता शोधता थकला आणि एका झाडाखाली बसला. त्या मार्गावरून लरस

गावाचे दोन गुजर रहिवासी चालले होते. त्यांनी या थकलेल्या पुरुषाला घरी आणलं, खायला दिलं आणि दारूही पाजली. पोट भरल्यावर दारूमुळे खुश झालेला सुलतान जे बोलायला लागला त्यावरून सहारन आणि सिद्धू या खेडुतांना हा सुलतान आहे हे समजलं आणि त्यांनी त्याला आराम आनंद वाटेल अशी त्याची बडदास्त राखली. सुलतान खूष झाला. सुलतानाला सहारनची मोठी मुलगी मनात भरली आणि त्याने तिच्याशी निकाह लावायचं ठरवलं. तसा त्याने आपल्या आईला निरोप पाठवला.

लरस खेड्यातली मुलगी निकाह करून सुलतानाच्या प्रसादात आली पण तिथे तिचं मन रमेना. म्हणून सुलतानाने लरस-इ-बुजुर्ग ( बुद्रुक ) आणि लरस-इ-खुर्द ही दोन गावं  मिळून आपल्या बेगमेसाठी हिसार ( किल्ला ) फिरोज नावाचा किल्ला बांधला. थोड्याच अवधीत सुलतानाच्या येण्याजाण्यामुळे हिसार मोठं शहर बनलं. त्या गावात पाण्याचं दुर्भिक्ष्य होतं म्हणून सुलतानाने सतलज आणि यमुनेवर बांध घालून दोन कालवे त्या शहरापर्यंत आणले. सुलतानाचा किल्ला आणि जवळपासचा भाग कालव्यांनी भरून गेला. गावात पिकपाण्याची समृद्धी झाली.

यमुनेच्या काठावर कवीन या गावाजवळ सुलतान फिरोजशाहने आपल्या नावाने फिरोजाबाद शहर निर्माण केलं. दिल्लीतील अमीर-उमराव-श्रीमंत-प्रतिष्ठित सर्वांनीच मग तिथे आपल्या सुंदर सुंदर वास्तू निर्माण केल्या आणि फिरोजाबाद शहर गजबजून गेलं. तिथे तीन मोठी मोठी भुयारं बांधली ज्यातून राजप्रासादातील स्त्रिया ये जा करत असत. एक मोठी इमारत बांधली, ज्यात पावसाचं पाणी पडलं की जवळपासचा पाण्याचा  लोट वाहून यायचा आणि त्या इमारतीत पाण्याबरोबर वाहून आलेले मासे अडकून पडायचे. त्याने आकाशदर्शनासाठी एक छताला मोठी मोठी भोकं असलेली जहाँनुमा नावाची वास्तू ज्योतिषांच्या सल्ल्याने निर्माण केली ज्यातून तो तारे ग्रहांचा आनंद घ्यायचा.

१७ डिसेंबर १३५५ या दिवशी फिरोजशाहाला इजिप्तच्या खालिफाकडून त्याला मान्यता देणारं फर्मान आणि मानाची वस्त्रे मिळाली, जी प्रथा महंमद

तुघलकाने सुरू  केली होती. फिरोजशहाच्या कारकीर्दीत त्याच्या तीन मोहिमा झाल्या. त्या बंगाल, ओरिसा आणि नगरकोट मोहिमा होत. पूर्ण बंगाल प्रांत हा हाजी इलियास म्हणजेच शमसुद्दीन इलियासशहाच्या हाती होता. त्याने स्वत:ला स्वतंत्र घोषित केलं होतं. तेव्हा आपल्या अधिकाराखाली आणण्यासाठी इ. स. १३५३ मध्ये सुलतान बंगालवर चालून गेला. जेव्हा इलीयासने इक्दाला किल्ल्याचा आसरा घेतला तेव्हा फिरोजशहा त्याला पकडू शकला नाही, आणि ती मोहीम अर्धवटच राहिली. बंगालवर विजय मिळवण्यासाठी फिरोजशहाने परत एकदा स्वारी केली. इ. स. १३५९ मध्ये फौज घेऊन बंगालवर चालून गेला. त्यावेळी हाजी इलीयासचा मुलगा राज्य चालवत होता. त्यानेही आपल्या बापाप्रमाणे इक्दाला किल्ल्याचा आश्रय घेतला आणि सुलतानाची ही मोहिम सुद्धा अयशस्वी झाली.

सुलतानाने पुढील वर्षी, इ. स. १३६० सालात नागरकोटवर स्वारी केली ती मात्र यशस्वी झाली. दोन्ही बाजूंना मान्य होईल असा तह करून फिरोजशहा परत आला. या स्वारीत सुलतानाला मौल्यवान अभ्यासाची १३०० संस्कृत पुस्तकं मिळाली. सुलतानाने ती दिल्लीला आणली आणि त्याच फारसी भाषेत भाषांतर करून घेतलं.

इ. स. १३६१-६२ सालात फिरोजशाहने ठठ्ठाची मोहीम आखली, ती तिथल्या सुभेदाराला धडा शिकवण्यासाठी.. हा सुभेदार साद्दद्दिन भाम्भिना आणि त्याचा मदतनीस  अलाउद्दिन जूना हे दोघे मंगोलांना स्वारी करण्यासाठी चिथावत होते. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी फिरोजशहा ठठ्ठाला निघाला. अल्लाउद्दिन जूनानेही मोठी फौज जमवली. या लढाईत पराभव होता होता सुलतान वाचला.. त्याने जोरदार सामना केला पण माघार घ्यावी लागली तेव्हा गुजराथला जाण्याचा विचार केला. पिकं तयार झाली की परत यायचा त्याने विचार केला. दुर्दैवाने गुजराथच्या मार्गावर त्यांच्या शत्रूने सुलतानाच्या फौजेला चुकीच्या मार्गाने नेलं आणि कच्छच्या रणातून प्रवास करायला लावला. पाण्याने तहानेलेले घोडे, हत्ती, फौज यांच्या मरणामुळे खूप नुकसान झालं. त्यातून बाहेर पडायला सुलतानाला ६ महिने लागले.

अडीच वर्षांनी फिरोजशहा ठठ्ठा मोहिमेवरून विजयी होऊन परतला. जे सैनिक मृत्युमुखी पडले होते, त्यांच्या वारसांना त्याने त्यांचं वतन, पैसा तसाच चालू ठेवायला फर्मान जरी केलं. या अडीच वर्षांमध्ये दिल्लीचा कारभार सुरळीतपणे चालवला तो मलिक मकबुल याने. सुलतान स्वत: मलिक मकबूलच खान-इ-जहाँ म्हणजे राज्यकर्ता आहे असं म्हणे आणि भावासारखी वागणूक देई.

फिरोजाशाहने खूप मोठ्या प्रमाणात हिंदू धर्मांतर घडवलं. मुसलमानांना जिझिया कर माफ होता. हिंदूंना तो भरावा लागे. त्या कराच्या ओझ्यामुळे अनेक गरीब हिंदूंनी धर्मांतर केलं.

सुलतान फिरोजशहाने घटकापात्र तयार केलं. पाण्याने भरलेल्या एका मोठ्या हौदात ते छिद्र केलेलं पात्र ठेवलं जायचं आणि २४ मिनिटांनी ते पाण्यात बुडालं की नगर वाजवून २४ मिनिटं झाल्याची बातमी दिली जायची. दर 4 तासांनी दोन वेळा नगारा वाजवून तेही सांगितलं जायचं. हा हौद त्याने आपल्या राजप्रासादाच्या गच्चीवर ठेवला होता.



फ़िरोजशाह कोटला मैदानातील अशोकस्तंभ

सुलतान फिरोजशहाची दुसरी ऐतिहासिक कामगिरी म्हणजे त्याने उचलून आणलेला अशोक स्तंभ. फिरोजशहा कोटला मैदानावरचा हा स्तंभ आजही त्या घटनेची साक्ष देतो. या स्तंभावर लिहिलेला मजकूर कुणालाही वाचता येत नव्हता. सुलतानाला आणि जनतेला त्याचं महत्वही माहीत नव्हतं. अंबालाजवळ तोपर इथे हा सम्राट अशोकाचा स्तंभ उभा होता. सुलतानाने तो दिल्लीत आणायचं ठरवलं. त्यासाठी त्याने केलेला प्रयत्न मोठा रोमहर्षक आहे. सुलतानाने हजारो कापसाच्या मोठ्या मोठ्या गाठोडी स्तंभाच्या आजूबाजूला पसरली. हजारो मजुरांनी स्तंभाच्या भोवतालची माती मोकळी केली तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की तो स्तंभ एका चौकोनी दगडामध्ये रुतावला आहे. आता स्तंभ

उचलायचा तर त्या चौथऱ्यासकट उचलावा लागणार होता. मग तोही खोदला. तेव्हा तो स्तंभ कापसांच्या गाठींवर पडला. त्याच्याभोवती जंगली वेली, चामडं लपेटलं. मग सुलतानाने ४२ चाकांची लांब लचक बैल गाडी बनवली. त्यावर तो स्तंभ हजारो मजुरांनी उचलून ठेवला. २०० मजुरांनी तो छकडा ओढला. मग तो स्तंभ दिल्लीपर्यंत आणण्यासाठी यमुनेच्या मोठ्या पात्राचा विचार करण्यात आला.

त्याकाळात यमुनेचं पात्र आताच्या फिरोजशहा कोटला जवळून वाहत होतं. यमुनेच्या पात्रातून मोठ्या मोठ्या जहाजांचा वावर धान्याची हजारो मण पोती वाहायला होत असे. ती सर्व जहाजं गोळा करण्यात आली. एकदुसरीला बांधलेल्या या मोठ्या मोठ्या जहाजांवर हजारो मजुरांनी ती दगडी स्तंभ मोठ्या मुष्किलीने सांभाळत चढवला. मग तो स्तंभ किल्ल्यापर्यंत आणला. आता मोठं काम होतं ते त्या प्रचंड वजनदार स्तंभाला उंचावर उभं करणं. त्यावर उपाय काय? मग त्यासाठी तिथे एका इमारतीचं काम सुरू झालं.

इमारतीच्या पायऱ्या बनल्या की आडवा स्तंभ त्याच्यावर उचलून ठेवत. अशारितीने रोज अर्धा गज तो स्तंभ वर चढत गेला. स्तंभाच्या भोवती लाकडी चौकटीने तो बंदिस्त केला गेला. पण इमारतीच्या वरच्या शेवटच्या पायरीवर गेल्यावर त्याला सरळ करण्यासाठी दोर वापरले गेले. हजारो मजुरांनी ते कष्ट घेतले. ३२ गज लांबीचा तो स्तंभ ८ गज इमारतीच्या खाली आणि २४ गज वरती असा उभारला गेला. या स्तंभाच नाव मीनारेजारी (सुवर्ण मिनार) असं ठेवलं. त्याच्यावर कळस चढवला गेला. त्याकाळात जनतेचा असा समज होता की तो स्तंभ म्हणजे भीमाची काठी होती.. फिरोजशाहाला सम्राट अशोकाचा आणखी एक स्तंभ मिळाला होता. तोही त्याने आपल्या किल्ल्यात आणला होता. पण नंतरच्या काळात त्यावर तोफेचा गोळा पडून त्याचे तुकडे झाले होते. ब्रिटीशांनी आपल्या अधिकाराच्या काळात ते तुकडे जोडून, परत अशोकस्तंभ नीट बांधून उभा केला.

सुलतानाने अनेक अन्नछत्रे बांधली. अनेक बागा तयार केल्या. एकट्या दिल्लीत फळांच्या १२०० बागा होत्या. त्यांचं उत्पन्न सुलतानाला जाई. सुलतानाने

जनतेसाठी फुकट दवाखाने सुरु केले. अनेक हकीम तिथे नेमले. त्याने गरिबांच्या मुलींच्या लग्नासाठी गरीब बापाला काही रक्कम देण्याची व्यवस्था केली.

सुलतानाने आपल्या सर्व अधिकाऱ्याना सांगून ठेवलं होतं की त्यांना देखणा, तगडा जवान तरुण सापडला की त्याला गुलाम म्हणून विकत घ्यायचं आणि सुलातानापाशी आणायचं. सुलतानाने अशा अनेक तरुणांना कामाला लावलं. मोठे पगार दिले आणि इतर शहरांमध्ये पाठवलं. १ लाख, ८०००० गुलाम त्याच्या पदरी होते. ते राज्यकारभारात ढवळाढवळ करत असत.

राज्य महसुलावर चालत असल्यामुळे सुलतानाने सारा वसुलीसाठी एक वेगळंच  खातं तयार केलं. ख्वाजा हिसामुद्दिन जुनैद याला स्वतंत्र खात्याचा मुख्य अधिकारी बनवून राज्याचा महसूल व्यवस्थित करण्याचा अधिकार दिला. या ख्वाजा जुनैदने सहा वर्षे सर्व प्रांतात हिंडून सारा वसुलाची पद्धत तयार केली..

फिरोजशहा सुलतानाचा शेवटचा काळ त्रासदायक गेला. १३७४ साली त्याचा मोठा मुलगा फतेहखान वारला. मग त्याने आपल्या दुसऱ्या मुलाला, झफरखानला वारस केलं. पाठोपाठ दुसरा शहजादाही मरण पावला. त्यानंतर सुलतानाने आपला तिसरा मुलगा महंमदखानला वारस करायचं ठरवलं. पण ते घोषित केलं नाही.

इ. स. १३६९ मध्ये सुलतानाचा विश्वासू प्रधानमंत्री मलिक मकबुल, ज्याच्या मदतीने सुलतानाने १८ वर्षे कारभार केला होता, ८० व्या वर्षी तोही मरण पावला होता.. त्याच्या जागी मकबूलचा मुलगा पंतप्रधान झाला होता.. त्याच्या कपटी स्वभावामुळे त्याने सुलतानाच्या मनात, सुलतानाचा तिसरा शहजादा महंमदखान सुलतानाविरुध्द कट रचतोय असं भरवलं. महंमदखानला हे कळल्यावर तो स्वत: सुलतानाला, आपल्या पित्याला येऊन भेटला. त्याने फिरोजशाहाच्या मनातील गैरसमज दूर केला आणि तुघलकशाही बुडावी असा या नवीन खान-इ-जहाँचा डाव असल्याचं सांगितलं. तेव्हा फिरोजशहा सुलतानाने या नवीन पंतप्रधानाला ठार

करायची परवानगी आपल्या शहजादाला दिली. महंमदखानने त्याच्या घरावर छापा मारला. खान-इ-जहाँला ही बातमी लागताच तो मेवातला फरार झाला. महंमदखान मग सुलतानाचा कारभार सांभाळायला मदत करू लागला. सुलतान पायउतार झाला आणि महंमदखानला त्याने वारस घोषित करून सर्व कारभार त्याच्या हाती दिला.

पण सत्ता हातात येताच महंमद खान शौक आणि छंदीफंदीपणात बुडाला. त्यामुळे राज्यकारभारात ढिलाई आली. गोंधळ माजला. दरबारीही त्याच्या वागण्याला कंटाळले. मग दरबारी लोकांनी फौज गोळा केली. त्यांच्याविरुध्द महंमदखान लढायला उभा राहिला. पण टिकाव धरू शकला नाही आणि पळून गेला.


त्यानंतर फिरोजशहा आपला प्रासाद सोडून कुशक-इ-नझलमध्ये राहायला गेला होतं. दोन महिन्यांच्या नंतर सर्व गुलाम एकत्र झाले, त्यांनी बंड केलं. महंमदखान पळून गेला. ज्या गुलामांना सुलतानाने मोठं केलं होतं, त्यांनीच राजवाडा लुटला. फिरोजशाहने आपल्या तुघलकखान या नातवाला, फतेह खानच्या मुलाला, सुलतान म्हणून घोषित केलं. ३७ वर्षे राज्य करून फिरोज खान २० मार्च, १३८८ या दिवशी परलोकी गेला.

त्याच्या काळात जनतेने आणि सर्व राज्याने शांत, दयाळू जीवन अनुभवलं. कारण मुसलमानी क्रौर्यापासून सुलतान लांब राहिला होता.

फिरोजशाहाच्या मृत्युनंतर दरबारातील सरदारांनी फिरोजशाहाच्या जाफरखान या भावाच्या मुलाला तख्तावर बसवलं. त्याचं नाव होतं अबूबक्र. आता पळून गेलेल्या महंमदशहा आणि अबुबक्रमध्ये सत्तेसाठी सामना सुरु झाला. दोघांच्या फौजांची झटापट सुरु झाली. त्यातही काही सरदार महंमदशाहच्या बाजूचे होते. त्यामुळे लढाई निर्णायक होत नव्हती. याचा शेवट नवीन सुलतान

अबूबक्र याच्या मरणात झाला. आता महंमद शाहचा मुलगा हुमायून अल्लाउद्दिन सिकंदरशाह या नावाने गादीवर आला, पण तो एक महिन्यातच अवधीत आजारात मरण पावला. तुघलक घराण्यातील पुरुष सुलतान म्हणून बदलत गेले. त्याचवेळी तैमूरलंग नावाचं प्रचंड मोठं वादळ दिल्लीवर घोंगावत आदळलं. त्यात तुघलक घराणं पाचोळा होऊन संपलं.

नंतर सय्यद घराण्याचा शिरकाव दिल्लीच्या राजमहालात झाला.



# तुघलक खान-घीयासुद्दिन तुघलक.

# मृत्यू – १४ मार्च १३८९.

फिरोजखान तुघलकाच्या मृत्यूनंतर तुघलक घराणं अस्ताला जाऊ लागलं. पुढची ९ वर्षे म्हणजे १३९८ सालापर्यंत जेमतेम या घराण्याने तग धरला आणि तैमूरलंगच्या आक्रमणानंतर त्या घराण्याचा अस्त झाला. तोपर्यंत फिरोजशाहाच्या वेगवेगळ्या अनेक  नातवांनी काही काळ दिल्ली तख्तावर बसून गोंधळ, अराजक अस्थिरता माजवली.

इ. स. १३२१ मध्ये घीयासुद्दिन तुघलकाने तुघलक घराण्याचा पाया घालून झाल्याला आता ६० वर्षे उलटून गेली होती. त्या घराण्याच्या उत्कर्षाला आता उतरती कळा लागली. फिरोजशाहा तुघलकच्या मृत्युनंतर सत्तेवरून लठ्ठालठ्ठी सुरु झाली. फिरोजशहाने जमवलेले गुलाम राजकारणात समर्थ झाले होते. त्याचं प्राबल्य वाढलं होतं. फिरोजशहाने महंमदखानला आपला वारस म्हणून घोषित केलं होतं. पण फिरोजशाहाच्या गुलामांनी महंमदखानला सिरमारला पळवून लावलं. सुलतान फिरोजशाहने आपला नातू-फतेहखानचा मुलगा तुघलकखानला शासकीय अधिकारी म्हणून नेमलं होतं. तो आता सुलतान बनला. फिरोजशहा सुलतानाचा तिसरा शहजादा जिवंत असूनही सर्व गुलामांनी तुघलकखानला, २१ सप्टेंबर या दिवशी  तख्तावर बसवलं. त्याचं नामकरण घीयासुद्दिन दूसरा, असं करण्यात आलं. सुलतान बनल्याबरोबर घीयासुद्दिनने आपला वजीर म्हणून मलिकजादा फिरूज याची नेमणूक केली. त्याच्या हाताखाली आपल्या काकाला महंमदखानला पकडण्यासाठी सिरमुरला फौज पाठवली. पण महंमदखान नागरकोटच्या आश्रयाला गेल्यामुळे फौज परत आली. घीयासुद्दिनने आपल्या भावालाही कैदेत टाकलं, आणि अबूबक्र हा आणखी एक चुलत भाऊ सुलतानाच्या हातून निसटला आणि वाचला.

तुघलकखानला सरकार चालवण्याचा वकूब नव्हता आणि बुद्धीही नव्हती. त्यामुळे सर्व कारभार फिरोजशाहाने पोसलेल्या गुलामांच्या हाती गेला आणि सुलतान नाममात्र राहिला. दारू आणि मौजमजा यात बुडाला. राज्यात अराजक माजणार याची प्रचीती नागरिकांना लौकरच आली. 4 महिन्यातच, फेब्रूअरी १४, १३९० या दिवशी गुलामांनी नायब वझीर, रुक्नुद्दिन जुनाद याच्या चिथावणीने सुलतानावर हल्ला केला. त्यांनी आधी सुलतानाच्या अधिकाऱ्यांवर हल्ला करून त्यांना ठार केलं आणि सुलतानावर चालून गेले. सुलतान तुघलकखान आणि त्याचा वझीर मलिकजादा फिरोज पळून जायला लागले तेव्हा त्यांना पकडून त्यांचं शीर उडवलं आणि ती दोन्ही शीरं राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर टांगली.

अबूबक्र. - सुलतानशाहीत एक सुलतान मेला की तख्त रिकामं ठेवायचं नाही. या रिवाजाप्रमाणे घीयासुद्दिन दूसरा मरण पावल्याबरोबर गुलामांनी फिरोजशहाच्या दुसऱ्या मुलाचा मुलगा अबू बक्र याला सुलतान केलं. रुकनूद्दिन जुनाद वझीर झाला. पण या वजीराच्या मनात स्वतःच सुलतान बनायचं आहे असा संशय अबू बक्रच्या पाठीराख्यांना आल्यावर त्यांनी वजिराला आणि पाठीराख्यांना ठार केलं.

दुसरीकडे नागरकोटला पळून गेलेल्या शहजादा महंमदने सामान या प्रांतात 4 एप्रिल १३८९ रोजी, स्वतःला सुलतान म्हणून घोषित करून टाकलं. मग तो दिल्लीवर चालून गेला. परत फिरोजशाहाच्या गुलामांच्या जमावाने त्याला पळवून लावलं. परत तो गंगेच्या काठी जलसर इथे तळ करून राहिला. त्याला ५०,००० फिरोजी गुलाम येऊन मिळाले. असं दोन वेळा घडल्यावर शहजादा महंमद शेवटचा उपाय म्हणून कपटीपणाने वागला. ११ सप्टेंबर १३८९ या दिवशी त्याने फिरोजशाहाच्या दिल्ली आणि आजूबाजूच्या प्रदेशात राहणाऱ्या सर्व गुलामांना कापून काढलं. आणि महंमदखान दिल्लीवर चालून गेला. दिल्ली त्याच्या ताब्यात आली. अबूबक्र पळून गेला आणि त्याने मेवातच्या राजाकडे आसरा घेतला. फिरोजी गुलामांना कळून चुकलं की आता त्यांची सत्ता संपली आहे. सुलतान

महंमदने ३ दिवसांमध्ये त्या सर्वांना दिल्ली सोडून जाण्याचा हुकूम सोडला. सुलतानाने मग अबुबक्रवर सैन्य पाठवलं. त्याला पकडून आणण्यात आलं आणि अमरोहाच्या तुरुंगात ठेवलं. तिथेच अबूबक्र मरण पावला.

महंमदखान तुघलक. - दीड वर्षे कारभार करून अबूबक्रची कारकीर्द संपली आणि महंमदखानची सुरु झाली. इ. स. १३९० ते १३९४ या काळात महंमदखानचा कारभार ४ वर्षे चालला. हिंदू राजांच्याविरुध्द त्याने २ वर्षे काही मोहिमा काढल्या. गंगा यमुनेच्या चिमटीतील  म्हणजे दुआबातील हिंदू राजे बीर सिंग, वीरसिंग राठोड, अभयचंद यांच्याविरुध्द लढाया झाल्या. मलिक मुकररबुल मुल्क याने या सर्व हिंदू राजांना कनोजच्या किल्ल्यात बोलणी करण्यासाठी बोलावलं आणि धोका देऊन सर्वांना कापून काढलं. एक राय साबीर तेवढा वाचला. ही हिंदू राजांच्या विरुद्धची मोहीम अशी कपटीपणाने संपली.

२० जानेवारी १३९४ मध्ये सुलतान महंमदखान आजारपणाने मरण पावला. आणि त्याचा शहजादा हुमायून सुलतान अल्लाउद्दिन सिकंदर शाह हे नाव धारण करून तख्तावर आला.

शहजादा हुमायूँ – हा शहजादा सुलतान बनला ती तारीख होती २२ जानेवारी १३९४. ख्वाजा-इ-जहाँ वजीर म्हणून नेमला गेला. जुने सर्व अधिकारी तसेच राहिले. पण तुघलक घराण्याचं नष्टचर्य अजून संपलं नव्हतं. ७ मार्च, १३९४ या दिवशी, एक महिना आणि १६ दिवसांमध्ये हाही सुलतान मरण पावला. या अस्थिरतेचा परिणाम जो व्हायचा तोच झाला.

यावेळी दिल्लीत प्रचंड अनागोंदी माजली. कममुवत सुलतानामुळे सरदार, अमीर सुभेदार स्वतंत्रपणे वागू लागले. अशा कठीण परिस्थितीत सुलतान बनला तो सुलतान फिरोजशहाचा आणखी एक नातू सुलतान नसरुद्दीन महंमद.

सुलतान नसरुद्दीन महंमद. - तो काळ या नव्या सुलतानासाठी फार कठीण होता. हाती पैसा नाही, फौज नाही, अनेक सरदार स्वतंत्र वागायला लागले होते.

तरीही नसरुद्दिन महंमद आपल्या वजीराला मदतीला घेऊन राज्य करायला लागला. आपला वजीर सादतखान याला बरोबर घेऊन तो विरोधकांना जिंकायला निघाला. पण त्यातही कट कारस्थानांना ऊत आला. वजीर सादतखानला मारण्याचा प्रयत्न झाला. सादतखान मेवातमध्ये राहणाऱ्या फिरोजशाहाच्या आणखी एका नातवाला, नसरुद्दीन नसरतशाह याला घेऊन दिल्लीपर्यंत आला. आणि या नातवाला फिरोजाबादमध्ये सुलतान म्हणून घोषित केलं. आता सल्तनतीला दोन सुलतान झाले. एक दिल्लीचा आणि हा दुसरा फिरोजाबादचा. यात या नवीन नसरुद्दीन नसरतशहाच्या हाताखाली पानिपत, बागपत, दोआबमधला काही प्रदेश आणि झज्जर एवढं राज्य होतं, आणि सुलतान नसरुद्दीन महंमदच्या हातात फक्त दोन किल्ले होते. या दोन्ही सुलतानांच्या समर्थकांच्या दिल्ली-फिरोजाबादेत रोजच झटापटी सुरु झाल्या. यातून राजकारणाला नवीनच वळण लावलं ते मल्लू इक्बाल खान या जबरदस्त महत्वाकांक्षी, घातकी आणि चलाख माणसाने.

याने नसरतशहाला, सुलतान नसरत महमुदच्या भेटीला आणलं, आणि ३ दिवसांनी अचानक त्याच्यावर दगाबाजीने हल्ला केला. त्याबरोबर नसरतशहा पळून गेला आणि त्याच्या तातारखान या वजिराच्या आश्रयाला जाऊन राहिला. नंतर तिथून पानिपतला गेला. एक सुलतान पळून गेल्यावर मल्लूखानने दुसरा सुलतान नसरत महमुद याला ताब्यात घेतलं, सर्व कारभार आपल्या हाती घेतला. सुलतान नाममात्र राहिला. त्याचा अधिकार संपला.

**तैमुरलंगचं दिल्लीवर आक्रमण –** डिसेंबर १३९८.

अशा निर्नायकी काळात झंजावाती संकट आलं ते तैमुरलंग या मंगोल आक्रमक क्रूर सुलतानाचं. त्याने तर हाहा:कारच माजला. दिल्लीतील गेल्या १० वर्षांतील या सुलतानी अंदाधुंदीची बातमी मंगोलपर्यंत पोचली होतीच. मंगोल

जमातीचं आक्रमण या आधीच्या सुलतानांनीही सहन केलं होतं. बादशहा अल्तमशच्या काळात मंगोलवरून चंगीझखान येऊन गेला होता. पण ते वादळ अचानक त्याच्या देशातील गडबडीमुळे परत गेलं होतं. बलबन सुलतानाचा शहजादा महंमद याला मंगोल आक्रमणातच मृत्यू आला होता. या शहजादाबरोबर प्रसिध्द शायर अमीर खुस्रोही पकडला गेला होता. त्यांनी लिहून ठेवलेल्या वर्णनाप्रमाणे या मंगोल लोकांचं वागणं आणि दिसणं भयानक होतं. डोक्यात उवा, जोडे बनवावेत अशी जाड कातडी, आणि क्रूर दिसणारे बारीक डोळे हे त्यांचं रूप होतं. अल्लाउद्दिन खिलजीच्या काळात मात्र खिलजी त्यांना पुरून उरला. त्याने मंगोल सैनिक आणि सरदार पकडून हत्तीच्या पायाखाली चिरडले होते. त्याच वंशातील हा लंगडा तिमूर-तैमूर आता दिल्लीवर आला. तो आपल्या पूर्वजांपेक्षा क्रूर होता. लहानपणी याच्या पायाला बाणाची जखम झाली होती, आणि तेव्हापासून तो लंगडा झाला होता. तरीही तो मैलोन मैल चालू शकत असे, आणि २४ तास घोड्यावर बसू शकत असे. त्याच्या हाताची दोन बोटंसुद्धा कापली गेली होती. चंगीझखान आणि तैमूर हे तोमनाह आणि कालूची या दोन भावांचे वंशज होते. तैमूरलंगला " साहेब किरान " म्हणजे भाग्यविधाता ही उपाधी होती. दोघेही इतिहासात त्यांच्या क्रूरतेसाठीच लक्षात राहिले.

या तैमूरचा जन्म १३३६ सालचा. इ. स. १३७० मध्ये तैमूरच्या हाती सर्व सत्ता आली. त्यानंतरची ३५ वर्षे त्याने आपली सारी हयात स्वाऱ्या आणि मोहिमांमध्ये घालवली. इ. स. १३९८ मध्ये तो दिल्लीवर स्वारी करण्यासाठी सिंधू नदी पार करून आला.

सत्ताधीश बनल्यावर त्याने आजूबाजूचा सर्व प्रदेश, पर्शिया आपल्या हाताखाली आणलं. आणि त्यानंतर राज्यविस्तारासाठी तैमूरने आपल्या नातवाला पीर महंमदला, मुलतानच्या स्वारीवर पाठवलं. इथे पीर महंमदला पराभव पत्करण्याची वेळ आली. तेव्हा पीर संकटात सापडला आहे हे कळल्याबरोबर तो स्वतः मुलतानवर आला. दिल्लीवर स्वारी करून दौलत लुटणे याच एकमेव

उद्देशाने तो भारतात शिरला. त्यासाठी त्याने नियोजनबद्ध मार्ग आखला. कोणत्याही मोठ्या शहरामध्ये प्रवेश न करता, लहान लहान खेड्यांमधून त्याने वाटचाल केली. त्यामुळे ती गावं आपोआप, काहीही विरोध न होता त्याचा हाती पडली, आणि तो पुढे पुढे सरकला.

तैमूरलंगने काश्मीरमध्ये प्रवेश करून सीमेवरच्या कटोरा किल्ल्यावर हल्ला चढवला. तिथल्या सर्वच्या सर्व नागरिकांची हत्या करून त्यांचे मिनार बनवले. तिथून तो भटनेर किल्ला जिंकायला राजपुतांवर चालून गेला. ते शरण आल्यावर त्यांना क्षमा केली. आणि ते बेसावध झाल्यावर सर्व राजपुतांनाही ठार केलं. २२ सप्टेंबर इ. स. १३९८ या दिवशी तुर्की, तार्तार, इराणी फौज घेऊन हा तैमूर, सिंध नदीवर आला. ३० सप्टेंबरला अटकजवळ होड्यांचा पूल करून त्याने नदी ओलांडली आणि पंजाबात घुसला. जिथे जिथे पोचला तिथे तिथे वस्त्यांमध्ये जाळपोळ करत लोकांना ठार करत दहशत बसवत सुटला.

पुढे पुढे सरकत त्याने नोव्हेंबरला पानिपत गाठलं तरीही दिल्लीची सुलतानशाही जागी झाली नव्हती. १३९८ च्या डिसेंबरमध्ये तैमूर दिल्लीत पोचला आणि त्याने आपल्या फौजेला हुकूम सोडला की दिसेल त्याला ठार करा. दिल्लीतील जनतेचा थरकाप झाला. दिल्लीतील सुलतानाने ज्योतिषाला बोलावून तैमुरवर हल्ला करण्यासाठी शुभ मुहूर्त काढला. २ दिवसांनी सुलतान नसरुद्दीन महमूदशाह आणि मल्लूखान १२,००० घोडदळ, ४०,००० पायदळ आणि शेकडो हत्ती घेऊन तैमुरलंगवर चालून गेला. या हत्तींच्या सोंडेत त्याने तलवारी बांधल्या होत्या. तैमूरही काही कमी नव्हता. हत्तींची ती धडक मोडायला त्याने ताबडतोब हजारो त्रिशूळ जमिनीत गाडून टाकले. मल्लूखानाचे हत्ती जवळ आल्यावर त्यांच्या पाय पडल्याने, पायात टोकदार त्रिशूळ शिरल्याने जखमी होऊन कोसळले. बैल आणि रेडे गोळा करून त्यांच्या पाठीवर गवताच्या गंजी बांधल्या आणि त्या पेटवून हत्तींवर ती जनावरे सोडली. त्या आगीला घाबरून उरलेले हत्ती पळून गेले. सुलतानाच्या फौजेत पळापळ झाली. सुलतान नसरुद्दिन गुजराथकडे पळून गेला.

तैमूरला दिल्ली रिकामी सापडली. भेसूर झालेली दिल्ली लुटली गेली.

दिल्ली जळायला लागली तो दिवस होता १८ डिसेंबर, १३९८ .

दुसरे दिवशी तैमूरने स्वत:ला बादशहा घोषित केलं. दिल्लीतील जनतेकडून जीवाच्या रक्षणासाठी भारीभक्कम रक्कम मागितली. ज्यांनी दिली नाही, ते फासावर लटकले. दिल्लीतील इतके जीव मेले की त्यांच्या प्रेतांनी दिल्लीतील रस्ते बंद झाले. २० डिसेंबर, बुधवारी, या दिवशी तैमूरलंग इदगाहमध्ये गेला. त्याने दिल्ली, फिरोजाबाद, तुघालाकाबाद, ज्या ज्या वस्त्या होत्या तिथल्या सर्व श्रीमंतांना बोलावणं पाठवलं. त्यांनी माफी मागितल्यावर तो शांत झाला. युध्द संपल्यावर तैमुरच्या जनानखान्यातील स्त्रिया राजप्रासाद बघायला गेल्या तेव्हा तिथल्या नागरिकांनी त्यांना अडवलं. ते कळल्याबरोबर तैमूरलंगच्या फौजेने परत मोठा नरसंहार केला. त्याचवेळी १००० तातारलोक गावात शिरले. स्थानिक लोक आणि तैमूरच्या फौजेत लढाई सुरु झाली. हजारो लोक आपला प्राण गमावून बसले. ३ दिवस ही कत्तल चालू होती. अनेक लोक जीवाच्या भीतीने पळून गेले. उरलेले गुलाम म्हणून तैमुरच्या सेवेत पकडले गेले. तैमुरने एक लाख लोकांचे प्राण घेतले.

तैमुर मग उजाड दिल्लीतून फिरला. त्याबद्दलची एक आख्यायिका सांगतात की दिल्लीत फिरताना तैमुरला एक आंधळी म्हातारी दिसली. त्याने तिला तिचं नाव विचारलं. तेव्हा तिने माझं नाव दौलत आहे असं सांगितलं. तैमूरने कुत्सित आवाजात तिला म्हटलं की दौलत आंधळी असते का? म्हातारी उत्तरली, होय ! आंधळी असते म्हणून तर ती लुळ्या लंगड्याकडे जाते.. तैमुरने दिल्ली सोडताना अनेक कारागीर आपल्याबरोबर नेले आणि आपल्या देशात सुंदर वास्तू बांधल्या.

परत जाण्याआधी तैमुरलंगने खिज्रखान, बहादूर नाहीर, मुबारक खान, आणि झीरक खान या तुघलक आमदानीतील सुभेदारांना बोलावून घेतलं. मुलतानच्या खिज्रखान सय्यद नावाच्या सुभेदाराला दिल्लीचा सुभेदार म्हणून

आपल्यावतीने कारभार करायला नेमलं आणि बाकी तिघांना कैद करून तुरुंगात टाकलं. प्रचंड मोठी लूट घेऊन तैमुरलंग मंगोलला परत गेला.

तैमुरलंग निघून गेल्यावर दिल्लीतील प्लेग आणि दुष्काळाला कंटाळून, खिज्रखान मुलतान आणि दिपालपुरला कारभाराचं केंद्र करून दिल्ली सोडून निघून गेला. दिल्ली सोडणं ही फार मोठी चूक त्याने केली, कारण खिज्रखांच्या जाण्याने रिकाम्या झालेल्या दिल्लीत इतर जे जुने महत्वाकांशी राजकारणी होते, त्यांच्यात राज्य स्थापनेसाठी संघर्ष सुरु झाला. त्यात होते सुलतान महंमद, जो अनेकवेळा दिल्लीवर पहिला वचक बसवण्यात पराभूत झाला होता, वजीर ख्वाजा जहाँ द्वितीय, मल्लू इक्बालखान, असे एकापेक्षा एक बिलंदर राजकारणी. मल्लुखानने आजूबाजूचा जमेल तेवढा प्रदेश जिंकून घेतला, पण बराचसा प्रदेश इतर स्वतंत्र सुभेदारांच्या ताब्यात राहिला. हाती काहीही अधिकार नसलेला आणि मल्लू इक्बालखानच्या ताब्यात राहिलेल्या सुलतान महंमदने शिकारीला जाण्याच्या बहाण्याने एक दिवस अचानक कनौजवर हल्ला करून तो परगणा आपल्या ताब्यात घेतला आणि तो स्वतंत्र झाला. मल्लू इक्बालखान त्यानंतर मुलातानचा सुभेदार खिज्रखानवर चालून गेला. पण त्यात तो पराभूत झाला आणि मारला गेला.

असं करून मल्लुखानच्या कारभाराचा अंत झाला. दिल्ली परत सुलतानरहित झाली, तेव्हा राजधानीतील लोकांनी कनोजला राहणाऱ्या सुलतान महंमदला दिल्लीला बोलावून घेतलं. सुलतान महंमद परत दिल्लीचा सुलतान झाला, ते साल होतं, ऑक्टोबर १४०५. पश्चिमेला मुलतान, दीपलपूरचा खिज्रखान आणि पूर्वेचा इक्बाल शार्की हे त्याचे दोन विरोधक शत्रू होते. त्या दिवसापासून १४१२ पर्यंत या महंमद सुलतानाने कारभार केला. ऑक्टोबर १४१४ मध्ये सुलतान महंमद मरण पावला. खिज्रखान सय्यद दिल्लीवर चालून गेला. दिल्ली जिंकली. दिल्लीत परत एकदा घराण्याचं सत्तांतर झालं. सय्यदांच्या हाती दिल्लीचं राज्य आलं.

ज्याच्या हाती दिल्ली तो सुलतान हे मोठं आणि महत्वाचं रहस्य खिज्रखानला उमगलं नाही, त्यामुळे तैमूरलंग राज्य हाती सोपवून गेला तरी तो कारभारासाठी मुलतानला सत्तेचं केंद्र करण्यासाठी निघून गेला आणि दिल्ली त्याच्या हातून निसटली. पण सुलतान महंमुदच्या मरणानंतर तो दिल्लीत परतला.

आता दिल्लीत सय्यदशाही सुरु झाली.

# खिज्रखान सय्यद.

# मृत्यू २० मे १४२१.

तुघलक घराण्याचा अंत होईपर्यंत आजवर दिल्लीच्या सुलतानाला ज्याने सिंहासनावरून खाली ओढलं तो सत्ताधीश होत होता. पण आता परत मूळ इतिहासाकडे राजकारण वळलं होतं. महंमद घोरीने ज्याप्रमाणे दिल्ली जिंकली आणि कुतुबुद्दीन ऐबकला दिल्लीचा कारभार सांभाळायला ठेवलं होतं, तसं आता आता सय्यद घराण्यातील पुरुषाबरोबर घडलं. त्याचं नाव होतं, खीज्रखान सय्यद.

तैमूरलंग नावाचं एक झंझावाती वादळ दिल्लीच्या दौलतीचा, सल्तनतीचा आणि भूमीचा विध्वंस करून गेलं. दिल्लीतील प्रचंड लूट नेतांना तैमूरलंगने खिज्रखान सय्यद याला दिल्लीचा कारभार करायला नेमलं.

फिरोजशहा तुघलकाच्या एका आमिरचा, मलिक सुलेमानचा खिज्रखान हा मुलगा. ह्याच्या मलिक नासिरूल मुल्क मर्दन या आजोबाकडे मुलतान परगण्याचा कारभार फिरोजशाहने सोपवला होता. फिरोजशहा तुघलकाच्यानंतर सुलतान महंमद याने खिज्रखानला मुलतानचे अधिकार दिले. त्याचवेळी तैमूरने दिल्लीवर स्वारी केली. पण त्याला इथे राज्य करायचं नव्हतं. म्हणून त्याने मुलतानचा सुभेदार खिज्रखान याच्याकडे कारभाराची जबाबदारी सोपवली आणि प्रचंड लूट घेऊन तैमूरलंग निघून गेला. पण खिज्रखान दिल्लीत राहिला नाही. त्याने मुलतान हीच आपली कारभारासाठी राजधानी केली. मात्र महंमद सुलतान मरण पावल्यावर खिज्रखानने ६ जून १४१४ ला दिल्लीत प्रवेश केला.

त्यानंतर तैमूरलंगच्या आदेशाप्रमाणे खिज्रखान दिल्लीचा कारभार करायला लागला, तेव्हा ते साम्राज्य राहिलं नव्हतं. एक लहान, २०० मैलांच्या परिघातील राज्य एवढीच त्याची ओळख होती. दिल्लीच्या अवतीभोवती स्वतंत्र जमीनदार, सुभेदार,

असेच छोटे छोटे परगणे तयार झाले होते. दिल्लीतील जुन्या दरबारी प्रतिष्ठितांवरही खिज्रखानचा ताबा नव्हता. सत्ता हाती आल्यावर खिज्रखानाने आपल्या मुबारक या मुलाला पश्चिम प्रांताचे अधिकार दिले. मग एकेक प्रांत आपल्या ताब्यात आणायला सुरुवात केली. त्याच्या काळात ग्वाल्हेर, बदायु, इटावा, पतियाला, नागौर, चंदावर, कम्पील, मेवात, हे परगणे अशांत होते. त्यांना काबूत आणणं महत्वाचं होतं.

२० मे १४२१ मध्ये खिजरखान मरण पावला. परगण्यांची व्यवस्था लावण्यातच त्याची ७ वर्षे संपली. तैमुरलंग असेपर्यंत त्याने स्वतःला सुलतान म्हणवून घेतलं नाही. तो स्वतःला “ रायते आला ” म्हणवून घेत असे. एक न्यायी, कर्मठ राज्यकर्ता म्हणून त्याने लोकांची सहानभूती मिळवली होती.

**मुबारक खान सय्यद.**

मरणापूर्वी तीन दिवस आधीच खिज्रखानाने मुबारकला आपला वारस घोषित केलं होतं, त्याप्रमाणे त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा मुबारक गादीवर आला. २२ मे १४२१ या दिवशी मुबारकशाह सुलतान बनला. दरबारी लोकांनी त्याला आपली संमती दिली. त्याने मात्र स्वतःचा सुलतान असं उल्लेख आपल्या नाण्यांवर केला. १७ वर्षे याने कारभार केला. १९ फेब्रूअरी, १४३७ या दिवशी त्याचा खून झाला आणि तो मरण पावला. दरबारातील सर्वरूल मुल्क हा त्याचा शत्रू होता. त्यानेच कारस्थान आखलं. १९ तारखेला सुलतान मुबारक आपल्या प्रार्थनेला बसला असतांना मुल्कचा माणूस मिरान सद्र याने सुलतानाचे अंगरक्षक गुप्तपणे हटवले होते. मग तो सुलातानाजवळ गेला. सिद्धीपाल नावाच्या माणसाने सुलतानावर तलवार चालवली आणि त्याला ठार केलं.

या १७ वर्षांमध्ये त्याने सतत मेवात, उत्तर सीमेवरच्या लढाया केल्या.

**महंमदखान सय्यद. इ. स. १४३४ -१४४३.**

मुबारकच्या मृत्युनंतर खिज्रखानचा दुसरा मुलाचा मुलगा महंमदखान सुलतान बनला. त्याने महंमदशाह ही उपाधी घेतली. सत्तेवर येताच ती विलासात रमला. तो इ. स. १४३४ पासून १४४३ पर्यंत सुलातानपदावर राहिला. सत्तेवर असतांना वजीर बहलोलखान लोदी याच्यावर तो अधिकाधिक विसंबायला लागला.

सुलतानाच्या कारभारातील ढिलाईमुळे ठिकठिकाणचे शत्रू डोकं वर काढायला लागले. सुलतानाला कुणी विचारेनासं झालं. बहलोलची महत्वाकांक्षा वाढायला लागली. त्याने दोन वेळा दिल्लीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला पण दोन्ही वेळा तो असफल राहिला. इ. स. १४४५ मध्ये महंमदखान सय्यद मरण पावला. त्यामुळे सय्यदशाहीचा अंतही जवळ आला होता.

अल्लाउद्दिन सय्यद . **इ. स. १४४५ – १४५१.**

महंमदशाह मेल्यावर त्याचा मुलगा गादीवर आला. त्याचं नाव होतं अल्लाउद्दिन अलामशाह. तोही दुर्बलच होता. त्याच्या हातून सत्ता ओढून घेतली ती बहलोलखान लोदीने. बहलोलखान लोदीच्या हाती कारभार सोपवून अल्लाउद्दिन बदायूला जाऊन राहिला. त्याचा तिथेच शेवट झाला.

इ. स. १४१४ ते १४५१ एवढ्या अवघ्या ३७ वर्षांचा कारभार करून सय्यदशाही संपली.

# लोदी राजसत्ता

# बहलोलखान लोदी

# जन्म १४०६. मृत्यू १२ जुलै १४८९.

लोदी घराण्याचं नाव दिल्ली सल्तनतीच्या इतिहासावर लिहिणारा बहलोलखान लोदी हा अफगाणी पठाण वंशाचा दिल्लीवर सत्ता गाजवणारा पहिला शासनकर्ता. तोपर्यंत दिल्लीवर तुर्की लोकांचा अंमल चालला. अफगाणी लोक सुलतान बलबनच्या काळात लष्करात भरती होण्यासाठी भारतात आले. काही लोक व्यापाराच्या निमित्ताने आले. मग इथेच रमले. या भूमीत नोकरी होती, पैसा होता, आणि पिकपाण्याची समृद्धीही होती. त्यामुळे अफगाणी वस्ती वाढायला लागली. व्यापारी तांडा तर नेहमीच भारतात येत असे.

असाच एक तांडा पर्वत पार करत भारतात आला. त्यात एक व्यापारी होता, त्याचं नाव होतं बहराम लोदी. हा बहराम विकाऊ माल संपल्यावर भारतातून परत मायदेशी गेलाच नाही कारण तिथे त्याच्या भावाशी त्याचं पटत नव्हतं. बहराम मुलतानमध्ये मर्दान दौलत या सुभेदाराच्या चाकरीत शिरला. तिथेच रमला. संसारात रमला. त्याला ५ मुलगे झाले. ते होते, मलिक सुलतानशाह, मलिक काला, मलिक फिरुझ, मलिक मुहंमद आणि मलिक ख्वाजा. मलिक ही उपाधी सर्वच अफगाण्यांना लागत असे.

बहराम लोदी मुलतानमध्ये मरण पावल्यावर त्याचा थोरला मुलगा, सुलतानशाह, मुलतानचा सुभेदार खिज्रखान याच्या सेवेत कामाला लागला. खिज्रखानबरोबर मल्लू इक्बाल याच्याशी लढत असतांना त्याने दाखवलेल्या शौर्यावर खूष होऊन सुभेदाराने त्याला " इस्लमखान " हा किताब दिला. सुलतानशाहचा दुसरा भाऊ मलिक काला हाही लष्करातच होता.

या मलिक कालाच्या पोटी बहलोलचा जन्म झाला.



जसं बहलोलखान लोदीचं सुलतान होणं हा नियतीचा खेळ, तशी त्याच्या जन्माच्या वेळची गोष्टही चमत्कारच ! त्याच्या जन्माच्या वेळी आईला ८ वा महिना होता तेव्हा घराचं छप्पर कोसळलं आणि आईचा मृत्यू झाला.. गावातले लोक अपघातस्थळी जमले, त्यांनी त्या बाईचं पोट कापून ज्या अर्भकाला बाहेर काढलं, तोच हा बहलोल.. त्यापाठोपाठ त्याचा बाप मलिक काला हाही लढाईत मारला गेला, तेव्हा त्याचा काका, इस्लम खान, बहलोलला आपल्या घरी घेऊन गेला. बहलोल अगदी लहान होता, तेव्हा हा काका त्याला घेऊन एका फकिराकडे गेला. त्या काळात काही फकिर लोकांना वाचासिद्धी होती. ते म्हणतील ते खरं होत असे. काका बहलोलला घेऊन फकिराकडे गेला तेव्हा तो फकिर जोरजोरात ओरडत होता, " दोन हजार सोन्याचे सिक्के जो कुणी माझ्या झोळीत घालेल, त्याला दिल्लीचं तख्त मिळेल. '' इस्लमखानाने ते ऐकलं आणि सोन्याच्या नाण्यांनी फकिराची झोळी भरून टाकली. फकिराने बहलोलच्या मस्तकावर हात ठेवत म्हटलं, जा, बेटा ! तुझे दिल्लीका राज दिया.. ''

छोटा बहलोल तरुण झाला तेव्हा इस्लमखानाने आपल्या बेटीची शादी त्याच्या बरोबर लावून दिली. बहलोलखान अर्थार्जनासाठी घोड्यांचा व्यापार करायला लागला. त्या काळी अश्वांचा व्यापार हा फार तेजीत असलेला व्यवसाय होता.. भारतीय भूमीवरील राजांना अरबी घोड्यांचं महत्व कळलेलं होतं. सतत

होणाऱ्या लढायांमध्ये घोडे जखमी होत, लंगडे होत, मरून जात. त्यामुळे ताज्या दमाच्या अरबी घोड्यांना सतत मागणी असे.

त्याच काळात काका इस्लमखान दरबारात सामर्थ्यवान बनत चालला होता. त्याच्या हाताखाली १२ हजार फौज जमली होती, आणि इस्लमखान एक प्रतिष्ठित राजकारणी बनला होता.. स्वत:ला मुलगा असूनही, आपला वारस म्हणून त्याने बहलोलखान यालाच निश्चित केलं होतं. पण इस्लमखानच्या मरणानंतर त्याची फौज तीन भागात वाटली गेली. एक भाग बहलोलच्या बाजूने उभा राहिला, एक इस्लमखानच्या मुलाच्या बाजूने गेला आणि एक गट बहलोलच्या काकाच्या बाजूने उभा राहिला. यातच एकाने दिल्लीत जाऊन सय्यद सुलतानाचे कान भरले आणि सरहिंदवर अफगाणी फौज तुमच्या विरोधात बंड करणार आहे असं सांगितलं. त्यामुळे सुलतानाने बंड मोडायला कुमक पाठवली. मलिक तोहफा आणि जसरथ खोकर यांना बंदोबस्तासाठी पाठवलं. त्यांनी बोलणी करायला आलेल्या बहलोलखानच्या काकाला त्यांनी कैद केलं. तेव्हा हुशारीने बहलोलने व्यापारात मिळवलेला पैसा सर्व मलिक लोकांमध्ये वाटून त्यांना स्वत:ची फौज उभी करायला सांगितलं.. सरहिंदवर त्यांनी तळ ठोकला. तेव्हा सय्यद सुलतानाने हुसेनखान नावाचा आपला आणखी एक सरदार सरहिंदवर या अफगाणांची ताकद मोडायला पाठवलं, पण बहलोल आणि त्याच्या साथीदारांनी या सेनापतीचा पराभव केला.

आणि मग बहलोलखानने मुत्सद्दीपणाने सुलतानाला पत्र लिहिलं की त्याला सुलतानाला भेटायचं इच्छा आहे, पण हुसेनखान असल्यामुळे तो येऊ इच्छित नाही. बहलोलची खेळी चांगलीच यशस्वी झाली. भोळ्या सुलतानाने लगेच हुसेनखानला ठार केलं. मग बहलोलखान लोदी दिल्लीत आला. तोपर्यंत अफगाणी जनतेत बहलोलखान एक मुत्सद्दी म्हणून प्रसिध्द झाला होता. सुलतानाची त्याच्यावर मर्जी बसली. बहलोलखानला सरहिंद परगणा जागीर म्हणून मिळाला. त्यातच सुलतान महंमद शहाने त्याच्याकडून काही उत्तम घोडे

खरेदी केले, पण त्याची किंमत देण्याएवढा पैसा सुलतानाकडे नव्हता, म्हणून त्याने बहलोलखानला सांगितलं की तू तुझ्या तलवारीच्या जोरावर या किंमतीएवढे परगणे जिंकून घे. मग काय ! बहालोलाच्या ते चांगलंच पथ्यावर पडलं. सरहिंदच्या आजूबाजूचा केवढा तरी प्रांत त्याच्या हाती आला.

मग बहलोलखान दिल्लीत येऊन स्थिरावला. आपल बस्तान बसवलं. त्यानंतर मात्र त्याने राजकारणात आपलं स्थान आपल्या राजकारणाने आणि हुशारीने भक्कम केलं. फौज वाढवली. आणि दिल्लीवर जेव्हा माळव्याच्या महंमद खिलजीने स्वारी केली, तेव्हा प्रचंड फौज घेऊन सय्यद सुलतान महंमदशहाच्या मदतीला गेला. त्या लढाईत सुलतानाला बहलोलमुळे विजय मिळाला, अशी सुलतानाची खात्री झाली. त्याने बहलोलवरचा सत्कार करून खान -ए-खानान हा किताब दिला. दिपालपूर, लाहोर, सुनाम असे अनेक परगणे त्याच्या हाताखाली आले. बहलोल लोदी आता शक्तिशाली झाला. त्याची महत्वाकांक्षा वाढली. सुलतानपदाची स्वप्नं त्याला पडायला लागली. त्याने दिल्लीवर स्वारी करून सत्ता ताब्यात घेण्याचा दोनदा प्रयत्न केला, पण असफल झाला. तेवढ्यात सुलतान महंमदशाह मरण पावला. त्याचा मुलगा अल्लाउद्दिन तख्तावर आला. दिल्लीत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. अनेक लहान लहान गट ताकदवान झाले होते. बहलोलखान लोदीला या लहान मोठ्या प्रमुखांना जिंकायचं होतं. त्याचवेळी दरबारातही गोंधळ होता. दरबारातील हमीदखान ह्या बहलोलखानच्या माणसाला सुलतान अल्लाउद्दिनने ठार करायचं ठरवलं तेव्हा हमिदखानने बंड केलं आणि सत्ता हाती घेण्याचा निश्चय केला. बहलोलखान लोदीला ही बातमी समजली तेव्हा तो पूर्ण तयारीने सरहिंदवरून दिल्लीत आला.

दिल्लीचं तख्त मिळवण्यासाठी याच संधीची तो वाट पाहत होता. पण दोन वेळा हार खावी लागली असल्याने यावेळी त्याने हमीदला जिंकायची नवीन रणनीती आखली. त्याने हमीदखानशी दोस्तीचा हात वाढवला. त्याचा विश्वास संपादन केला. हळूहळू बहलोलखानाच्या अंगरक्षकांनाही हमीदखान आपल्या

राजवाड्यात येण्याची परवानगी देऊ लागला. बहलोलखानचे लोक आपली अल्लाउद्दिन सुलतानाशी स्वामीनिष्ठा दाखवण्यासाठी हमीदखानच्या अंगरक्षकांशी भांडायला देखील लागले. त्यामुळे सुलतानाचे अंगरक्षकही मागे पडू लागले. सुलतानाचा विश्वास वाढायला लागला.

असेच काही दिवस लोटले. एक दिवस हमीदखानने बहलोलखान लोदीला आपल्या प्रसादात भोजनचं आमंत्रण दिलं. तेव्हा बहलोलखानच्याबरोबर त्याचेही शिपाई महालात आले. हमीदखानच्या लोकांना बाजूला सारून स्वतः पुढे उभे राहिले. बहलोलाचे शिपाई आत आलेलं पाहिल्यावर हमीदखानाचे सुरक्षा अधिकारी दूर झाले. बहलोलखानच्या शिपायांनी हमीदच्या जवळच्या अंगरक्षकांना दोन्ही बाजूंनी आपल्यामध्ये अडकवलं. स्वतः बहलोल खानाचे अंगरक्षक त्याचा आणि हमीदखानाच्यामागे पुढे होते. महालाच्या दारापासून हमीदखान जेव्हा आत यायला निघाला तेव्हा बहलोलखानचा पुतण्या कुतुबखान लोदीने आपल्या कपड्यांमध्ये लपवलेले साखळदंड बाहेर काढले आणि हमीदखानला तो म्हणाला,

'' आता तू आमच्या ताब्यात आहेस. तुझे जुने उपकार स्मरून आम्ही तुला ठार मारत नाही आहोत. '' बहलोलचा घाव यशस्वी झाला होता ''

सारी सल्तनत बहलोलखानच्या हातात आली होती. दिल्लीच्या तख्तावर त्याच्या लोदी या नावचं शिक्का मोर्तब झालं होतं.

१९ एप्रिल १४५१ या ज्योतिषांनी काढून दिलेल्या मुहूर्तावर बहलोलखान लोदी तख्तनशीन झाला. त्याला ९ मुलगे झाले. सुलतान बनल्यावर त्याने बदायुला जाऊन राहिलेल्या सय्यद सुलतान अलाउद्दीनला पत्र लिहिलं, '' तुमच्या वडिलांनी मला वाढवलं. मी तुमचा प्रतिनिधी म्हणूनच राज्य करणार आहे. खुत्बासुद्धा तुमच्याच नावाने वाचला जाणार आहे. ''

तेव्हा सुलतान अल्लाउद्दिनने त्याला उत्तर पाठवलं की '' मीही तुला माझा मोठा भाऊच समजतो. तू राज्यकारभार करायला हरकत नाही. ''

बहलोलखान मग राज्याच्या कारभाराकडे वळला. मुळात अफगाणी लोकांना राज्य करण्याची संस्कृती नव्हती. संस्कार नव्हते. हाताला अत्तर लावलं तर हात चाटणारी जमात होती ती. महालात फुलांनी सजवलेल्या फुलदाणीतील फुलंपानं तोडून खात. बुद्धिमानही नव्हते. नुसतेच दांडगाई जाणणारे होते. अफगाणिस्तानात सर्व लहान मोठ्या टोळ्यांनी राहत. एकसंघ राज्यव्यवस्था त्यांना माहीतच नव्हती. मुसलमान, त्यांना त्यांच्या आचारसंहिता,परंपरा, माहीत नसण्याबद्दल हसतच असत.

सत्तेत आल्यावर बहलोलखानचे दोन निकडीचे प्रश्न म्हणजे अजून सुलतान अल्लाउद्दिनच्या सय्यद घराण्याला मानणारे लोक दरबारात होते. तसंच अटकेत पडलेल्या हमीदखानचे लोकही त्रास देण्याच्या मनस्थितीत होते. तिसरा शत्रू होता. सय्यद घराण्याचा जावई जौनपूराचा सुभेदार शार्की. दिल्लीतील खजिना, पागा आणि किल्ला हातात आल्यावर आपल्या विश्वासू लोकांच्या महत्वाच्या जागी नेमणुका करून त्याने दिल्लीत सुव्यवस्था आणि शांतता आणली आणि मग आपलं लक्ष मुलतानकडे वळवलं. आपल्या मुलांच्या हाती दिल्लीची व्यवस्था सोपवून आणि आपली काकू –इस्लमखानची पत्नी बीबी मुट्टूला सल्लागार नेमून तो मुलतानला गेला.

ही संधी साधून सुलतान अल्लाउद्दिन याचा जौनपूरचा जावई शार्की दिल्लीवर चालून आला. दिल्लीतील फौज बहलोलखान बरोबर मुलतानवर गेली होती. राजधानीत जुजबीच फौज होती. तेव्हा बीबी मुट्टूने बायकांना पुरुषांचे पोशाख देऊन किल्ल्याच्या तटबंदी वर उभ्या केल्या आणि मुलतानला फौज गेली तरी दिल्लीत मोठी फौज आहे असं शत्रूला भासवलं. त्यातच किल्ल्यातील निपुण तीरंदाजानी किल्ल्यावरून शत्रूचे पाण्याचे साठे वाहणारे बैल मारले, तेव्हा शत्रूला किल्ल्यातील फौजेच्या ताकदीचा अंदाज आला आणि त्याने बोलणी

करण्याचा प्रस्ताव किल्ल्यात पाठवला. शर्कीची फौज लढाई टाळावी या विचाराला आली. फौजांनी परतीचा रस्ता धरला तेव्हा त्या निघून जाणाऱ्या फौजेचा पाठलाग करून प्रचंड लूट लोदीच्या खजिन्यात जमा झाली. बहलोलखानच्या नावाचा दबदबा दिल्लीत पसरला. राज्यातील त्याचे विरोधक गप्पा झाले. या जौनपूरच्या शर्कीशी त्याचा सतत तंटा चालत राहिला तेव्हा आपल्या देशातील तरुण शूर पठाण त्याने दिल्लीत बोलावून घेतले आणि आपली फौज आणखी भक्कम केली. शेवटी जौनपूर त्याच्या हाती आलं.

सुलतानाची पुढची मोहीम काश्मीरवर झाली.


बहलोलखानने मग माळव्यावर स्वारी केली. त्यानंतर पसरलेल्या आपल्या मोठ्या साम्राज्याला बहालोलखानने आपल्या ९ मुलांमध्ये वाटला आणि कारभार सोपा केला. त्यानंतर इ. स. १४८५ मध्ये त्याने हिसार, ग्वाल्हेर, आणि इटावावर स्वारी केली. त्यावेळी ग्वाल्हेरचा राजा मानसिंग तोमरने सुलतानाला ८० लाख रुपये दिले. लढाई न होता सुलतान बहलोल इटावावर गेला. तिथला कारभारी बदलला. बहलोलखान सुलतान तिथून परत फिरला आणि दिल्लीच्या वाटेवर असतांना १२ जुलै, १४८९ रोजी मिलौली इथे हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावला.

सुलतान बहलोलखानच्या काळात प्रजा सुखी झाली. राज्यात शांतता नांदायला लागली. राज्य विस्तारासाठी आणि राखण्यासाठी साम-दाम-दंड-भेद-क्रौर्य-फसवणूक यातील कोणताही गैरमार्ग त्याने वर्ज्य केला नाही. पण त्याची स्वत:ची राहणी अगदी साधी होती. नमाज वाचन तो अगदी मनापासून करत असे. स्वारीत मिळालेली लूट तो आपल्याकडे योग्य तेवढी ठेऊन फौजेतील शिपायांना वाटून टाकत असे. त्यामुळे फौज खूष होती. पहाटे उठून दुपारपर्यंत दरबारातील कामकाज चाले. लहान मोठा, सर्व न्यायनिवाडा तो स्वत: करत असे. तो स्वत: सिंहासनावर न बसता गालिचावर बसत असे. त्याच्या दरबारातील सर्व अमीर उमराव त्याच्याबरोबर उत्तम गालीचावरच बसत. कुणीही उभे राहत नसे. तो

आपल्या प्रासादात जेवत नसे. त्याच्या जेवणाची व्यवस्था त्याने सर्व अमिरांना वाटून दिली होती. ते त्याचं जेवण आणत आणि त्याला देत. त्यावेळी त्याला भेटायला कुणी आलं तर त्यालाही तो आपल्याबरोबर जेवायला घेत असे. त्याने त्याचे स्वत:भोवती अंगरक्षक नेमले नव्हते. हिंदू राजांबरोबर त्याचे सलोख्याचे संबंध होते.

१९ एप्रिल १४५१ ते १२ जुलै १४८९, ३८ वर्षे , एवढा काळ सत्ता गाजवून बहलोलखान लोदी मरण पावला.

त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा सिकंदर लोदी सिंहासनावर बसला.



# सिकंदर लोदी.
# मृत्यू २१ नोव्हेंबर १५१७.

१७ जुलै १४८९ या दिवशी लोदी वंशाचा दुसरा सुलतान म्हणून दिल्लीवर सत्तेत आला तो निझाम खान म्हणजेच सिकंदरशाह लोदी. बहलोल लोदीचा मृत्यू झाल्याबरोबर मिलौलीच्या छावणीमध्ये बहलोलच्याखानच्या ३ शहजादांपैकी कुणाला तख्तावर बसवायचं यावर दरबारी उमरावांमध्ये चर्चा सुरु झाली, आणि त्यात ३ तट पडले. एक गट सिकंदरशहाच्या ( निझामखान ) बाजूने, दुसरा बार्बेक शहाच्या बाजूने तर तिसरा गट आझम हुमायूनचा पुरस्कर्ता होता. सिकंदरची आई हिंदू सोनाराची मुलगी होती म्हणून सोनारांचं राज्य चालवण्याशी काही देणंघेणं नाही असं दरबारी मंडळीनी ठरवलं आणि सिकंदराचा हक्क अमान्य केला. तेव्हा परत त्यांच्यात भांडण लागलं. दरबारातील खानखानान याने सिकंदरशहाची बाजू घेतली. मग वझीर आणि निझामखानच्या आईने सिकंदरला छावणीत बोलावलं. तेव्हा सिकंदर दिल्लीहून निघाला. त्याआधी तो दिल्लीतील संत शेख सामौद्दिन याला भेटायला गेला. त्याचे आशीर्वाद घेऊन त्याने आपल्या वडिलांच्या अंत्ययात्रेत भाग घेतला.




१६ जुलै, १४८९, शुक्रवार या दिवशी त्याने सत्ताग्रहण केलं. हा समारंभ काली नदीच्या तीरावर पार पडला. मग तो दिल्लीत पोचला.

दिल्लीत पोचल्यावर त्याचं पाहिलं महत्वाच काम होतं, ते आपल्या विरोधकांवर आणि भावांवर विजय मिळवणं. त्यासाठी तो लगेच राप्रीवर चालून

गेला तिथे त्याचे दोन भाऊ होते. भावांचा प्रभाव झाला, पण सिकांदाराने आपल्या एका भावाला इटावाचा सुभेदार बनवलं. आझम  हुमायून लोदी, याने मात्र कडवा विरोध केला. पण सिकंदर आपल्या विरोधकांना जिंकण्यात यशस्वी झाला. एकेक परगणा जिंकत चालला. जौनपूरची मोहीम यशस्वी झाल्यावर तो संबळ इथे पोचला. तिथे असतांना त्याच्या खुनाचा कट उघड झाला. राज्यातील वेगवेगळ्या २२ उमरावानी एकत्र येऊन त्याला उलथवायचं ठरवलं. फतेखान या मुलाला तख्तावर बसवायचं निश्चितही झाल. पण हा कट उघड झाला. सुलतानाने कारस्थानी लोकांना सजा दिली. काहींना ठार केलं आणि काहींना देशाबाहेर घालवून दिलं. पुढच्या त्याच्या मोहिमा धौलपूर आणि ग्वाल्हेरवर झाल्या.

सिकंदरशाह उत्तम कवी होता. एक मोठं खंडकाव्य त्याने गुलरूखी या नावाने फारसी भाषेत लिहिलं होतं. त्याला फारसी भाषा राजभाषा करायची होती.

इ. स. १५०६ मध्ये आग्रा हे शहर त्यानेच वसवलं. त्या आधी बयाना हे मोठं दळणवळणाचं केंद्र होतं. आग्रा गावाकडे आधीच्या कोणत्याही सुलतानाने लक्ष दिलं नव्हतं. सुलतान सिकंदरने या गावात आपलं लष्करी केंद्र स्थापन करायचं ठरवलं. काही बुद्धिमान आणि हुशार लष्करी अधिकार्यांना त्याने यमुनेच्या काठाचा अभ्यास करून कोणत्या जागेवर शहर वसवलं जावं याचा विचार मांडायला सांगितलं. सध्याचं आग्रा शहर हे त्या अधिकार्यांनी निवडलेले शहर वसाहतीसाठीच उत्तम ठरवलं होतं. ती जागा निश्चित झाल्यावर सुलतान सिकंदर स्वत: ती जागा बघायला आला. सुंदर वस्तू उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याचा विचार चालू असतांना त्याचा अधिकारी मेहेतर मुल्लाने एका  जागा दाखवत म्हटलं की तो " आगे राह " असलेला उंचवटा दिसतोय ती जागा योग्य वाटते आहे. तेव्हा सुलतान सिकंदर हसला आणि म्हणाला, मग आपण या शहरालाही "आगे राह" असंच म्हणू. अशा रीतीने उच्चारता उच्चारता त्या शहराचं नाव आग्रा पडलं. इ. स. १५०५ मध्ये ही नगरी तयार झाली. सुलतान सिकंदरने ती आपली दुसरी राजधानी केली.



ابوالمظفر غازی سلطان سکندر لودی
(۸۹٤ - ۹۲۳ ھ)

सिकंदर कट्टर मुसलमान होता. पण दुसरीकडे त्याच्या धर्मात निषिद्ध असलेलं मद्यपानही तो करत असे. संगीताचाही तो शौकीन होता. सुलतान बनल्यावर त्याने मथुरेत यमुनेत अंघोळी करण्यावर बंदी आणली.

नोव्हेंबर १५१७ मध्ये तो घटसर्प झाल्यामुळे आजारी पडला. त्याचं दुखणं वाढत गेलं. २१ नोव्हेंबरला तो मरण पावला. उत्तम प्रशासक, खंबीर समर्थ चालक म्हणून त्याने राज्यात स्थैर्य आणलं.

त्याच्यानंतर त्याचा मोठा शहजादा इब्राहीमखान लोदी तख्तावर आला.

# इब्राहिमखान लोदी.

# मृत्यू २१ एप्रिल १५२६.

सिकंदर लोदीचा मृत्यू झाल्याबरोबर दुसरे दिवशी इ. स. १५१७, २२ नोव्हेंबरला इब्राहिमनखानने सत्ता ग्रहण केली. पण दरबारातील अमीर उमराव यांनी एकविचाराने राजकारणाला वेगळं वळण दिलं.




Sultan Ibrahim Loudi (1517)

इब्राहिमखान अमिरांना चांगली वागणूक देत नव्हता, म्हणून त्यांना इब्राहिमखान आवडत नव्हता. पण त्याचा हक्क नाकारणं म्हणजे शहरात युध्द छेडणं झालं असतं. त्यामुळे त्याला अटक करण्याची त्यांची इच्छा होती. पण त्यांनी दुसरा मार्ग काढला. त्यांनी राज्याची दोन भागात विभागणी केली आणि दोन भावात ते वाटलं. त्यामुळे इब्राहिम आणि त्याचा धाकटा भाऊ जलालुद्दीन हे दोघे सुलतान बनले. याचा परिणाम म्हणजे दोघेही खूष झाले. कारण इब्राहिमला आपली अटक टळली याचा आनंद झाला, आणि राज्यावर हक्क सांगता आला नसता, ती राजलक्ष्मी अचानक हाती आली म्हणून जलालुद्दीनसुद्धा खूष झाला. इब्राहिमचा स्वभाव अमीर उमरावांना पसंत नव्हता, म्हणून त्यांनी ही शक्कल लढवली. या निर्णयाला विरोध केला तो फक्त रापरीच्या खानेजहान लोदी सुभेदाराने. अफगाण्यांच्या भल्याची ही वाटणी नाही, असं स्पष्ट मत त्याने दिलं.

दरबारी मंडळीना हे म्हणणं पटलं आणि त्यांनी काल्पीहून जलालुद्दीनला परत बोलावण्यासाठी माणूस पाठवला. पण त्याने स्पष्ट नकार दिला. तेव्हा इब्राहिम

लोदीने जलालुद्दीनच्या अमीर उमरावांना आपल्या बाजूला वळवलं. ते अमीर आणि जलालुद्दीनची फौज जेव्हा इब्राहिमला जाऊन मिळाले, तेव्हा इब्राहिम लोदीने परत एकदा राज्याभिषेक करून घेतला. हा राज्याभिषेक २९ डिसेंबर १५१७ ला झाला.

आता जलालुद्दीन स्वस्थ बसला नाही. त्यालाही राज्य करायचं होतं. त्याने आपला पक्ष बळकट करायला सुरुवात केली. तेव्हा इब्राहिमखान लोदीलाही हालचाली करायला सुरुवात करावी लागली. त्याने आपल्या इतर भावांना आपल्या बाजूला वळवलं. जलालुद्दीनवर मोठी फौज पाठवली. तेव्हा इब्राहिम लोदीच्या फौजेसमोर त्याची हार झाली. इब्राहिमखान लोदीने त्याला आग्र्याचा राज्यपाल म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव ठेवला. जलालुद्दीनला हा प्रस्ताव आवडला नाही. तेव्हा तो इब्राहिमच्या विरुध्द ग्वाल्हेरच्या राजाला जाऊन मिळाला. पण तिथेही इब्राहिमखान लोदीची फौज पोचली, तेव्हा जलालुद्दीन तिथून पळाला. पण तो वाटेतल्या भिल्लांच्या हाती पडला, आणि त्यांनी इब्राहिमखान लोदीच्या हाती त्याला सोपवला. इब्राहिम त्याला कैदेत ठेवणार होता पण दरबारी लोकांच्या सांगण्यावरून त्याने जलालुद्दीनला ठारच करून टाकलं.

मग इब्राहिमखान ग्वाल्हेरवर चालून गेला. त्यावेळी ग्वाल्हेरचा राजा मानसिंग मरण पावला होता, आणि त्याचा पुत्र विक्रमादित्य गादीवर आला होता. त्याने इब्राहिमखान लोदीची फौज आल्याबरोबर किल्ला त्यांच्या हवाली करून टाकला. तिथे विजय मिळाल्यावर त्याची राणा संग याच्याबरोबर गाठ पडली. या दोघांच्यात अनेक चकमकी घडल्या. दोघेही आपापल्या सीमा विस्तारण्यासाठी एकमेकांवर चालून जात होते. शिवाय माळवा हस्तगत करणे ही दोघांची महत्वाकांक्षा होती. इ. स. १५१७ मध्ये खतौलीच्या रणभूमीवर दोघांच्यात घनघोर युध्द लढलं गेलं. त्यात राणा संग फार वाईट रितीने जखमी झाला. त्याचा एक हात तुटला आणि पायालाही मोठी जखम झाली. इब्ब्राहीमखान लोदीची फौजही मैदानावरून पळून गेली, त्यामुळे इब्राहिमलाही रणांगण सोडावं लागलं. परत

मोठ्या तयारीनिशी इब्राहिमखान लोदी राणा संगवर चालून गेला. पण ही लढाईसुद्धा अनिर्णीत राहिली.




इब्राहिमखान लोदीने मग आपलं लक्ष त्याच्याशी प्रतारणा करणाऱ्या आपल्या दरबारातील अमिरांकडे वळवलं. जलालुद्दीनला ज्या ज्या अमिरांनी मदत केली होती, त्या सर्वांना त्याने तुरुंगात टाकलं. काहींना ठार केलं, तेव्हा दारीयाखान नुहानी नावाचा अमीर बंड करून उठला. त्यालाही इब्राहिम लोदीने ठार केलं, तेव्हा त्याचा मुलगा बहादूरशहा याने बिहार परगण्यात स्वतःला सुलतान म्हणून घोषित केलं आणि आपल्या नावाने खुत्बा वाचायला लावला. परिस्थिती चिघळत गेली. सारे अमीर सुलतानाच्या विरुध्द गेले.

इब्राहिमखानने आपल्या मदतीसाठी मग पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदीला बोलावलं. पण दौलतखान लोदीही इब्राहिमखानच्या विरुध्द गेला. दौलतखान लोदीने शेवटी सर्व इतर अमिरांना गोळा केलं, त्याचवेळी बहलोलखानचा मुलगा आलमखान याला अल्लाउद्दिन या नावाने सुलतान म्हणून घोषित केलं. आणि त्यालाच इब्राहिमखान लोदिविरुध्ह मदत मागायला बाबराकडे बोलणी करायला पाठवलं. बाबरने एकूण परिस्थिती जाणून घेण्यासाठी भारतातून

आलेल्या या अमिरबरोबर आपलेही अमीर पाठवले. त्यांनी पंजाबमध्ये येऊन लाहोर-सियालकोट अशी ठाणी आपल्याजवळ घेतली.

इ. स. १५२४ मध्ये बाबर सियालकोटला आला. आलमखानशी त्याची बोलणी झाली. आपल्या बोलावण्यावरून बाबर आला आहे, म्हणून इब्राहिमचा प्रदेश जिंकून आपल्याला द्यावा अशी मागणी त्याने बाबरजवळ केली. यावरून दोघांच्यात मोठे मतभेद झाले. आलमखान आपली ४०,००० फौज घेऊन दिल्लीवर चालून गेला. इब्राहिमखान लोदीला ही बातमी मिळताच ८०००० फौज घेऊन तो आलमखानला अडवायला निघाला.

दिल्लीत पोचल्याबरोबर आलमखानने अचानक इब्राहिमच्या फौजेवर हल्ला केला. पण आलमखानला माघार घ्यावी लागली. तेवढ्यात पहाटे इब्राहिमखानची फौज आली. आलमखानच्या तळावर कोसळली. दोन्ही फौजा भिडल्या. आलमखान हरला आणि पळून गेला. जेव्हा बाबर लाहोरला पोचला होता. त्याचवेळी दौलतखानने बाबरला ठार करायचा कट केला. पण हा कट उघड झाला आणि दौलतखान कैदेत पडला. आता सर्व सूत्रं दिलावरखान नावाच्या सरदाराकडे आली. तेवढ्यात दिल्लीवर स्वारी करायला आलेल्या बाबरला काबूलमध्ये अचानक गडबड झाल्यामुळे परत फिरावं लागलं. इब्राहिम दिल्लीच्या पुढे पंजाब जिंकायला निघाला. आलमखान दिल्लीवर आला. त्यात आलमखानचा पराभव झाला. बाबरला ही अफगाण्यांच्या लबाडीची बातमी मिळाल्याबरोबर तो लगेच काबूलहून निघाला. त्याने पंजाब जिंकलं आणि दिल्लीकडे मोर्चा वळवला. वाटेतील महत्वाची ठाणीही त्याने जिंकून घेतली.

त्यानंतर घडलं २१ एप्रिल १५२६ ते इब्राहिम खान लोदी आणि बाबरमध्ये पानिपतचं महाभारत. हे युध्द भारताच्या इतिहासातील युगप्रवर्तक युध्द ठरलं.

जय्यत तयारीने बाबर मैदानात उतरला. यावेळी त्याच्याकडे तोफा आणि बंदुका ही नवीन युद्धसामग्री होती. उस्ताद आली आणि मुस्तफा या दोन निपुण

गोलंदाज अधिकाऱ्यांच्या हाताखाली तोफांची रचना केली होती. इब्राहिमखान लोदीची फौज खूप मोठी होती. त्या फौजेला बाबरला हरवायचं होतं.

बाबरने आपल्या ७०० तोफांच्या गाड्या कातडीच्या दोराने एकमेकांशी घट्ट बांधल्या. प्रत्येक दोन गाड्यांमध्ये रक्षण गाड्या ठेवल्या. तोफा आणि या रक्षा गाड्या मागून बंदूक धरी सैनिक बंदुका चालवत होते. फौजेच्या हालचालीसाठी तोफांच्या रांगांमध्ये मोकळी जागा भरपूर सोडली होती.. त्याच्या मागे आपली फौज ठेवली. प्रत्येक ६/७ तोफांमध्ये दोन निष्णात गोलंदाज नेमले. इब्राहिमखान लोदीचे काही सरदारही बाबरला येऊन मिळाले होते.

२१ एप्रिल १५२६ या दिवशी प्रात:काळी बाबर आणि इब्राहिमखान लोदीच्या फौजा पानिपतावर एकमेकांना भिडल्या. तुंबळ युध्द झालं. इब्राहीम लोदी आणि त्याचे ५ हजार सैनिक मारले गेले. हजारो शवांचा खच पडला, त्यातच इब्राहिम लोदीचाही देह पडला होता. दुपारपर्यंत युध्द संपलं होतं. इब्राहिम लोदीची उरलेली फौज पळून गेली.

बाबरच्या फौजेपेक्षा इब्राहिमखान लोदीच्या अफगाणी फौजेची संख्या खूप मोठी होती. पण तरीही लोदी हरला. का?

बाबराचे सर्व शिपाई लढवय्ये होते, तर लोदी फौजेत खोगीर भरती होती. त्यामुळे त्यांच्यात काहीही शिस्त नव्हती.

२. लोदीकडे उत्कृष्ट तोफखाना नव्हता, जो बाबरकडे होता.

३. बाबर उत्तम कसलेला सेनानी होता. इब्राहिम खानला युद्धनीती अवगत नव्हती.

४. बाबरची  तुलुगमा पद्धत लोदीच्या फौजेला चकवून गेली. या पद्धतीमध्ये शत्रूला घोडदळाने आपल्यामागे खेचत पुढे न्यायचं आणि मग त्यांच्या पिछाडीवर

जाऊन मागच्या बाजूने सैन्य कापून काढायचं, ही रणनीती अफगाण्यांना अवगत नव्हती.

५. बाबरचं  सशक्त गुप्तहेर खातं त्याला यश देऊन गेलं. शत्रूची बारीकसारीक माहिती बाबराने गोळा केली होती. इब्राहिमखान लोदीला त्याचं महत्व कळलं नव्हतं

६. लोदीची लढाई योजनाशून्य होती. बाबरच्या फौजेची प्रत्येक हालचाल सुनियोजित होती.

७. इब्राहिमखान लोदीकडे हत्ती खूप होते, पण या नव्या शत्रूच्या नव्या चपळ हालचालींना त्यांचा काही उपयोग झाला नाही.

पानिपतावरच इब्राहिमखान लोदीचा दफनविधी पार पडला. इ. स. १५१७ ते १५२७ पर्यंत त्याने सत्ता गाजवली.

पानिपतावर अफगाणी सत्तेचा, बाबर नावाच्या मुघलामुळे अंत झाला. आईकडून चेंगीजखान आणि वडिलांकडून तैमूरलंगचा वंशज बाबर दिल्लीचा जेता झाला. कोण होता हा बाबर? याचा जन्म तैमूरलंगच्या समरकंद राजधानीच्या पूर्वेला असलेल्या फरगाना जिल्ह्यात, अन्दिझान गावात १४ फेब्रुअरी,इ. स. १४८३ मध्ये झाला. याचा उमर शेख मिर्झा बाप मोठा शूर, पराक्रमी जहागीरदार होता. वडील १२ व्या वर्षी वारले तेव्हा बाबरवर कारभार चालवण्याची जबाबदारी आली. बाबरचं स्वप्न मोठं होतं. इ. स. १४९७ मध्ये त्याने समरकंद जिंकून घेतलं, तेव्हा तो अवघा १४ वर्षांचा होता. पण त्याने समरकंद जिंकलेलं पाहून फरगानावर त्याच्या सावत्र भाऊ आणि इतर भाऊबंदानी हक्क सांगितला. आणि लगेच फौज जमवून फरगानावर हल्ला केला. त्यामुळे बाबरला समरकंद सोडून फरगानाला यावं लागलं. पण या लढाईत फरागाना त्याला गमवावं लागलं. फरागानाची राजधानी त्याच्या विरोधकांनी जिंकून घेतली होती. बाबर दोन्ही राज्यं गमावून बसला. पण त्याने मुत्सद्दीपणाने भावांशी तह करून जहागीरीतील थोडासा हिस्सा मिळवला

आणि परत एकदा समरकंदावर अचानक छापा टाकून हल्ला केला, आणि ते ताब्यात घेतलं. पण परत समरकंद त्याला लाभलं नाहीच. उझबेकीस्थानचा नायक शैबानीखान त्याच्यावर चालून आला. या उझबेकी फौजेने तुलुघामी पद्धतीने बाबरचा पराभव केला. पुन्हा बाबरचा राजयोग संपला.

पण त्याची महत्वाकांक्षा स्वस्थ बसू देत नव्हती. त्याने मग काबूल जिंकलं. तिथे तो स्थिरावतो आहे की नाही तेवढ्यात परत शैबनीखानच उझाबेकीस्थानाहून कंदाहारावर आला पण काही अडचणीमुळे हल्ला न करताच परत गेला. बाबरच्या हाती काबूल राहिलं. तो तिथला बादशहा बनला. पुढे जेव्हा त्याला शैबानीखानच्या मृत्यूची बातमी मिळाली. तेव्हा त्याने लगेच परत समरकंदावर हल्ला केला. पण शैबानीखानच्या मुलाने बाबरला परत हुसकावून लावलं. मोठ्या देशाच्या राजा बनण्याचं बाबराचं स्वप्न तसंच राहिलं. तो काबूलमध्ये राज्य करायला परतला.

पण सम्राटपदाची आंतरिक उर्मी त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. आता त्याचं लक्ष त्याच्या पूर्वजांनी लुटलेल्या दिल्लीकडे वळलं. बाबर आणि इब्राहिमची पानिपतावर मोठी लढाई झाली आणि बाबरच्या नावाने मुघल पातशाहीला दिल्लीत सुरुवात झाली. नव्या घराण्याचा पाया रचला गेला.

इ. स. ११९१ मध्ये महंमद घोरीने पृथ्वीराज चौहानचं उलथवलेलं सिंहासन तख्तात बदललं होतं. तुर्की-गुलामवंश-अफगाणी-सल्तनतींचा ३३५ वर्षांनी अंत होऊन मुघलशाही सुरु झाली. बाबर-हुमायून-अकबर-शहाजहान-औरंगजेब असे एकापेक्षा एक समर्थ बादशहा या वंशात जन्मले.

यमुनेच्या काठावर परत एकदा मुघल राजकारणाचा नवीन पट मांडला गेला.

काळाने परत एकदा कूस बदलली. भारतमातेच्या पायातील पारतंत्र्याच्या बेड्या अजूनही मोकळ्या झाल्या नव्हत्या.

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत<br>
अध्यक्ष,

ई साहित्य प्रतिष्ठान